म. ग्रं. सं. ठाणें

विषय: पौराणिक

लेखक: कृष्णाजी नारायण पालवकर

सन: १८८०

संग्रहालय क्रमांक: २८ / ११६

पुस्तकाचें नांव: श्रीराम विजयसार

२८

सं.क्र. श्रीराम विजयसार.

(पौराणिक)

अनुक्रमांक २२५
मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.

श्रीगजानन

# श्रीरामविजयसार

अथवा

# श्रीरामविजयग्रंथातील सुरस गोष्टी

हें पुस्तक

कृष्णाजी नारायण शास्त्री पावळकर

यांनीं रचलें

तें

**वि० दा० पुरंदरे आणि कंपनी**

ह्यांनीं

सर्व प्रकारच्या हक्कांसह विकत घेऊन

**मुंबई येथें**

"देव्हारे प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें.

शके १८१६, सन १८९४.

किंमत बारा आणे.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्वप्रकारचे हक्क प्रसिद्धकर्त्यांनीं
आपणांकडे ठेविले आहेत.

३६ विराधाचा उद्धार .... .... .... .... .... ७०
३७ शरभंग व राम ह्यांची भेट .... .... .... .... ७१
३८ श्रीरामजटायु भेट .... ... .... .... .... ७६
३९ शंभरासुरवध .... .... .... .... .... ७७
४० शूर्पणखा विटंबना .... .... .... .... .... ७९
४१ खरदूषणत्रिशिरवध .... .... .... .... ... ८०
४२ हीच आग लंकेवर गेली .... .... .... ... ८१
४३ जटायु भेट ... .... .... .... .... .... ८५
४४ सीतावियोगदुःख जटायुउद्धार .... .... .... ८७
४५ पार्वतीविरस .... .... .... .... .... .... ९०
४६ रामाचें पाणी .... .... .... .... .... ९१
४७ कबंधउद्धार व शबरीउद्धार .... .... .... ९१
४८ हंसत करावें तें रडत भोगावें .... .... .... ९२
४९ वानरसख्य .... .... .... .... .... .... ९३
५० सीताशोध .... .... .... .... .... .... ९५
५१ रामबिभीषण भेट .... .... .... .... ....१०१
५२ युद्धप्रकरण, प्रथमदिन युद्ध.... .... .... ....१०३
५३ द्वितियदिन युद्ध .... .... .... .... ....१०३
५४ तृतियादिनयुद्ध, कुंभकर्णवध.... .... .... ....१०५
५५ चतुर्थीदिनयुद्ध, अतिकायवध .... .... ....१०९

५६ पंचमदिनयुद्ध .... .... .... .... ....१११
५७ षष्टदिनयुद्ध, इंद्रजितवध .... .... .... ....११२
५८ सुलोचनासहगमन .... .... .... .... ....१२५
५९ सप्तदिनयुद्ध, अहिमहिवध .... .... .... ....१२१
६० पुरीफसवणूक, (चंद्रसेनेची).... .... .... ....१२६
६१ अष्टमदिनयुद्ध, रामरावणांची लढाई .... ....१२७
६२ कालनेमिवध .... .... .... .... ....१२९
६३ युद्धसमाप्ती .... .... ... .... .... ....१३१
६४ सीतारामभेट व रामराज्याभिषेक .... .... ....१३२
६५ मारुतीची देणगी .... .... .... .... ....१३३
६६ सीतात्याग .... .... ... .... .... ....१३४
६७ लहुंकुशजन्म व पराक्रम .... .... .... ....१३६
६८ शुष्कशी लढायी, लवणासुर वध .... .... ....१४०
६९ तपश्चर्येचें फल .... .... .... .... ....१४१
७० अन्नदान न केल्याचा परिणाम .... .... ....१४३

# प्रस्तावना.

—o—

ईश्वरानें केलेलीं चरित्रें व त्याचे गुणानुवाद जेव्हढे वर्णावें तेव्हढे थोडेच आहेत, ह्या रामचरित्रावर शंभर कोटी श्लोक आहेत व एकही श्लोक आहे. अर्थात गावें तेव्हढें थोडेंच आहे हें खरें. प्रस्तुत जें पुस्तक केलें आहे तें असें आहे कीं, रामविजयांतील एकंदर विषयाच्या गोष्टी यांत घेतल्या आहेत. क्वचित विषय गाळलेही आहेत. परंतु ह्या गोष्टी पासून रामविजय ग्रंथातील तात्पर्य सर्व ध्यानांत येत आहे. इतर जीं पुस्तकें वाचावयाचीं त्यापेक्षां हीं अशीं ईश्वरचरित्राचीं पुस्तकें वाचल्यापासून करमणूक होऊन पदरीं पुण्यही जोडतें हें उघडच आहे. तेव्हां सुज्ञ जन अशाच पुस्तकांकडे आपला काळवेळद्रव्य वगैरे खर्चून आपलें सार्थक करून घेतील अशी आशा आहे.

शिवाय आमचे देश बंधु व भागिनी ह्यांस अशी एक विनंती आहेकीं, सांप्रतच्या कालमाहात्मा वरून तूर्त स्त्रियांना पुरुषाप्रमाणें शिक्षण प्राप्त होण्या विषयीं शिक्षणांतील फायदा काय आहे हें जाणणाऱ्या एकंदर सुशिक्षित समाजांत मोठी चळवळ होऊन गेली आहे. व ह्या प्रमाणें आपल्या देशांतील पुष्कळ विद्यालंकारांनीं विशेष शोभायमान होऊं लागल्या आहेत.


स्त्रियांस विद्या नको, तूर्त त्यांच्या शिक्षणाची दिशा अमळ वेगळी आहे, ती जर पालटेल तर स्त्रीशिक्षणाबद्दलची कुरकुर अजिबात मोडून तें शिक्षणही खूपच झपाट्यानें चालेल. असो सांप्रत ज्या आमच्या भगीनी विद्यालंकारांनीं भूषित आहेत त्यांनीं नाटकें कादंबऱ्या अशीं अचरट पुस्तकें वांचून आपली थोरवी मोडण्या पेक्षा ज्यामध्यें मनोरंजन असून स्त्रियांचा सर्वांत श्रेष्ठ अलंकार जो पातिव्रत्य त्याचें माहात्म ज्यांत वर्णिलें आहे; जीं स्वधर्माचीं द्योतक, आणि त्यांतूनही पुण्यकारक अशीं पुस्तकें स्त्रियांनींच काय पण पुरुषांनींही वाचावीं, हें त्या सर्वांना खरोखरच सर्वोत्कृष्ट भूषण आहे. आणि यासाठींच करवतील तेव्हढीं स्वस्तीं अशीं वर दर्शित केलेलीं पुस्तकें छापवून प्रसिद्ध करण्याचा उद्देश धरिला आहे. त्याचें हें एक पहिलें प्रत्यक्ष आज सज्जन स्त्रीपुरुषांच्या सेवेस सादर केलें आहे. ह्यांस योग्य आश्रय मिळाल्यास हाच क्रम पुढें चालविण्यास विशेष उमेद येणारी आहे.


ग्रंथ प्रकाशक,


राम
सीता
भरत
लक्ष्मण
शत्रुघ्न
मा.



पा.
नं.
शंकर
कौ.
ऋ
दशरथराजा
गरुडं
ऋ.
ऋ.
वा.



श्रीरामलक्ष्मणसीतावनवासा
स जातात.
नागरिक
मंथरा
दशरथ
कैकेई



मारीच
राम
ल.
सीता
कपटी
रावण


वाली
सुग्रीव
मा.
रा.
नारा
रुमा


मा·
सीता




भ.
सी.

# अनुक्रमणिका.


| कथा | विषय. | पृष्ठ संख्या. |
|---|---|---|
| १ | वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषि | १ |
| २ | रामायणाची फाळणी | ८ |
| ३ | ऋषींची फसवणूक | ९ |
| ४ | अद्भुत लेकरें | १२ |
| ५ | तपश्चर्या | १३ |
| ६ | रावणाचा रडकेपणा | १६ |
| ७ | लग्नें | १९ |
| ८ | रावणाचीं दुष्ट कर्में | २० |
| ९ | रावणाची संतती व संपत्ति | २१ |
| १० | रावणाचा पराक्रम | २२ |
| ११ | थोडीशी फटफजीती | २३ |
| १२ | दशरथ कौसल्या विवाह | २६ |
| १३ | हें कसें झालें | २८ |
| १४ | रावणास शाप | १९ |
| १५ | श्रावणवध | २९ |
| १६ | श्रीरामजन्म | ३१ |

१७ मारुती जन्मकथन .... .... .... .... .... ३२
१८ पुत्रापेक्षांही वचन प्रीय .... .... ... .... ३३
१९ गाधी ब्राह्मणाचा कंठज महार .... .... .... ३४
२० श्रीरामाच्या सामर्थ्याचा मासला, ताटिका वध .... ३८
२१ आणखी थोडा मासला .... .... .... .... ४०
२२ अहल्योद्धार.... .... .... .... .... .... ४०
२३ आणखी रावणाची फटफजीती .... .... .... ४३
२४ रामसीता विवाह .... .... .... .... .... ४४
२५ रामरामांची झमंड .... .... .... .... .... ४५
२६ एमतेम काय तीं कैकयाच .... .... .... .... ४७
२७ दशरथप्राणत्याग .... .... .... .... .... ५१
२८ सर्व व्यर्थ .... .... .... .... .... .... ५३
२९ होणारासारखीं चिन्हें .... .... .... .... ५४
३० कैकयीची मुशारकी .... .... .... .... ५६
३१ थोड्यांत चुकलें नाहींतर मोठाच नाश व्हायचा
गुहभरताची लढाई.... .... .... ... .... ५९
३२ भरतलक्ष्मणांची लढाई .... .... .... .... ६०
३३ भरत भेट .... .... .... .... ... .... ६४
३४ वेडे ब्राह्मण.... .... .... .... .... .... ६६
३५ प्रवास व ऋषिदर्शनें .... .... ... .... ६७

# श्रीरामविजयसार

अथवा

## रामविजय ग्रंथांतील निवडक गोष्टी.

---

### कथा १ ली.

### ( वाल्याकोळ्याचा वाल्मीक ऋषि. )

वाल्मीक हा मुळचा ब्राह्मणाचा मुलगा होता. परंतु किरात म्हणजे कोळी जे पूर्वापर वाटमाऱ्यांचा धंदा करणारे त्यांची त्यास संगती प्राप्त होऊन ब्राह्मणाची खूण जें जानवें व आचार त्यांस एकीकडे झुगारून तो त्या कोळी लोकांत अग्रगण्य झाला. त्यावेळीं त्याचें वालाकोळी असें नांव प्रसिद्ध झालें असे. फारच तो उन्मत्त व विषयांध पुरुष! मोठमोठ्या भयंकर अरण्यांत तो छपून राहून कोणी प्रवासी धोरणांत येतांच त्याचा नाश करून टाकी. एका भयंकर पहाडाच्या गुहेंत त्यानें आपली बायको, मुलें ठेविलीं असत. सुमारें पन्नास कोश प्रदेशांतून जाणारा येणारा वाऱ्याच्या हातून क्वचित् सुटला असेल. त्यानें निश्चल

ब्राह्मणच किती ठार केले ह्याचीही गणणा होईना, मग इतरांची तर गणती लागणें कठीणच. रस्त्यांत त्याचे हेर अगदीं टपून बसलेलेच. शिकार हेरल्याची खूण पोचतांच वाल्याच्या तीरकामठ्यापासून तीर सुटून शिरछेद व्हायचाच. ढेकुण मारणें आणि मनुष्य मारणें हें त्याला सारखेंच वाटे. त्याच्या एकंदर त्या पन्नास कोशांच्या प्रदेशांत हाडकांचे पर्वतप्राय ढीग पडून गेले होते. इतकीं मनुष्यें त्या एकट्यानें ठार केलीं. पुढें तो जरी वृद्ध झाला तरी शिकार त्याचे दृष्टी पडून गेली अशी मुळींच नाहीं. असा जो महानिर्दय पुरुष, तो म्हणजे देवादिकांस वंद्य होऊन त्याच्या वचनास वेदप्रमाणें मान मिळावा हें कोणाच्या स्वप्नीं तरी येईल काय? असें असून असलाही पुरुष त्रैलोक्यपूज्य होऊन गेला. हें माहात्म केवळ साधु समागमाचें होय? ह्यावरून साधुसमागम हा केव्हढा थोर कीं, ज्याच्या क्षणमात्र दर्शनेंकरून पर्वतप्राय असंख्यात पातकें पण जळून खाक झालीं.

हा प्रकार असा झाला कीं, वाला नित्यक्रमाप्रमाणें एकेवेळीं आपल्या गुप्तस्थळीं शस्त्रें वगैरे तयारीनिशीं बसला असतां अकस्मात भगवान नारद मुनि कांहीं तापसी लोकांसह चालला होता. खरोखर वाल्याचें कांहीं पूर्वसंचित पुण्य असलें पाहिजे. येरव्हीं असा योगायोग व्हायचाच

नाहीं. नारदमुनि म्हणजे भक्तिरूप कल्पवृक्षाचा वतनदार, परमेश्वराच्या पूर्ण कृपेचा पूर्णअधिकारी. त्याची व ह्या असल्या निर्दय खाटकाची स्वप्नांतही गांठ पडावी काय ? परंतु वाल्याची पूर्व पुण्याई मोठीच, त्यामुळें अशी गोष्ट घडली. असो नारद तापसमंडळीसह त्या प्रदेशांत येतांच हेरांनीं वाल्यास इशारत दिली. तो तयारच, चटकन चित्त्यासारखा उडून नारदाचे अंगावर बाण रोखून पुढें धडकला. वाल्याची कीर्ति चोहींकडे प्रसिद्ध होतीच. त्यामुळें त्याला पाहतांच आपली आयुष्यमर्यादा आतां संपली असें जाणून बहुतेक ऋषि अंतकाळाची वेळा जाणून इष्टदेवतेचें चिंतन करूं लागले. तें देखील त्यांना धड सुचेना, बोबडीवळून कितीएक तर मृतप्राय होऊन पडले. इतक्यांत वाला दरडावून म्हणाला 'जें काय द्रव्य कोणापाशीं असेल तें त्यानें मुकाट्याच येथें ठेऊन द्यावें, नाहींतर हालहाल करून ठार मारीन' त्याच्या म्हणण्या प्रमाणें वागण्याला आवांकाही कोणाच्या आंगांत राहिला नव्हता. नेसल्या धोत्राचीही शुद्धि नाहीं तर जवळचें द्रव्य पुढें ठेवणार कोठलें ! तें आधींच त्यांचे हातून खालीं पडूनही गेलें होतें. असो असा प्रकार पाहून महाकाळासही ग्रासून टाकणारा श्रीनारद पुढें होऊन म्हणाला, रे वाल्या तुझ्या हातून आतां आम्ही सुटूं याचें तर नांवच

नको. तूं आमचें द्रव्य घेऊन आह्मांस खुशाल ठार कर. परन्तु तुला एक विचारतों ह्याचें उत्तर दे. विचारतों म्हणून इतकेंच कीं, तूं हा असा वाटमाऱ्यांचा धंदा करतां करतां आतां अगदीं म्हातारा झालास. बहुधा थोड्याच दिवसांत तुला मरण प्राप्त होऊन यमलोकीं जावें लागेल. आजवर तूं हा असा धंदा करून पापाचे पर्वतच्या पर्वत जवळ करून ठेवलेस, यमलोकीं गेल्यावर तुझ्या पापाची झडती होऊन जेव्हां तुला घोर शिक्षा होऊं लागेल तेव्हां तुला कोणी सोडवायाला येईल काय! तेथें तर अशा तुझ्यासारख्या पातक्याला तापलेल्या तांब्याच्या भुईवरून फरफरा ओढतात, तरवारीसारख्या धारेच्या वृक्षावर फेकून ओढून घेतात, गिधाडाकडून डोळे फोडवितात, अंगाची कातडी सोलतात, कडकडलेल्या तेलाच्या कढईत तळून काढतात. अशी एक का, कितीतरी प्रकारची जाचणी करतात. शर्थ आहे त्यांची! ऐकवत देखील नाहीं तेथचा निर्दयपणा! आजवर तूं अशी भयंकर पापें करून जें द्रव्य मिळविलेंस त्यांला मात्र पुष्कळ वांटेकरी झाले. पण जेव्हां तूं यमदूतांच्या हातचा मार खाऊन बेजार होशील तेव्हां त्या शिक्षेला कोणी वांटेकरी होईल कायरे? दे पाहूं ह्याचें उत्तर? वाल्या म्हणाला हो, माझी बायको, मुलें हीं वांटेकरी होतील. ऋषि

म्हणाले तूं अशी नुसती कल्पना करतोस, एकदां त्यांना विचारून ये बरें. जा खुशाल तूं परत येईपर्यंत मी येथून हलणार नाहीं, खुशाल जा. वाल्या नारदाचें बोलणें लक्षपूर्वक ऐकत होता. त्यामुळें तें तत्काळ त्याचे मनांत बिंबलें. व केवळ विश्वास म्हणजे काय हें ज्याला ठाऊक देखील नाहीं, अशा वाल्यास चटकन पश्चात्ताप होऊन त्याला आपली खात्री करून घ्यावीसें वाटून तो धांवतच घरीं जाऊन प्रथम बायकोस म्हणाला—अगे मी आजवर अनेक लोकांचे जीव घेऊन द्रव्य मिळवून तुजजवळ दिलें. तें तर तूं घेतलेंसच, पण आतां ह्या पापाबद्दल यमलोकीं मला जी भयंकर शिक्षा होईल त्याची तूं वांटेकरीण होशीलना? ती म्हणाली. अगे-बाई! मी त्याची वांटेकरी कां होईन? मी बायकोमनुष्य. तुम्ही पापानें द्रव्य आणतां किंवा पुण्यानें द्रव्य आणतां तें मला काय ठाऊक. तुम्ही जें आणाल त्यांतच कोंड्याचा मांडा करून तुम्ही व तुमचीं पोरें ह्यांच्या पुढें ठेवायाचा. तेव्हां तुमच्या पापाचा वांटा मी कां घ्यावा? वाल्याची बायकोवर फार प्रीति होती. तिच्या तोंडचें असें खडखडीत उत्तर ऐकून त्याची कंबरच खचली. नंतर मुलगा, सून यांसही त्यांनीं प्रश्न केला. तेव्हां तीं म्हणालीं. आम्ही काय पोरें, आम्ही जर पाप करूं तर तें आम्ही भोगूं? अशीं उत्तरें ऐकून वाल्याचे

पोटांत दुःखाचा डोंब पाजळला. त्यास पक्कें वाटलें कीं, आपलीं पापें फारच दुर्धर आहेत, व त्यांबद्दल यमलोकीं आपणास दुर्धर शिक्षा होणार. त्यावेळीं आपल्याला कोणी सोडवायला येणार नाहीं. इतकें त्याचे मनांत येतांच तीं सारीं पातकें त्याला दिसूं लागलीं. सारांश चिलटाप्रमाणें जो मनुष्यें रगडणारा मदांध पुरुष, ज्याचे अंतरंग पापांनीं गच्च भरून गेलें. अशा त्या पापरूप अंतःकरणगव्हरांत ऋषीच्या ज्ञानसूर्याचीं किरणें प्रविष्ट होतांच त्याच्या सर्व देहांत चकन उजेड पडला. आणि मग आतां नारदावांचून या दुर्धर संकटांतून आपणास कोणीच मुक्त करणार नाहीं, अशी त्याची पक्की खात्री होऊन तो धांवतच येऊन नारदाचे पायीं लागून म्हणूं लागला, महाराज अत्यंत दुर्लभ असा हा नरदेह मला प्राप्त होऊन तो मी अत्यंत वाईट अशा कामांत दवडला ही गोष्ट फारच वाईट झाली. जसें कल्पवृक्ष कांपून त्या रानांत बाभली लावाव्या, तद्वत हा प्रकार झाला. पण जें झालें तें झालें, आतां इतकेंच कीं, मजवर कृपा करावी. असें बोलून हंबरडा फोडून रडूं लागला. नारदमुनि हे परदुःखानें दुःखित, त्यांना ते वाल्याचे शोकशब्द ऐकून वाल्यापेक्षांही दुःख झालें. मग त्यांनीं केवळ ‘राम’ इतकींच अक्षरें त्यास घोकावयास सांगितलीं. परंतु तो शब्द त्याला उच्चारतांच

येईना? मग जीं तुझीं बायको पोरें, तुझ्या सुखाचा वांटा घेण्यास मात्र तयार व दुःखाला मागें, त्यांना 'मरा' असें निरंतर म्हणत जा. मी येईपर्यंत येथेंच बसून रहा, हलूं नको, इतकें बोलून स्वामी आपल्या मंडळीसह निघून गेले. इकडे वाल्या 'मरा, मरा' म्हणतां म्हणतां त्याचे तोंडातून राम राम असा ध्वनि स्पष्ट उमटूं लागला. तो उभा होता त्याच जागेवर बसून राहिला. तो इतके दिवस कीं, अंगावर भलें मोठें वारूळ वाढून गेलें. नारद तरी लवकर कशाला येतात? कैकवर्षांनीं ते तेथें आले. तों वारुळाच्या शिद्रांतून 'राम राम' अशीं अक्षरें त्यांचे कानीं येऊन त्याला हा पूर्वींचा वृत्तांत आठवला. त्यानें तात्काळ वारूळ उकरून आंतून वाल्यास बाहेर काढलें. इतकें दिवस तो वांचावा असें नाहीं, परंतु त्याच्या सर्व अंगांत रामनामामृत गच्च भरून गेल्यामुळें त्याचा नाश करण्यास काळाच्यानें धजवेना! असो, मग आतां मात्र हा कृपा करण्यास योग्य झाला असें जाणून नारद म्हणाले, वाल्या आतां तुला सांगतों कीं, आजपासून सुमारें एक हजार वर्षांनीं श्रीमान विष्णु हे अयोध्येचा राजा दशरथ याचें पोटीं अवतार घेणार आहेत, त्या वेळीं ते 'राम' हेंच नांव धारण करतील, इतकें बोलून त्या संबंधीं थोडक्यांत मजकूर कळवून त्यास श्रीरामचरित्र रचावयास

सांगितलें. वाल्यानें 'ही एक उत्तम तपश्चर्याच' असें जाणून श्रीरामचरित्रावर शंभरकोठी श्लोक रचले. ते त्रैलोक्यांत मान्य होऊन त्या दिवसापासून 'वाला कोळी' हें त्याचें नांव नष्ट होऊन वारूळ याला संस्कृत शब्द वल्मीक आहे, त्यापासून तो निघाला अतएव वाल्मीकऋषि, आदिकवि अशीं त्यास नांवें प्राप्त होऊन तो मोठ्याच प्रतिष्ठेस चढला.

---

## कथा २ री.

## ( रामायणाची फाळणी. )

वाल्मीकानें रामायण रचलें, तो ग्रंथ अतिसुरस असून रामकथायुक्त असल्यानें मोठाच पुण्यकारक आहे अशी लागलींच चोहोंकडे ख्याति होऊन गेली. त्यामुळें हा ग्रंथ सगळ्याच्यासगळाच आपल्या जवळ असावा, असें स्वर्ग मृत्यु पाताळ येथील लोकांस वाटून ते आपापला हेतु साधण्यास खटपट करूं लागले. होता होता त्रिवर्गांची मोठीच कटकट माजली. शेवटीं सर्वांसच सारखा विभाग मिळून तंटा मिटावा हासाठीं श्रीशंकराकडे हा खटला गेला. शंकरानें लागलेच त्या ग्रंथाचे सारखे तीन भाग केले, प्रत्येक भाग ३३३३३३३३३ श्लोकांचा होऊन बत्तीस अक्षरांचा एक श्लोक शिल्लक राहिला. त्याचीं दहादहा अक्षरें प्रत्येकास

वांटलीं, शिलक 'राम' अशीं दोन अक्षरें उरलीं. तीं येव्हढ्या मेहनतीबद्दल सर्वानुमतें शंकरानें आपलेकडे घे-तलीं. समुद्रमंथनकाळीं शंकराच्या वांट्यास कालकूट विष आलें होतें, तें शंकरानें प्राशन केल्यामुळें त्यांच्या अंगाचा एकसारखा दाह होऊन राहिला होता, त्यांनीं पुष्कळ शीत उपचार केले होते, परंतु व्यर्थ! हें रामनाम शंकराकडे ये-तांच विषदाह शांत होऊन त्यांना परम समाधान झालें. असो पण अखेर अशी गंमत उडाली कीं, येव्हढ्या शतकोटी रा-मायणांत राम मुळींच नसून तो शंकराकडेच गेला. म्हण आहे कीं 'छी त्यांत कांहीं राम नाहीं.' तसेंच हें झालें.

---

## कथा ३ री.

## ( ऋषीची फसवणूक. )

तृणबिंदु ऋषीची कन्या देववर्णी हिचेपासून पौलस्ती नामें पुरुष उत्पन्न झाला, त्याचा मुलगा विश्रवा, व त्याचा पुत्र कुबेर; कुबेरानें गहन तपश्चर्याकरून ब्रह्मदेवास संतुष्ट केलें. हा ब्रह्मदेवाचा नातु होता हें एक व त्यानें तपश्च-र्याही उत्तम केली. त्यामुळें ब्रह्मदेवास परम समाधान वा-टून त्यानें समुद्रांत लंका नांवाचें अत्यंत उत्तम शहर बनविलें होतें तें कुबेरास दिलें. लंका हें नगर ब्रह्मदेवानें पुष्कळ

दिवसांपूर्वी निर्माण केलें होतें, तें फारच सुंदर असल्यामुळें दैत्यांनीं बलात्कारेंकरून तें आपले ताब्यांत करून घेतलें होतें. तें ह्यावेळीं देवानें दैत्यांपासून हिरावून घेतलें. असो शिवाय ब्रह्मदेवानें पुष्पक नांवाचें एक उत्तम विमानही कुबेरास दिलें. दैत्य लंकेहून जे निघाले ते पाताळीं जाऊन राहिले. नंतर कालांतरानें सुमाळी नांवाचा एक दैत्य ब्राह्मणवेष स्वीकारून मृत्युलोकावर येऊन हिंडत असतां आकस्मात लंकेंत आला. लंकाही आपली नगरी असून येथें दुसरा राजा राज्य करतो हें पाहून त्याच्या कपाळांत तिडीक उठली. नंतर हा कोण राजा वगैरे नीट शोध करून त्यानें विचार केला कीं, लंका आपले हस्तगत होण्याला येथें सवतमत्सर उत्पन्न केलें पाहिजे. असा विचार करून कैकसीनामेंकरून त्याची एक कन्या होती, तिच्यासुद्धा आपण ब्राह्मण वेषधरून तो कुबेराचा बाप विश्रवा ह्याचेकडे जाऊन दीनवदन करून म्हणाला महाराज मी अत्यंत दरिद्री ब्राह्मण आहें, माझी ही एकुलतीएक कन्या आहे. हिचा आपण स्विकार करावा अशी माझी आपले चरणीं प्रार्थना आहे. तें त्याचें दीन भाषण ऐकून विश्रव्यास फार वाईट वाटलें, व कैकसीचें रूप पाहून थोडीशी स्वारी खुललीही. आणि मग तें अत्यंत तारुण्यदशा प्राप्त

झालेलें कन्यादान मोठ्या प्रेमानेंच घेतलें. नंतर आपण कृतकृत्य झालों असें जाणून सुमाळी आनंदानेंच पाताळीं गेला. इकडे अनायासेंच सुंदर नवी तरणी बायको घर बसल्या आपणास प्राप्त झाली म्हणून ऋषीलाही बराच मोठा आनंद झाला.

ह्या नंतर थोडक्याच दिवसांनीं ऋषि सायंकाळच्या स्नानसंध्यार्थ नदीवर जात असतां कैकसीनें दरवाजांतच ऋषीस अडवून शयनमंदिराकडे चालण्याचा आग्रह केला. त्यावेळीं हा असा प्रकार म्हटला म्हणजे फारच अनुचित, ही आसुरी वेळा, ह्या प्रसंगीं गर्भधारणा होऊन जो पिंड निर्माण होतो, तो महा दुष्टाचरणी होतो. सबब त्याला राक्षस म्हणतात. व असल्याच प्रकारच्या स्त्रीपुरुषांना ह्या अशाचवेळीं विलासादि गोष्टी करण्याची इच्छा उद्भवते. हें जाणून ऋषि तिला म्हणाला गे तूं भलत्यावेळीं भलत्याच गोष्टीचा नाद धरलास ह्यावरून खचित तूं राक्षसी आहेस, व ह्यावरून तुला असेंही सांगतों कीं, तुला जी संतती होईल, तीही अशी दुष्ट, निर्दय, पापकर्माचारी अशीच होईल. असो. स्वकीय स्त्रीची अशी इच्छा पुरुषानें पूर्ण केली नाहीं तर त्याचे माथीं भ्रूणहत्येचें पाप येतें, असें शास्त्र असल्यामुळें ऋषीस तिचे म्हणण्यास रुकार देणें

भाग आलें, परंतु सुमाळी दैत्यानें आपणास सज्जड फसविलें म्हणून त्यास भारी वाईट वाटूं लागलें. कैकसीनेंही आपल्या तारुण्यानें त्याला चांगलेंच फसविलें.

---

## कथा ४ थी.

## ( अद्भुत लेंकरें. )

कैकसीनें भलत्याच वेळीं भलत्या गोष्टी बद्दल ऋषीस अडविलें ह्यामुळें संतापून तुझ्यापासून होणारी संतती शुद्ध ब्रह्मराक्षस होईल असा ऋषीनें तिला शाप दिला. तो काय ब्रह्मशाप, कैकसीला त्याचा अनुभवही आला. तिला जो पहिला पुत्र झाला, त्याला दहा तोंडें व वीस हात! असें तें विचित्ररूप पाहूनही कैकसीला फारसें वाईट वाटलें नाहीं. पुढें तिला दुसरा मुलगा झाला, त्याचे घागरी येव्हढे कान! त्यावरून त्याचें नांवही कुंभकर्ण असेंच ठेवलें. फारच विचित्र पुरुष तो! जन्मतांच मुलानें तोंड वासून जी किंकाळी फोडली तेणें करून ब्रह्मांडगोळ गर्जून गेला! प्रळयकाळच्याच मेघांची ही गर्जना असेंच सर्वांस भासलें. असो नंतर शूर्पणखा, ताटिका ह्या दोन कन्या कैकसीला झाल्या. त्यांचीं रूपें पाहतांच काळाला भय वाटेल अशा त्या विलक्षण पोरी! त्यांचीं रूपें जशीं भेसूर तशींच त्यांची

कर्मेंही भेसुरच, असल्या प्रकारची संतती पाहून कैकसीस परम खेद झाला, व ह्या बद्दल तिनें पतीची भारीच विनवणी केली. तो ऋषि महा तेजस्वी, कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्य, त्यास बायकोची दया येऊन त्यानें तिचें आचरण शुद्ध करून तिचेवर कृपा केली, तेणें करून बिभीषण नांवाचा तिला एक पुत्र झाला. तो मात्र त्या सर्वांच्याच उलट, दैत्यांत जसा प्रल्हाद तसाच हा कैकसीच्या संततींत महा पवित्र पुरुष निर्माण झाला.

---

## कथा ५ वी.

## ( तपश्चर्या. )

रावण, कुंभकर्ण, बिभीषण ह्या तिघांनीं कांहींका दिवसांनीं तपश्चर्या आरंभिली, रावणानें शंकराची आराधना चालविली, कुंभकर्णानें ब्रह्मदेवाची आणि बिभीषणानें श्रीविष्णूची चालविली. त्यांचीं सामर्थ्येंही चमत्कारिक आणि नैमिष्टपणाही तसाच. जे एकदां ते एका स्थळीं बसले ते दैवतसिद्धी होईपर्यंत जागचे हललेच नाहींत. त्यांचें तप जेव्हां अतिशय उग्र झालें, तेव्हां त्या तिघांनाही वर देण्यासाठीं ब्रह्मदेव त्यांचे कडे येऊन 'जें काय तुमचें इष्ट असेल तें मागुन घ्या,' असें त्यांस म्हणाला. ते आपल्या तप-

सामर्थ्यानें पाहिजे तें मागून घेण्याचे हक्कदार झाले होते, म्हणून प्रथम रावण म्हणाला. इंद्रादिक संपूर्ण देवांस अटकेंत ठेवण्याचें माझेठायीं सामर्थ्य असावें, त्यांनीं माझी आज्ञा पाळलीच पाहिजे, संपूर्ण कळा मला करतलामलकवत असाव्यात, संतती, संपत्ती ह्यांची मला बालाग्र न्यूनता नसावी. असें त्यानें म्हणतांच देवांचें धाबें दणाणलें! ब्रह्मदेवानें असा वर त्यास देऊं नये असें त्यांचें मत होतें. ब्रह्मदेवांचेंही मानस तसें होतें, परंतु जें मागूं तें मिळालेंच पाहिजे, असा तो हक्काचा मागणेकरी होता, याचक नव्हता. तेव्हां ब्रह्मदेवास त्याचें वचन मान्य करणें भाग पडलें. ब्रम्हदेवानें रुकार देतांच देवांना दुसरीच एक दहशत बसून गेली. ती ही कीं, रावणानें जें मागितलें त्यांत देवांचे प्राण जतन रहात होते. पुढें आतां कुंभकर्णास कांहीं द्यावयाचें आहेच, तो देवांना कडकडा खाऊन टाकायचेंच मागणें कशावरून मागणार नाहीं? कां कीं, आतां तेव्हढेंच कायतें विशेष उरलें आहे. ह्या चिंतेनें देवांचीं मुखें म्लान होऊन गेलीं. मग कुंभकर्णाची बुद्धि भ्रष्ट होऊन त्यानें देवांस अनिष्ट असें कांहीं मागणें मागूं नये म्हणून बुद्धीची स्वामिणी जी ब्रह्मकुमारी सरस्वति हिला सर्व देव शरण गेले. तों इकडे ब्रह्मदेवानेंही कुंभकर्णास इष्ट गोष्ट मागून घेण्यास सांगितलें.

त्यावेळीं त्याचे मुखांतून काय शब्द निघतात ते ऐकण्या-विषयीं देवांचे कान एकसारखे लागून गेले होते. मग सर-स्वतीनें त्याची बुद्धि भ्रष्ट केल्यामुळें आपण काय मागावें, ह्याचें त्यास भानच राहिलें नाहीं, तो झटकन म्हणाला दुसरें कांहीं नको. मी अखंड निद्रामग्न असावें. त्याच्या तोंडचे शब्द ऐकेपर्यंत ब्रह्मदेवाचा जीव देखील अगदीं गोळा हो-ऊन गेला होता. मग त्याचे ते शब्द ऐकतांच ब्रह्मदेवाच्या जिवांतजीव येऊन तो म्हणाला 'तथास्तु.' ब्रह्मदेवाचा त-थास्तु शब्द आणि कुंभकर्ण जमीनीवर, एकाच वेळीं पडला. त्याला गाढ झोंप लागली. जणू जसा तो प्रचंड पर्वतच पस-रला कीं काय! त्याच्या घोरण्यानें तें रान कलकलून गेलें असे. नाकांतून जो श्वासोश्वास चाले त्याच्या वेगानें रानरेडे वगैरे पशुपक्षी त्याचे नांकात शिरून आंत बाहेर येत. जणूं तें एक साळ्याचें धोटेंच बनलें. कुंभकर्णास त्या गोष्टीची दादही नव्हती! वाईटच तें! झोंपेसारखें नाशकारक द्वाड व्यसन दुसरें नाहीं. ती केवळ अज्ञानाची माता होय. पुण्यकर्माची आडकाठी, हिताची दुस्मानीन, आयुष्याची कातरच होय. येव्हढा कुंभकर्ण अद्वितीय पुरुष! पण ह्या व्यसनानें केवळ पाषाण मय होऊन गेला. अहोरात्र त्याला झोंप. खाणेंपिणें देखील नाहीं. ही त्याची अवस्था पाहून हा आपल्याला पुत्र व्यर्थ

झाला असें जाणून त्याचे बापास फार वाईट वाटलें. म्हणून त्यानें ब्रह्मदेवाची कृपा संपादन करून सहा महिन्यांनीं तरी एक दिवस तो जागा रहावा असें मागून घेतलें. त्यादिवशीं मात्र त्यानें सर्व सुखें भोगावीं. असो.

विभीषण हा मुळचाच पवित्र पुरुष, तो भलतें सलतें कांहीं मागणार नाहीं अशी सर्वांचीच खात्री होती. व शेवटीं झालें ही तसेंच. 'तुझें काय इष्ट तें माग' असें ब्रह्मदेवानें त्याला म्हणतांच तो म्हणाला मला दुसरें कांहीं नको, निरंतर श्रीविष्णूचें चिंतन मला घडावें, आणि ह्या कामक्रोधादिकांचा लेश मात्र ताप न घडावा. येवढी देणगी द्यावी हें त्याचें भाषण ऐकून ब्रह्मदेवास परम समाधान झालें, सर्व देवांसही संतोष वाटला. ब्रह्मदेवांनीं तत्काळ त्याला पोटाशींच धरलें. त्याला फारच समाधान वाटलें. त्यानें त्याची मागणी तर पुरी केलीच, पण शिवाय असेंही सांगितलें कीं, कालें करून श्रीविष्णूचा अवतार श्रीरामचंद्र ह्याची तुझी गांठ पडून तो यावत् चंद्रसूर्य तावत् तुला चिरंजीव करील.

---

## कथा ६ वी.

## ( रावणाचा रडकेपणा. )

'देखनेमे ठब्बू और चलनेमे शिवराई' ह्या ह्मणी प्रमाणेंच

रावणाची स्थिति असे. दहा तोंडें असल्यामुळें बोलण्याचा सुकाळ, हातही वीस होते, परंतु असें कर, तसें कर, इकडे जा तिकडे जा असें बोलतांना मागेंपुढें नाचवण्यास ते हात चांगले उपयोगी पडत. शिवाय त्याचा डामडौल खूप. वरप्रदान प्राप्त होतांच देवांना गिळूं कां चावूं असें त्याला होऊन गेलें होतें. त्याच्या अजोळा कडली मंडळी रावणाची अशी स्थिति येण्याचीच वाट पाहत होती, पाताळांतून भूमीवर, भूमीवरून पाताळीं त्यांच्या सदोदित घिरट्या चालल्या असत. मत्सराच्या गोष्टी सांगून त्यांनीं रावणाचे कान भरून टाकले असत. रावणाची अशी उर्जित स्थिति येतांच पाताळांतून भराभर मंडळी वर धांवली. प्रहस्त, महोदर, माल्यवंत, जंबुमाळी, शुक, सारण इत्यादि प्रमुख प्रमुख मंडळी राक्षसांचे तांडेचे तांडे घेऊन रावणाचे भोंवतीं जमले. त्यांचा मुख्य उद्देश लंका घेणें. लंकेतून ज्या त्यांना गचांड्या बसल्या त्या त्यांच्या मानेवर फार खुपत होत्या. रावण हा त्यांचा राजा आणि ती रावणाची प्रजा, नुसती प्रजाच नव्हे, तर तीच प्रधान सेनापत्यादिक मंडळी व तीच जिव्हाळ्यांची मित्र मंडळी. त्यांनीं लागलाच लंकेवर मोर्चा फिरवला, राक्षसच ते, विचार करून काम करायचें, त्याची बोलीच नाहीं. ते असें मानीत कीं, आम्ही केवळ

सिंह, इतर सारीं कोमर्डीं आहेत, त्यांची कत्तल करण्याला विचार तो काय करायचा, धर कीं, टाक तोंडांत हें काय तें करायचें? अशा समजुतीनें ही ऐबूगैबू मंडळी लंकेवर धांवली. तेथें देवाच्या जामदारखान्याचा अधिकारी कुबेर होता. परवानगी वांचून कोटाचे आंत उंदीर देखील सरकायचा नाहीं. असला तेथचा आटोकाट बंदोबस्त, ही मंडळी तेथें जातांच तेथील लोकांनीं त्याना धुसकन घुसकाऊन लाविलें. त्यामुळें रानरेड्यासारखा ह्यांना भारीच संताप आला. रावणानें होतें तेव्हढें बळ खर्चून पाहिलें पण कोटाचें ढेकूळ देखील हातीं लागलें नाहीं, मग जामदारखान्यांतील रत्नें तर कुठून? असो. येथें आपले कांहीं चालत नाहीं अशी सर्व मंडळीसह रावणाची पक्की खात्री झाली. त्यामुळें रावणराजानें मुकाट्याच बापाकडे जाऊन रडगाणें गाऊन लंकेबद्दल मागणी केली. तेव्हां जर आतां आपण ह्याला नाहीं म्हणतों तर हा महानष्ट पुरुष एखादे वेळीं घात करील असें जाणून त्यानें रावणास लंका देण्याविषयीं कुबेरास आज्ञापत्र लिहून दिलें. तें पत्र हातीं येणें हाच रावण महाराजांचा शूरपणा. त्यानें तें स्वताच जाऊन कुबेरास देऊन ह्मटलें, हं चल हलतोस कीं नाहीं येथून? कुबेरानें पत्र वाचून पितराज्ञा म्हणून त्यानें तत्काळच आपलें जें काय

होतें तें पुष्पकांत घालून लंका खालसा करून दिली. कुबेर तेथून जो निघाला तो ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवानें त्याची ती विपत्ति लक्षांत आणून हिमालयाचे उत्तरेस कैलास पर्वतावर अलका नांवाची नगरी बांधून त्याला दिली.

---

## कथा ७ वी.

### ( लग्नें. )

ज्याला त्याला असें वाटतें कीं, आपली मुलगी राजाचे घरीं पडावी. त्या प्रमाणेंच मय नांवाचा एक असुर शिल्पशास्त्रांत मोठा प्रविण होता. तो आपले मंडोदरी नामक कन्येला असाच जगतैक वीर पति पाहत होता. रावणाची कीर्ति ऐकतांच त्यानें आपली कन्या रावणास देऊन शक्ति नांवाचें महा भयंकर शस्त्र अंदण दिलें. यद्यपि तें शस्त्र तरी तें एक राष्ट्रच होय. बळीचा मुलगा विरोचन, त्याची मुलगी दीर्घज्वाळा ही त्यानें कुंभकर्णास दिली आणि एका गंधर्वानें सरमा नामें आपली कन्या बिभीषणास दिली. यांत दीर्घज्वाळा व सरमा अगदीं पति स्वभावानुरूप होत्या. मंडोदरी मात्र आपल्या पतीच्या स्वभावाच्या उलट असे. पण पतिव्रता पहिल्या प्रतीची.

---

## कथा ८ वी.

## ( रावणाचीं दुष्ट कर्मे. )

ह्यानंतर रावणानें संपूर्ण राष्ट्रें पादाक्रांत करून टाकलीं, सकळ राजांना रावणास करभार द्यावा लागे. करभार भरायला लंकेस यायचें म्हणजे भराऊन त्यांच्या अंगावर कांटे उभे राहत. गाय आणि ब्राह्मण दृष्टीं पडला कीं, त्यानें रगडलाच दाढे खालीं, असा तो एक आपला मनुष्यांतील व्याघ्रच बनला होता. ह्या मुळें पृथ्वीवर मोठा आकांत ओढवला. त्यांना लपायला थारा मिळण्याची मोठी मुष्कील पडली. असा हा रावणानें प्रळय मांडलेला ऐकून कुबेरानें रावणाची कान उघाडणी करण्यासाठीं आपल्या प्रधानास त्याचे कडे पाठविलें. रावणानें प्रळय तर मांडलाच पण ब्राह्मणाचें पवित्र असें शास्त्र जे वेद त्यांमध्यें हात घालून स्थळोस्थळीं आपणास इष्ट अशी त्याची रचना करून ठेवली. कुबेराचा प्रधान बोलतांना प्रथमच म्हणाला कीं, आपण ऋषींचे कुमार असतां ही शास्त्रं ज्ञानानें एकीकडे झुगारून वेदांचीं खंडे केलीं ( त्यांत आपणांस इष्ट असा नवा मजकूर करून घातला ) येणें करून केवळ ज्ञातेपणाचा आपण अभिमान बाळगतां इतकेंच कायतें. गोब्राह्मणांचा नाश करतां हें फारच अनुचित, कांहीं सम-

जूनउमजून दांडगेपणा करता, त्याबद्दल काडीचाही आप-
णांस खेद वाटत नाहीं. इत्यादि आणखी कांहीं तो बो-
लणार तोंच रावणानें विंगळासारखे डोळे लाल केले. सोंड
पिळली असतां हत्ती जसा संतापतो, तसाच तो संतापला.
आणि तत्काळ सेना सिद्ध करून त्यानें रातोरात कुबेरावर
छापा घालून पुष्पक विमानांत त्याची सर्व संपत्ती घालून
तो परत आला. कुबेराची ह्या वेळीं फारच दैना झाली. तो
ह्या वेळीं इंद्रास शरण गेला. इंद्रानें मग त्याला आपल्या
भांडारखान्यावर नेमलें.

---

## कथा ९ वी.

## ( रावणाची संतती व संपत्ती. )

संतती संपत्ती काय ती एक रावणचीच, तशी आजवर
कोणाची झाली नाहीं व व्हावयाचीही नाहीं. अचाटच
त्याचें सारें! एक लाख त्याला पुत्र होते, सव्वा लाख नात-
वंडें, ऐंशी हजार बायका, त्याचा पहिला मुलगा मेघनाद,
महापराक्रमी पुरुष तो! आठरा अक्षौहिणी वाजंत्री अहोरात्र
गजर करीतच आहेत, नव खंड पृथ्वीवरील राजे हात जोडून
भेटीसाठीं दरवाजाशीं उभे आहेतच, सूर्य अस्तास गेला नाहीं
तोंच आठ हजार राक्षस कापराच्या दिवट्या पाजळून खडे

उभे. केवढा प्रचंड त्याचा सभामंडप, अशोक नांवाचें त्याचें एक उपवन असे. त्याचें तीस कोसांचें क्षेत्र असे.

---

## कथा १० वी.

### ( रावणाचा पराक्रम. )

संपूर्ण देवांस आपले कबजांत ठेवावयाचें असा रावणाचा हेतु होता; तो कांहीं कुरापत काढून लढाईला योग्य असा प्रसंग शोधीतच होता. इतक्यांत अनायासेंच अशी गोष्ट झाली कीं, पर्वतांस फार प्राचीनकाळीं पंख होते, ते छेदून टाकण्याचा इंद्रानें सपाटा चालविला. त्या भयानें सारे पर्वत रावणास शरण गेले. रावणास असेंच कांहीं पाहिजे होतें. त्यानें तत्काळ सर्व पर्वतांस हत्ती व्हावयास सांगून त्यावर आपले प्रचंड वीर वसवून त्यानें इंद्रावर स्वारी केली. त्या वेळीं मेघनादानें ऐरावतासह इंद्रास पाडलें. असें एकच वेळां कां, एक हजार वेळां मेघनादानें इंद्रास जिकलें. त्यावरून त्याचें मेघनाद हें नांव लोपून इंद्रजित हें एक नवेंच नांव त्याला प्राप्त झालें. इंद्राची अशी विपत्ति पाहून ब्रह्मदेवानें रावणास कांहीं इष्टवर देऊन त्याची सुटका केली. रावणानें ह्या संधीस सगळेच्च देव आपले कबजांत घेऊन त्यांचेकडे कामें सोपविलीं तीं अशीं: इं-

द्रानें नित्य सुंदर सुंदर पुष्पांचे लागतील तेव्हढे हार गुंफून आणीत असावें. चंद्रानें छत्र धारण करावें, वरुणानें लागेल तेव्हढें पाणी वहावें, सूर्यानें देवढीवर रहावें, कुबेर व वायु ह्यांनीं झाडलोट करीत असावें, अग्नीनें वस्त्रें धुवावीं; ब्रह्मदेवानें उपाध्यायपणा पत्करला, बृहस्पतीनें शास्त्रार्थ सांगावा, नारद तुंबर ह्यांनीं रावणापुढें गाणें गावें. ह्याप्रमाणें चोहींकडे त्यानें आपला सारखा वचक बसून टाकला.

---

## कथा ११ वी.

## ( थोडीशी फटफजीती. )

एकदां पुष्पक विमानांत बसून रावण कैलासीं शिवदर्शनास गेला. तेथें दरवाजावर नंदी होता. तो म्हणाला रावणा थांब, शंकर पार्वती एकांतीं आहेत, ह्या वेळीं जाऊं नको. रावणास त्याचा मनस्वी राग येऊन तो ह्मणाला चल माकडा, तुझें मी ऐकूं काय? चल हो एकीकडे. ते शब्द नंदीला फारच सलले. व त्यानें त्याला शापही दिला कीं, तूं नर वानर तुच्छ समजतोस तर तेच तुला मारतील, तूं दहा शिरें तोडून दहा रुद्र संतुष्ट केले, पण रुद्र अकरा असल्यामुळें एक जो शिलक राहिला तोच तुला वानर होऊन ठार करील. हें एकून रावण खूप चिडला जाऊन तो

म्हणाला आतां कैलासासह शंकरपार्वतीला उचलून लंकेंत नेऊन ठेवतों, असें बोलून तो पर्वत लागलाच उचलला. हें शंकरास कळतांच त्यांनीं पर्वतावर पायाचा दाब देऊन रावणास जागचेजागींच दडपून धरलें. तो एक हजारवर्षें तेथेंच पडला होता. नंतर त्यानें शंकराची पुष्कळ स्तोत्रें गायलीं. तेव्हां शंकरानें त्याला तेथून हुसकून लावलें.

एकदा रावण रेवानदीचे कांठीं वाळूचें लिंग करून त्याची पूजा करून ध्यान करीत बसला. इतक्यांत सहस्र-अर्जुनानें जलक्रीडा करतांना नदीचें पाणी अडविलें. तेणें करून रावण आकंठ बुडाला. रावणास येणें करून फारच संताप येऊन तो सहस्रार्जुनाचें अंगावर धांऊन आला. व म्हणाला मूर्खा तूं हें काय केलेंस. तुला कांहींच भीति नाहीं काय? सहस्रार्जुन महापराक्रमी, त्यानें चटकन त्याचें मान-गुट धरून कोंबड्यासारखें त्याला उचलून कोंडून टाकलें. नंतर बरेच दिवसांनीं पौलस्ती विश्रवा जो त्याचा बाप त्यानें केवळ भिक्षा मागून रावणाला सोडवून आणलें.

ह्यानंतर एकदा पाताळी बळीकडे गेला, तों दरवाजावर महाराजच द्वारपाळ उभे होते. त्याला म्हणाला रे जा बळीला येथें घेऊन ये, नाहीं तर हें नगर समुद्रांत फेकून देईन. द्वारपाल म्हणाला बाबा तुझा तूंच आंत जाऊन काय

बोलायचें तें बोल. तें ऐकून रावण बळीजवळ जाऊन म्हणाला रे बळी मी तुझ्या जवळ युद्ध करायला आलों, चल उठ, त्यावेळीं बळी आपली स्त्री विंध्यावळी हिचेशीं सारिपाट खेळत होता. इतक्यांत त्यांचा एक फासा अंमळ लांब उडाला तेव्हां बळी म्हणाला, रावणा तेव्हढा फासा इकडे घे पाहूं, रावणानें वीस हातांनींही प्रयत्न केला पण त्याला तो फासा नुसता हललाही नाहीं. बळी म्हणाला मूर्खा माझा खेळायचा फासा तुला उचलेना तो तूं मजशीं युद्धाला आलास काय? तें ऐकून स्वारी मुकाट्याच तोंड खालीं घालून माघारी फिरली. वाटेंत बळीचीं कोणी चाकर माणसें त्याला भेटलीं, त्यांनीं त्याचीं सर्व पांघरुणें छिनाऊन घेतलीं. आणि तोंडाला काळें लाऊन बांधून त्याला सर्व नगरभर हिंडवलें. कोण त्याची त्या वेळीं दुर्दशा! कोणी अंगावर धूळ टाकी, तर कोणी शेंडी दाढी ओढी, कोणी उटबशा काढवून घेत, कोणी शेण तोंडाला चोपडीत. तेणें करून तो अगदीं काकुळतीस येऊन कसातरी पळावयास पाहूं लागला. पण द्वारपाळ कसला छट, तो त्याला जाऊं देईना, मोरी शेरीतून जरी तो घुसे तरी तो सर्व व्यापक द्वारपाळ तेथेंही त्याच्या हातांपायांवर दांडकें मारी. अशी त्याची तेथें अवस्था होऊन गेली. शेवटीं त्या नगरींत तो

अगदीं छपून होता. इतक्यांत एक बाई पाण्याची घागर डोक्यावर घेऊन जात असतां ही स्वारी अवचित तिचे दृष्टीं पडली. तिनें हें दहातोंडांचें कांहीं चमत्कारिकच किडूक जाणून बगलेंत मारलें. शेवटीं विश्रव्यानें बळीची पायधरणी करून ह्या शूराची सुटका करून घेतली. विश्रव्यानें त्याला जेव्हां तेथें पाहिलें तेव्हां तो बळीच्या तबेल्यांत छपून बसून मुठींत चणे घेऊन खात होता. तो बापाला पाहतांच हुंदके फोडफोडूं रडूं लागला.

एकदा वाली वानराची रावणाची गांठ पडून रावण उगाच त्याचेवर जळफळूं लागला. तें पाहून वालीनें त्यास बगलेंत घालून चार समुद्र हिंडून येऊन खेळण्याप्रमाणें अंगदाच्या पाळण्यावर खालीं डोकें व वर पाय करून टांगलें. अंगदाच्या मुताची धार चटकन त्याच्या तोंडावर यावी. शेवटीं विश्रव्याला वालीचेही पाय धरावे लागले. मग वालीनें किष्किंधेहून जो झोंकला तो विचारा लंकेंत येऊन आदळला.

---

## कथा १२ वी.

## ( दशरथ कौसल्या विवाह. )

रावणानें सहज एकदां ब्रह्मदेवांस विचारलें कीं, माझा

मृत्यु कोणाच्या हातानें होईल. तो म्हणाला अयोध्येच्या अजपाळ राजाचा मुलगा जो दशरथ त्याचा मुलगा श्रीरामचंद्र त्याचेपासून तुला मृत्यु आहे. तें ऐकून दशरथाचें लग्न झालें नाहीं तोंच त्याला ठार करण्याचा रावणानें संकेत केला. ह्या नंतर थोड्याच दिवसांत दशरथाचें लग्न ठरून समारंभ चालू असल्याचें वर्तमान हेरांनीं रावणास कळविल्यावरून तो सैन्य घेऊन अयोध्येस निघाला. इकडे ह्या लग्नांत कांहीं घात होईल असें सांगून वधुवरें व बेताचींच मनुष्यें एका गलबतांत बसवून समुद्रामध्यें हा समारंभ उरकण्याची नारदानें अजपाळ राजास मसलत दिली. त्यानें त्याप्रमाणें केलें. तों त्याच रात्रीं रावणानें त्यांचेवर घाला घालून सर्वांचा सत्यानास उडवून कौसल्या जी दशरथाची बायको हिला एका पेटींत घालून ती एका माशाचे स्वाधीन केली. माशानें ती पेटी एका निर्जन बेटावर नेऊन टेवली. इतकेंकरून रावण मिशीवर पीळ देऊन ब्रह्मदेवास म्हणाला आतां कसें काय? ब्रह्मदेव क्षणभर कांहींच बोलले नाहीं. नंतर मोठ्या आनंदानें त्यानें टाळी वाजविली. रावण म्हणाला मीं विचारल्या प्रश्नाचें उत्तर न देतां टाळी कां वाजविली. तो म्हणाला दशरथ कौसल्येचें लग्न झालें म्हणून टाळी वाजविली. व तुझ्या प्रश्नाचेंही उत्तर हेंच.

रावण म्हणाला काय म्हणतां महाराज, पैंज मारा. ब्रह्मदेव म्हणाला मी म्हणतों असें जर झालें तर त्वां माझें कांहीं इष्ट पूर्ण करावें, व न झालें तर मी तुझें कांहीं इष्ट पूर्ण करीन, ह्या प्रमाणें टाळी पटकी ठरून रावणानें माशाकडून पेटी मागवून उघडली, तों आंत दशरथ कौसल्येचें जोडपें लग्न चिन्हांनीं मंडित असें दिसलें. तें पाहतांच त्यानें तरवार उपसली. आतां मारणार तों ब्रह्मदेव म्हणाला, थांब मला दिलेलें वचन आधीं पुरे कर नंतर यांना मार. तो म्हणाला बोला काय तें? ब्रह्मदेव म्हणाला ह्या दोघांना सुखरूप ठेऊन अयोध्येस पोंचीव. तें ऐकून रावण विरस होऊन त्याला त्याप्रमाणेंच करावें लागलें.

---

## कथा १३ वी.

## (हें कसें झालें.)

नंतर हें कसें झालें म्हणून रावणानें विचारल्यावरून ब्रह्मदेव म्हणाला. तूं घाला घालून निघून आल्यावर बहुतेक मनुष्यें पाण्यांत बुडालीं. दशरथाचे हातीं मात्र एक फळाट लागून तो त्याचे आधारानें तरता राहून लाटांच्या धक्यानें ज्या बेटावर ही पेटी होती तेथें पोंचला. नंतर बेटावर हिंडून पाहतो तों ही पेटी त्याला दिसली. ती उघडून पाहतो

तोंच तेथें नारदाची स्वारी सहज गेली. लग्न वेळा होतीच म्हणून त्यानें लग्न लावून उभयतांस पेटींत घालून बंद करून तो निघून गेला. सारांश होणार गोष्ट चुकत नाहीं.

---

## कथा १४ वी.

## ( रावणास शाप. )

एकदा रावण विमानांत बसून हिंडत असतां एका सुंदर स्त्रीस पाहून त्यानें तिचे वर बलात्कार केला. ह्या बद्दल त्या स्त्रीनें ब्रह्मदेवाकडे गाऱ्हाणें नेलें. ब्रह्मदेवानें संतापून त्याला तत्काळ शाप दिला कीं, पुन्हा जर तूं कोणाही परस्त्रीवर बलात्कार करशील तर त्याचवेळीं ठार होऊन तुझा सर्वस्वी नाश होईल.

---

## कथा १५ वी.

## ( श्रावणवध. )

राजा दशरथ ह्यानें आणखी कैकेयी व सुभद्रा अशा स्त्रिया वरून शिवाय भोगांगना म्हणून सातशे स्त्रिया त्याला होत्या. तो मोठा शूर, शब्द ऐकून तेथें नेमका बाण टाकणारा होता. रावणादिकापर्यंत त्याचा वचक होताच. सारांश त्याला अनुकूलता सर्व होतीच, परंतु प्रपंचांत मुख्य आनंद

म्हणून जो काय संततीचा, त्याचा त्याला अभाव होता. तेणेंकरून त्याला कांहीं गोड लागत नव्हतें. त्याला एके रात्रीं स्वप्न पडलें कीं, त्याचे कडून तीन मनुष्यांच्या हत्या घडल्या. हें त्याला वाईट वाटून ह्या स्वप्नापासून होणारें अनिष्ट दूर करावें, ह्याबद्दल गुरूचे विचारानें मृगया करण्यासाठीं जंगलांत गेला. दिवसभर तर त्याला शिकार सांपडली नाहींच, म्हणून रात्रीं शिकार साधण्याच्या उद्देशानें एका नदी किनारीं असलेल्या एका वृक्षावर दबून बसला. मनांत हेतु हा कीं, जलपानार्थ कोणी येथें श्वापद आल्याची चाहूल लागल्यास आपलें कार्य साधेल.

पुढें असें झालें कीं, त्या रस्त्यानें श्रावण या नांवाचा कोणी मनुष्य, त्याचीं आईबापें अगदीं वृद्ध असल्यामुळें त्यांना कावडींत बसवून यात्रा करण्यासाठीं जात असतां वृद्धांनीं पाणी मागतल्यामुळें कावड खालीं ठेऊन चंबू घेऊन नदीवर पाण्यासाठीं आला. तें भांडें पाण्यांत बुडवितांना त्यापासून बुडबुड शब्द होऊं लागला. दशरथ हा शब्दवेधी असल्यामुळें हें कोणी जनावर पाणी पीत आहे असें जाणून त्यानें चटकन बाण मारिला. तो श्रावणाच्या वर्मीं लागून बिचारा हाय करीत तळमळतच पडला. श्वापद जाणून मनुष्याला आपण बाण मारला असें जाणून राजास

परम खेद होऊन तो त्याचे जवळ गेला. तेव्हां त्याला कच्चें वर्तमान सांगून आईबापांस पाणी पाजून त्यांचा संभाळ करावयाचें सांगून श्रावणानें प्राण सोडला. राजास तें वाईट वाटलेंच पण मग तृषितांस पाणी देण्यासाठीं जाणें भाग आल्या वरून तो त्या वृद्धांकडे गेला. तेव्हां कसूचें पाणी नी कसूचें काय? मुलाची ही स्थिति ऐकून त्या दोघांनींही देह ठेविला. मरतां मरतां म्हातारा म्हणाला मी जसा पुत्र पुत्र म्हणून मेलों तसाच तूंही मरशील. राजास पुत्र नव्हता, तेव्हां पुत्र होऊन नंतर शोक होणार येव्हढ्यांतच आनंद माणून राजा माघारा फिरला.

---

## कथा १६ वी.

## ( श्रीरामजन्म. )

दशरथाच्या वेळीं एकदां बारावर्षें अवर्षण पडलें. कारण हें कीं, वृषपर्वा नांवाच्या दैत्यांच्या राजानें सगळे मेघ कबजांत घेतले होते. त्याबद्दल इंद्रानें पुष्कळ खटपट केली. पण काय व्यर्थ. शेवटीं दशरथाला त्यानें मदतीस बोलाविलें. तो महाशूर, त्यानें वृषपर्व्याचा पराभवकरून मेघ मुक्त केले. ह्या प्रसंगीं दैत्य गुरु शुक्र व दशरथ यांचें युद्ध चाललें. ऐन निकराचा प्रसंग आला तोंच राजाच्या रथचक्राचा आंख मो-

डला. कैकयी ही मोठी दशरथाची लाडकी होती. ती ह्या-वेळीं बरोबर होती. तिनें चाकामधून हात घालून आंख धरला. म्हणूनच राजा यशस्वी झाला. पुढें हें त्याला समजतांच राजानें तिला सांगितलें कीं तुझ्या इच्छेस येईल तेव्हां तुला वाटेल त्या दोन गोष्टी मी पूर्ण करीन. असो. मग राजा परत येतांना राजास कांहीं संतती नाहीं असें इंद्रसभेंत कळल्यामुळें ऋष्यशृंग नांवाच्या ऋषीकडून पुत्रकामेष्टी यज्ञ केला असतां पुत्र होईल असें वृत्त सांगितल्यावरून उर्वशी आदिकरून अप्सरांच्या योगानें ऋष्यशृंगास मोह घालून राजानें त्यास आपले घरीं आणलें. व त्याचे कडून पुत्र कामेष्टी यज्ञ करविला. तेणेंकरून राजास चार पुत्र झाले. कौसाल्येच्या पोटीं राम, कैकेयीच्या पोटीं भरतशत्रुघ्न सुमित्रेच्या पोटीं लक्ष्मण.

---

## कथा १७ वी.

## ( मारुतीजन्मकथन. )

दशरथानें पुत्र कामेष्टी यज्ञ केला. त्या यज्ञाचा प्रसाद वशिष्ठ ऋषि राजाचा उपाध्याय यानें त्याच्या तिघी स्त्रियांस वाटून दिला. देतांना प्रथम कौसल्येस दिला. तें त्यानें योग्यता पाहून केलें. परंतु कैकेयी मोठी अभिमानी

असून लाडकी असल्यामुळें तिला तें अवघड वाटलें. ती तो प्रसादपिंड हातावर घेऊन तशीच धुमसत बसली. तों इतक्यांत एका घारीनें झडप घालून तो नेला. शेवटीं कैकयीस मग दुसऱ्या दोघींनीं आपले पैकीं थोडथोडा दिला. असो. तो पिंड घारीचे मुखांतून वायुवेगानें पडून अंजनी नांवाच्या वानरीचे हातीं गेला. तिनें खाण्याची वस्तु म्हणून तो खाल्ला. तेणें करून तिला ही पुत्र झाला. मुलाचा जन्म होताच सूर्य उदयाची वेळा होती. तें सूर्यबिंब पाहतांच कांहीं फळ असावें असें मानून ह्या पोरानें वानर स्वभावानें तें घेण्यास उडी मारली. तो हा केतुच समजून सूर्याची खूपच गडबड होऊन तो इंद्राकडे गेला. इंद्रानें चटकन वज्र फेंकलें. तें ह्या पोराच्या हनुवटींत घुसून तो खालीं पडला. त्याबद्दल वायूस फार वाईट वाटून त्यानें त्या मुलाची जतन केली, व देवांसही खूप त्रासून सोडलें. असो. ह्याच कारणानें त्याला मारुती असें नांव पडलें.

## कथा १८ वी.

### (पुत्रापेक्षांही वचन प्रीय.)

दशरथास वृद्धपणीं पुत्र झाले. ते त्याला प्राणापेक्षांही प्रिय वाटत. त्यांतून कौसल्येचा पुत्र श्रीराम हा तर फारच

प्रिय वाटे. तीं मुलें कशाचीं? ते अवतारी पुरुष. असो बालावस्था त्यांची पुरी होऊन मौंजीबंधन महोत्साह दशरथानें फारच उत्तम केला. तो ह्या आनंदांत आहे तोंच विश्वामित्र ऋषि त्याचेकडे जाऊन त्यांस प्रथम वचनांत गुंतवून घेऊन त्यानें रामाला कांहीं दिवस आपले आश्रमांत घेऊन जाण्याबद्दल मागणी केली. वस्तुतः श्रीराम डोळ्या आड घरचेघरांत झाला तरी दशरथाचा प्राण कासावीस होत होता, आणि आतां कित्येक डोंगर नद्या ह्यांच्या पलीकडे, त्यांत ऋषीचे झोंपडींत, वेळेवर खाण्यापिण्याला मिळण्याची मारामार, मिळायचें तेंही शुष्कान्न, अशा स्थळीं रामाला पाठवायचें म्हणजे देहांतून प्राणच बाहेर लावायचा असें होय. परंतु त्या वेळचे लोक खरे वचन पाळक, प्राणही देतील! मग पुत्राची कथा काय? दशरथ अशांतला मुकुटमणि होता. म्हणून त्यानें ऋषीचें म्हणणें कबूल केलें. श्रीरामाबरोबर लक्ष्मणही विश्वामित्रा बरोबर गेला.

---

## कथा १९ वी.

## ( गाधी ब्राह्मणाचा कंटज महार. )

श्रीराम विश्वामित्रा बरोबर जायचा त्यावेळीं तो वशिष्ठाचे दर्शनास गेला. तेव्हां बोलण्याचालण्या वरून वशि-

झाला श्रीराम म्हणाले माया ही कशी आहे तें मला सांगा. वशिष्ट हंसून म्हणाले श्रीरामा तुला ठाऊक नाहीं असें कांहींच नाहीं, असो विचारलेंस म्हणून सांगतों. माया ही अमुक एक प्रकारची हें कोणालाच सांगतां येत नाहीं पण तीबद्दल एक गोष्ट सांगतों, म्हणजे माया कशी ती तुला कळेल. गौतमाचा गाधी नामा एक शिष्य होता. तो मोठा वेदवेत्ता असून मोठा कर्मठ असे. त्यानें श्रीविष्णूस प्रसन्न करून घेऊन 'ही माया मजला दाखवा' असें म्हटलें. तें ऐकून एक वेळ दाखवीन असें सांगून नारायण तेथून निघून गेले. नंतर थोडक्याच दिवसांनीं तो गाधी जान्हवी नदींत स्नान करीत असतां हा योग्य प्रसंग जाणून देवानें त्यास माया दाखविण्यास आरंभ केला. गाधीने पाण्यांत बुडी मारली त्या वेळीं, आंतचें आंत त्याला भयंकर वेदना होऊं लागल्यासें वाटून त्याचा तत्काल प्राण गेला. यमदूतांनीं त्याला तत्काल यमलोकीं नेऊन त्याला कुंभिपाक वगैरे नर्कांत घातलें असें त्याला भासलें. तो खरोखर होता नदीमध्येंच, असो. नंतर जसा तो चांडाळ योनींत जन्म पाऊन त्याचें कटज असें नांव पडलें. त्यावेळीं घरदार वायकोपोरें त्याला प्राप्त होऊन तो वाटमाऱ्या बनला, गोब्राह्मणांचाही त्याचे कडून वध झाला. अनाचार, मद्य, मांस हें जसें त्याचें

दैवतच बनलें. पुढें जसी त्या प्रातांत एकाएकीं पटकी येऊन याचीं आईबापें, मुलेंमाणसें सर्व एकदांच मेलीं. त्या दुःखानें तो दुःखीत होऊन जसा गांवोगांव हिंडूं लागला. हिंडतां हिंडतां केरल देशामध्यें आला. तों तेथील राजा निपुत्रिक असून मृत्यु पावल्यामुळें प्रधानादिकानें हत्तीचे सोंडेंत माळ देऊन ती ज्याचे गळ्यांत घालील त्यास राजा करण्याचें ठरविलें. त्या हत्तीणीनें ह्याचेच गळ्यांत माळ घातली. तेथें त्यानें सहा वर्षें राज्य केलें. आप्त सोयरे जोडले, सगळे गांवकरी, ब्रम्हवृंद त्याचे घरीं भोजनासही पुष्कळ वेळ गेले. एकेवेळीं तो एकटाच वाड्यांतून बाहेर पडला. तो त्याचे मागें प्रधानादिमंडळी धांऊं लागली. त्यास यानें दटावून मागें लावलें. तरी प्रधान गुप्तपणें मागून गेला. कटंज तडत महारवाड्यांत गेला. तेथील महारांनीं त्याला तत्काळ ओळखून म्हटलें हा तर आमचा सोयरा. तें ऐकून कटंज दडावून म्हणाला हूं खबरदार असें बोलाल तर हद्दपार करीन. हें प्रधानाचे कानीं पडतांच हा जातीचा महार असें त्यास वाटून एकंदर झालेल्या बाटवड्याबद्दल त्याला अतोनात खेद झाला. हें वर्तमान तत्काळ सर्व गांवभर होऊन गांवकऱ्यांनीं कटजास हाकून लावलें, व आपण भ्रष्ट झालों असें जाणून मुलाबाळांवांचून सर्व स्त्री-

पुरुषांनीं आपणांस जाळून घेतलें. हें पाहून कंटजास मन-स्वीच खेद होऊन आपणही प्राण द्यावा असें त्यास होऊन त्यानें अग्नि चेतवून आंत उडी घातली. अजून तो जान्हवींतच आहे. असो मग अग्नीच्या ज्वाळा अंगाला लागतांच घाबरून ओरडूनच उठला. तोंच पाण्यांतून बाहेर येऊन भाजलों भाजलों म्हणतो तोंच डावेबाजूला पोळल्यामुळें तरारून फोड आलेला त्याला दिसला. नंतर जें जें काय घडलें त्याची आठवण करीत उगाच उभा राहिला. नंतर हें स्वप्न म्हणावें तर अंगावर फोड दिसतात तेव्हां हें काय आहे याबद्दल त्याला आतोनात विस्मय होऊं लागला. व तेणेंकरून तो मोठ्या चिंतेंत पडला. कारण आपण महार कां झालों, भ्रष्टाकार कां केला, आपलेसाठीं लोक कां मेले. ह्या योगानें त्यानें स्नान संध्यादि नित्यकर्म सोडलें, वेडाच बनला शुद्ध. बायको त्याला वेळोवेळ विचारी कीं, डाव्या बाजूला भाजलें काय? तें ऐकून त्याला रडेंच कोसळलें. थोड्याच दिवसांत त्याचा गुरुबंधु त्याला भेटला. तो अगदीं कृश होऊन गेला होता. गाधी त्याला म्हणाला 'कारे इतका शुष्क कां झालास,' तो म्हणाला काय सांगूं? मला अंत्यजाच्या अन्नाचा संस्कार झाल्यामुळें आज बारा वर्षे यात्रा करीत फिरत आहें. प्रथम मी हिंडतां हिंडतां

केरलदेशांत गेलों. तेथें सारा पोरवडा आहे. मोठा असा एकही मनुष्य नाहीं. हें असें कां असें विचारण्यापूर्वी मी एकाचे घरीं जेऊन नंतर त्याला विचारलें. तों येथें एक कंठज महार येऊन त्यानें सगळा गांव बाटविला. इतकेंच नाहीं तर सर्व वडील माणसांचे त्यानें प्राणही घेतले. तें ऐकतांच भोजनाबद्दल मला पश्चाताप होऊन मी यात्रा करीत हिंडत आहें. तें ऐकून तर गाधीला फारच पश्चाताप झाला. त्यानें केरलदेशीं जाऊन स्वतः चौकशी केली, तर सर्व खाणाखुणा पटून सहा वर्षें राज्य केल्याचाही दाखला मिळाला. तेणें करून त्याला महत् दुःख होऊन तो शोकाक्रांत होत्साता प्राण देण्यासच सिद्ध झाला. त्या काळीं भगवान नारायणानें त्याला भेटून म्हटलें 'बाबारे तूं म्हटल्यावरून ही तुला मीं माया दाखविली' इत्यादि सांगून त्याचें समाधान केलें.

---

## कथा २० वी.

## (श्रीरामाच्या सामर्थ्याचा मासला, ताटिकावध.)

विश्वामित्र रामलक्ष्मणास घेऊन जात असतां ताटिकारण्यांत गेला. तेव्हां रामाचें सामर्थ्य पहावें असा विचार करून विश्वामित्र म्हणाला रामा चुकलों, चुकलों रस्ता,

फिर माघारा, अरे हें ताटिकेचें अरण्य! कैक माणसें तिनें कडकडा खाऊन टाकलीं! पडलें लांब तर पडो पण आपण दुसऱ्या वाटेनेंच जाऊं. तेव्हां राम हंसून म्हणाला, मला आपण कशासाठीं बरोबर आणिलें. अशा दुष्टांना ठार मारण्यासाठीं किंवा भिऊन पळून जाण्यासाठीं आपली जर कृपा आहे तर शंभर ताटका आल्या तरी ठार करीन. आज्ञा मात्र पाहिजे. तें ऐकून ऋषीस परम संतोष झाला. इतक्यांत कृतांत दचकेल अशी ताटिकेची भयंकर गर्जनाही ह्यांचे कानीं येऊंन लागलींच ताटकाही पुढें आली. फारच भेसुर तें रूप. पहातांच गाभणी गाभ टाकील! कुंभकर्णाची ती बहीण, माजलेल्या दहाहजार हत्तींचें बळ तिचे अंगांत पोटांत जणू पर्वत सांठविले आहेत असें तें भयंकर, शंभर शंभर माणसें, गायी, म्हशी, एकदाच दाढे खालीं घालून रगडी. रक्तानें लेथाडलेलीं वस्त्रें अंगावर, माणसांचीं आंतडीं गळयांत, कपाळावर शेंदुर भरलेला. असें तें रूप पाहतांच रामानें एकच बाण मारून तिला खालीं पाडलें. त्यावेळीं जो धुरला उडाला त्यानें आकाश पाताळ एक झालें. स्वर्गापर्यंत तो ध्वनि गेला. तिचे रक्तानें कैक कोसपर्यंत जमीन लाल होऊन गेली होती. असा रामाचा पराक्रम पाहून विश्वामित्रानें त्याला चटकन पोटाशीं धरलें.

## कथा २१ वी.

### ( आणखी थोडा मासला. )

नंतर हे त्रिवर्ग आश्रमांत गेले. नंतर विश्वामित्रानें यज्ञास आरंभ केला. रात्रीचे वेळीं नित्याप्रमाणें सुबाहु व मारीच शेकडों राक्षस घेऊन यज्ञ मंडपावर रक्त मांसाचा सडा करीत धांवले. तें पाहून रामानें भडाभड राक्षस ठार करून एकच उग्रबाण मारून सुबाहूस ठार केलें. त्या बाणाच्या पिसाऱ्याचा नुसता वारा मारीच्यास लागून तो तेथून जो उडाला तो तहत समुद्रांतच जाऊन कोसळला. ह्याचें नांव पराक्रम!

---

## कथा २२ वी.

### ( अहल्योद्धार. )

ऋषीनें ज्या कार्यार्थ रामाला आपले आश्रमीं नेलें होतें, तें कार्य त्यानें उत्तम रीतीनें बजावलें. ह्या कामगिरीबद्दल रामाचें लग्न करून द्यावें असा ऋषीचा मानस होता, त्यामुळें त्यानें रामास परत पोचविण्यास अमळ विलंब केला तों इतक्यांत मिथिलेचा राजा जनक ह्याची कन्या सीता हिचा स्वयंवर मंकेत ठरल्याची पत्रिका विश्वामित्रा-

कडे आली. ती मौज पाहण्यासाठीं रामानें आळ घेतल्याव-रून विश्वामित्र त्या दोघांसही घेऊन मिथिलेस चालता झाला. जातां जातां वाटेंत एक मोठी धोंड पडली होती तीवर कोठें रामाचे पायाची धूळ उडाली न उडाली तोंच ती थरथर कांपूं लागली. तेव्हां हें चिन्ह काय म्हणून हीं दोघें मुलें जीं विस्मय करतात तोंच ती धोंड दिसे नाशी होऊन तिची एक सुंदर स्त्री बनून त्यास नमन करिती झाली. तेव्हां हें काय म्हणून रामानें विचारल्यावरून विश्वामित्र म्हणाला ही गौतम ऋषीची बायको अहल्या, ब्रह्मदेवाची कन्या. ही अशी रूपवती असल्यामुळें जो तो हिला मागूं लागला. तेव्हां अमुक एका दिवशीं जो सर्वांच्या अगोदर पृथ्वीप्रदक्षणाकरून येईल त्याला ही द्यावयाची असा ब्र-ह्मदेवानें संकेत प्रसिद्ध केला. त्यामुळें त्या नेमल्यादिवशीं तिला मागणारांची एकच धांदल उडून गेली. इंद्र, चंद्र वरुण, वायु, यम, अग्नि इत्यादि मंडळी ईर्षेस पडून धा-वत सुटले. त्या धांदलींत कोणाचे गुडघे फुटले, तर कोणाच्या बचळ्या फुटल्या, तर कोणाचें कांहीं, असा एकच गोंधळ माजला. त्यांत इंद्राची फारच शिकस्त होऊन तो सर्वांच्या पुढें जाऊन धडफडत उसासे टाकीत जों लग्न-मंडपांत पाय ठेवतो तोंच गौतमाशीं अहल्येचें लग्न लागून

टाळी वाजल्याचा गजर त्याचे कानीं आला. त्यामुळें बिचारा विव्हळ होऊन तेथेंच पडला. माघारे येतांना उचलून रथांत घालावें लागलें. नंतर एक वेळतरी अहल्येचा उपभोग घ्यावयाचाच असा दृढनिश्चय करून तो योग्य संधीची वाट पहात बसला. नंतर एकेवेळीं ऋषि माध्यान्ह स्नानास गेला असें पाहून तो ऋषीसारखें रूप धारण करून बेधडक आश्रमांत घुसून स्वारीनें कामचेष्टा चालविल्या. अहल्या महासाध्वी, तिनें हा खास आपला पति असें मानून वेळ मनांत न आणतां केवळ प्रसंग पाहून तिनें त्याचे मनाविरुद्ध कांहींच वर्तन केलें नाहीं. त्यांचा रंगविलास चाललाच आहे. तोंच खऱ्या गौतमानें येऊन दारावर थाप ठोकून साध घातली. तो आवाज ओळखतांच अहल्या घाबरली. इंद्रानेंही आपलें रूप घेतलें. मग काय मुद्यासह चोर पकडतांच ऋषीनें 'सहस्र भगें अंगास पडतील असा इंद्रास छाप दिला' व अहल्येस धोंड करून आश्रमाची राखरांगोळीकरून स्वारी तीर्थयात्रेस गेली. अहल्येचा वस्तुतः यांत अन्याय नव्हता व तिनें त्याची पाय धरणीही पुष्कळ केली. तेव्हां श्रीरामचरणधुळीचा स्पर्श होतांच पुन्हा पूर्ववत होशील असा ऋषीनें तिला उश्शापही दिला होता. ती वेळा आज आली. इतकें त्यांचें बोलणें होत आहे तोंच गौतमही तेथे

आला. सारांश फार दिवस विरह पावलेल्या ह्या स्त्रीपुरुषांची श्रीरामानें भेट घालून दिली. त्याच पुण्येंकरून तोही पुढें सीता देवीस मिळविता झाला.

---

## कथा २३ वी.

## ( आणखी रावणाची फट फजीती. )

जनकराजानें सीतास्वयंवराबद्दल असा पण केला होता कीं, श्रीशंकराचें पीनाक नांवाच्या धनुष्यास जो कोणी सज्ज करील त्यालाच सीता द्यावयाची. तें धनुष्य त्याचें घरींच होतें. एकदां भगवान् परशराम त्यांचे घरीं सहज आले होते. त्यांचे पाशीं हें धनुष्य होतें. त्याचें सीतामाईनें खेळतां खेळतां घोडेंच केलें. तें पाहून हें धनुष्य जो सज्ज करील त्यालाच ही कन्या दे असें परशरामानें जनकास सांगून ठेवलें होतें. तें धनुष्य म्हणजे सामान्य वस्तु नव्हती. शंकराचा एकेक गण म्हणजे पर्वताला भारी, अशा तीनशे गणांलाही जें ढळायचें नाहीं! असो. संकेताप्रमाणें सभामंडप घनदाट भरला. रावणादिक मोठमोठे राजे ही सीताप्राप्तीची आशा धरून तेथें आले होते. पण तें धनुष्य पाहतांच बहुतेकांची तर इच्छा आवरलीच. रावण हा मोठा दांभिक, जागे वरून कोणी हालला देखील

नाहीं. पण ही स्वारी एकदम आगाजा करून उठून म्हणाली, रे जनका आण तुझी मुलगी हें धनुष्य सज्ज केलें म्हणून समज. असें बोलून स्वारीनें धनुष्यास एक हात लावला, उचलेना म्हणून दोन, तीन, होतां होतां वीसही हात लावले, दांत ओठ करकरा चाऊन कसेंतरी त्यानें तें थोडेसें उचललें, पण तें भारीच अवजड! एकदम तोल जाऊन तें त्याचे अंगावर आलें. तें त्याला सांवरून धरवेना. शेवटीं तें अंगावर येऊन स्वारी दाणकण खालीं कोसळली! व उरावर धनुष्य! मग काय पुसता त्याची दशा! दहाही डोक्यांवरील मुकुट उधळले, तोंडावाटे भडभडा रक्त वाहूं लागलें. आणि मातीही तोंडांत गेली. ह्या योगानें सगळा रंगमंडप हंसण्यानें गजबजून गेला. रावणाला पडल्यापेक्षां लोकांचिया हंसण्याचीच भारी चीड आली.

---

## कथा २४ वी.

## ( रामसीता विवाह. )

रावणासारख्याची धनुष्यापुढें अशी अवस्था झाली, तऱ्हां मग दुसरा कोण कशाला उठतो! कोणीच उठेना असें पाहून विश्वामित्रानें रामास उठावयास सांगितलें. राम आज्ञेचीच वाट पाहत होता. चित्त्या सारखा उठून तो धनुष्या

जवळ आला व डावे हातानें धनुष्य वांकवून आतां दुसऱ्या टोकाला दोरी अडकवणार तों कुचक्या लांकडासारखें तें फडकन मोडलें. पण त्याचा ध्वनि गिरिकंदरींतून दुमदुमत राहिला. असो ह्या प्रमाणें रामानें पण जिंकतांच सीतेनें रामचंद्राचे कंठांत माळ घातली. नंतर मग विश्वामित्रानें कचें वर्त्तमान अयोध्येस कळवून प्रचंड वऱ्हाडासह दशरथास तेथें बोलावून घेतलें. श्रीमंताचेंच लग्न, तेथें थाटाला काय कमी! जनकाच्या भावाला ऊर्मिळा, मांडवी, आणि श्रुतकीर्ति अशा तीन पुली होत्या. जनकानें पाहिलें कीं, अनायासें लक्ष्मण भरत आणि शत्रुघ्न हे तीन वर येथें आहेत तर या तिघी त्या तिघांस देऊन कार्यांत कार्य उरकून घ्यावींत. दशरथासही हा विचार मानवल्यामुळें ह्या समारंभास चौपट शोभा आली.

---

## कथा २५ वी.

## ( रामरामांची झमंड. )

ह्या सारा समारंभ कज्जा खोकल्यावांचून शेवटास जाऊन वऱ्हाडी वधुवरांसह परत फिरले. हें कलहप्रिय नारदाला मुळींच आवडलें नाहीं. म्हणून कांहीं तरी गंमत होईल अशी संधी तो शोधीत होता. पण कांहींच सांपडेना, तेव्हां

स्वारी परशरामाकडे जाऊन म्हणाली. कां रामा क्षत्रियांच्या निःपाताविषयींची आपली प्रतिज्ञा संपली कीं काय? क्षत्रियांनीं तर उन्मत्तपणा चालविला. तें ऐकतांच भार्गवानें डोळे लालकरून म्हटलें काय म्हणतोस नारदा माझें धनुष्य अझून जिवंत आहे! नारद म्हणाले त्याची जळाऊं दोन लांकडें होऊन पडलींत. तें ऐकून परशरामाची तळव्याची आग मस्तकीं गेली. व तो म्हणाला नारदा काय तें नीट बोल. नारदानें त्यास कच्चें वर्त्तमान सांगितलें. परशराम म्हणाला कायरें करूं? दशरथानें मला पुरतें फसविलें. जेव्हां जेव्हां मीं त्याचेवर चाल करावी, तेव्हां तेव्हां त्यानें नागव्या बायकांच्या घोळक्यांत जाऊन घुसावें. असो आतां मी जिवंत असतां माझें नांव धारण करणाऱ्या रामाला आणि मग दशरथालाही ठार करतों. असें बोलून स्वारी कातावून निघाली. हें वऱ्हाड मार्गांतून जातच होतें. नारदानें त्याला झटकन ह्याच्यापुढें उभे करून उभय रामांची कशी फुगडी होते तें पाहत स्वारी दूर उभी राहिली. परशराम आला हें ऐकताच दशरथ पोराबाळांची आशा सोडून एका बायकोच्या मेण्यांत घुसला. सैन्यांची तर दाणादाण झाली. असें पाहून श्रीराम पुढें झाले. व म्हणाले, रे महाब्राह्मणा आम्हीं क्षत्रियांनीं तुजवर बाण सोडावे हें

आम्हांस उचित नाहीं. तें ऐकून तर परशरामास फारच तळतळ आली, व म्हणाला कार्य्या इतर ब्राह्मणाप्रमाणेंच तूं मला मानतोस काय? बरें असो माझें धनुष्य कां मोडलेंस तें सांग? राम म्हणाले मी कशाला तें मोडूं? मीं नाहीं मोडलें. परशराम म्हणाले तर तें आहे तसेंच आहे. राम म्हणाले छीं, त्याचे दोन तुकडे झाले. परशराम म्हणाला तर हें कसें झालें? राम म्हणाला त्याला दोरी बांधावी म्हणून मी वाकवांयला गेलों तों तें पुटकन मोडलें. असें तर तें मुळीं धनुष्य! येव्हढें प्रचंड धनुष्य सहज मोडलें. हें ऐकून परशराम रामाला असेंच कांहीं विचारी व राम असें कांहीं त्याला चिडण्यासारखें उत्तर देई, व तोही फारच चिडे. तें पाहून नारदाची इच्छा तृप्त झाली. असो मग उभयतांही एक अंशींच, एकमेकांची खूण पटून एकदाचा तंटा मिटला.

---

## कथा २६ वी.

## ( एमतेम काय ती कैकयाच. )

दशरथ सुखरूपपणें घरीं गेला. पावणेरावळे घरोघर गेले. कैकयीचा भाऊ युधाजित परत जातांना त्यानें आपले भाचे भरत शत्रुघ्न यांनाही चार दिवस आजोळीं म्हणून

नेलें. नंतर एकेवेळीं दशरथ आरसा पाहत असतां त्याला मिशीचा केस पांढरा दिसला. तेव्हढ्यांत त्याचे मनांत कांहीं कल्पना येऊन श्रीरामास युवराज्याभिषेक करावयाचा विचार काढिला. लागलींच वशिष्टगुरूची मंजुरी घेऊन त्यानें समारंभ चालू केला. संपूर्ण मांडलिक राजे, ऋषि वगैऱ्यांस सुचना पाठविल्या. भला विस्तीर्ण मंडप घातला. रामास राज्याभिषेक हें ऐकून जिकडे तिकडे आनंदच आनंद भरून गेला. कौसल्येला तर आनंद होताच पण सुभद्रा, कैकेयी ह्यांनाही अतोनात आनंद झाला. आतां उद्यां अभिषेक व्हावयाचा येथ पर्यंत वेळ आली. तों ह्या साऱ्या आनंदांत एकाएकीं माती कालवली गेली. साखरेनें भरलेलीं जीं लोकांचीं तोंडें तीं तत्काल मातीनेंच भरलीं. कारण इतकेंच कीं, मंथरा नांवाची कैकेयीची एक जिवलग दासी होती. तिने कैकेयीस एकांतीं गाठून म्हटलें, बाईसाहेब अहो तुम्ही आनंद कशाचा मानतां? अहो ही सारी सरकारची लबाडी बरें! अहो तुम्हांला हें कांहींच कळलें नाहीं. तुमचीं मुलें गांवीं गेलीं ही संधी पाहून कौसल्येनें आपला हात उगवून घ्यायची ही मसलत काढली आहे बरें! रामाला राज्यप्राप्त झालें कीं, भरतशत्रुघ्नांनीं त्याचे जोडे उचलले पाहिजेत, तुम्ही कौसल्येचीं लुगडीं धुतलींच पाहिजेत. हा

सगळा त्यांचा कावा आहे बरें! तुम्ही पडला भोळ्या. सरकार तुमच्याशीं गोड गोड बोलतात त्यावरच तुम्ही लाल आहांत. हें बोलणें कैकयीच्या मनांत चांगलेंच खोचलें, व असें न होऊन भरतालाच राज्य कसें मिळेल ह्याबद्दल तिनें तिला युक्तिही विचारली. तेव्हां ते पूर्वी राजापासून दोन वर घेतले आहेत तर एका वरानें भरतास राज्य व दुसऱ्यानें रामास चौदा वर्षें वनांत पाठविणें असें मागून घे, ह्याप्रमाणें मंथरेनें तिला मसलत दिली. कैकयी आधींच महत्वाकांक्षी व क्षुद्र बुद्धीची. तिला हें सारेंच उत्तम मानवलें, व साधण्यासारखेंही होतें. तिला राजाच्या कृत्रिमपणाबद्दल सपाटून राग आलाच होता. तिनें तत्काळ केश मोकळे सोडून डोक्यांत धूळ टाकून घेतली. व मोठा आक्रोश करून गडबडा लोळत पडली. इकडे राजाला हें कांहींच ठाऊक नसून तो हा आनंदाच्या भरांत प्रिय जी कैकेयी तिचे मंदिरांत रात्रीं गेला. तो हा प्रकार पाहून त्याच्या पोटांत एकदम धस्स झालें. तें पुन्हा सावरलेंच नाहीं. नंतर मोठ्या कष्टानें त्यानें कैकयीस बोलतें करून कारण विचारलें. ती म्हणाली मला जे आपण दोन वर दिले होते ते जाळायाला कीं काय? तो म्हणाला म्हणजे हें गे काय? तुला वर दिले तेव्हांच सांगून ठेवलें होतें कीं, वाटेल तेव्हां वाटेल ते मागून घे

म्हणून. त्याचे करतां रुसणें कशाला? ती म्हणाली बरें तर आतांच मागतें पण दिलें मात्र पाहिजे. तो म्हणाला मी सूर्य-वंशीय पुरुष, प्राणभंग मला पत्करेल पण वचनभंग पत्करणार नाहीं. हें तूं जाणत नाहींस काय? कैकयी म्हणाली तर एका वरानें भरतास राज्य द्यावें, हें ऐकतांच राजाचा धक्का दुणावला व दुसऱ्या वरानें रामास चौदा वर्षे रानांत पाठ-पावें. हें ऐकून तर दशरथ बेहोष होऊनच पडला. लाग-लींच चौहींकडे ही वार्ता पसरली. रामाचे कानीं हें वर्तमान जातांच त्यानें विचार केला कीं, आपला बाप हा एक वचनी, मला वनांत पाठविण्याविषयीं त्याला कैकेयीनें बांधून घेतलें. आणि 'रामा तूं अरण्यांत जा? हे शब्द त्याचेच्यानें प्राण गेल्यानेंही बोलवणार नाहींत. तर बापाचें सत्य रक्षण्या-साठीं आपण होऊनच वनगमनाचें धैर्य केलें पाहिजे, दुसरा उपाय राहिलाच नाहीं. असा पक्का विचार करून त्यानें बेधडक सर्व निरवानिरव केली. आणि वनास जायचें म्हणून बापाच्या पायां पडण्यासाठीं तो होता तेथें गेला. राम निरवानिरीव करूं लागतांच त्याचा मानस उमजून सीता व लक्ष्मणही त्याचे बरोबरच जाण्याचा निश्चय करून दशरथाचे दर्शनास तेथें गेलीं. ह्यावेळीं अयोध्येच्या शोकाला काय विचारायचें? पशुपक्षीही रडले. वृक्षही निस्तेज झाले.

रामानें तत्काळ दशरथाची आज्ञा मागितली. दशरथानें डोळे उघडून पाहिलें. अतिशोकाच्या योगानें त्याच्या अंगांतील पाणी खाक होऊन गेलें होतें. तें डोळ्यावाटे येतें कुठून? कंठ दाटून शिरा ताठून गळा सुजून गेला होता. त्याच्या तोंडांतून अक्षर उमटेना. इतक्यांत कैकयीनें तिघांची वस्त्रें घेऊन त्यांना वल्कलें दिलीं. वल्कलें अंगावर घेऊन राम म्हणाले, ताता मी अरण्यांत जाण्यासाठीं आपली आज्ञा मागत आहें. दशरथ काय बोलणार? तरी कैकयी म्हणाली रामा तुला बापाचें सत्य राखणें असेल तर आतां उगीच येथें रेंगाळूं नकोस. तें ऐकून त्वेषाच्या झटक्यासरसा राम तेथून निघाला. 'बा रामा, बाळा रामा, पुत्रा पुत्रा' म्हणून दशरथ ओरडला पण मग रामानें मागें मान केलीच नाहीं. लक्ष्मण, सीता रामाचे मागोमागच. रामानें झटकन कौसल्येची आज्ञा घेऊन लागलेंच कूच केलें. 'दशरथानें सुमंत प्रधानास रथ नेण्याविषयीं सांगितलें. त्याला 'पुत्र पुत्र करीत मरशील हा ऋषीचा शाप ह्यावेळीं आठवला.'

---

## कथा २७ वी.

## ( दशरथप्राणत्याग. )

मग उजाडलें नाहीं तोंच राम लक्ष्मण सीता हीं त्रिवर्ग

अयोध्येपासून बरींच लांब गेलीं. सुमंतानें रथ नेला होताच. गांवांत एकच हलकल्लोळ होऊन गेला. जिकडे तिकडे आनंदाच्या ज्या टाळ्या वाजत होत्या त्या ऐवजी आतां शोकाच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. कैकेयीला तर हरएक मनुष्य शिव्यांची लाखोली वहात होता. नाहीं म्हणायाला फक्त एक मंथरा मात्र तिला शिव्या देत नव्हती. ऋषि मंडळी कांहीं समारंभास जमली होती, ती रामाच्या मागोमागच गेली. पण पहाटेच्याच वेळीं रामानें त्यांना चुकवून पुढें कूच केलें. असो. मग शृंगवेरी नामक एक खेडें होतें, तेथून जवळच भागीरथीचा प्रवाह वहात होता. तेथें श्रीराम उतरला. ह्या स्थळीं गुहक नांवाचा एक किरात रामाचा अत्यंत भक्त रहात होता. त्याची ह्याची गांठ पडतांच किरा-ताला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्यानें रामाला फळें मुळें देऊन यथाशक्ति बरीच मदत केली. रात्रीचे वेळीं गवताची राशी करून रामाला निजण्याला ती उत्तम बिछायतच केली. तो किरात तेथें एक नाव ठेऊन जाणायेणारास नदी पार करून त्याजवर आपला निर्वाह चालवीत होता. त्यानें रामाला दुसरे दिवशीं नदीपार केलें. ह्या वेळीं एक अशी गमत झाली कीं, राम नावेत पाय ठेवणार तोंच कि-राताची आई ओरडून म्हणाली, अरे नको रे नको, ह्याला

नावेंत वसवूं नको, ह्याचे पाय लागतांच दगडाच्या बायका झाल्या आहेत. तर न जाणो ह्या नावेची बायको झाली तर उद्यां खायचें काय? हें ऐकून गुहकाची रामाचेठायीं फार प्रीति जडली. असो मग सुमंताला मागें फिरवून राम तेथून प्रयागक्षेत्रीं भारद्वाज मुनीचे आश्रमीं गेले शृंगवेरी असतांना वडाचा चीक डोक्यांत घालून रामलक्ष्मणांनीं शेंडीच्या जटा वळवून टाकल्या होत्या. त्यामुळें तेही ऋषिकुमारच बनले होते. क्षत्रियत्वाची खूण म्हणून धनुष्यें व भाता येव्हढीच कायती त्याचे जवळ उरली. असो. सुमंत रिता रथ घेऊन माघारा येतांना पाहतांच दशरथानें थोडेंसें बोलून प्राण सोडला. अशा रीतीनें अयोध्या नगरींत जो अनर्थ वर्षला त्याचे अक्षरांनीं वर्णही करतां येत नाहीं.

---

## कथा २८ वी.

## ( सर्व व्यर्थ. )

दशरथ राजा म्हणजे ज्याचा पराक्रम इंद्रापेक्षां भारी, वृषपर्व्यानें मेघ कबजांत घेतले. तेव्हां इंद्राच्यानें त्याचा पराभव होईना, परंतु दशरथानें त्याचा पराभव केला. असा जो तेजस्वी पुरुष, भूमंडळीं ज्याचा सर्वांना दरारा,

ज्याला सातशें बायका, वशिष्टासारखा महान तपस्वी ज्याचा उपाध्याय! ज्याचे पोटीं प्रत्यक्ष परमेश्वर अवतरला, असेच ज्याला चार पुत्र. असें असतांनाही मरणाचे प्रसंगीं कोण त्याची विपत्ति! एकही पुत्र त्याचेजवळ नाहीं. त्यामुळें कोणीतरी एखादा मुलगा येईपर्यंत त्याचें प्रेत कुजून जाऊं नये म्हणून वशिष्टादिकांनीं कडकडीत तेलांत त्याचा देह टाकला आणि आतां रामलक्ष्मणांतून कोणी एखादा परत येणें कठीणच म्हणून भरत शत्रुघ्नास आणण्यासाठीं सुमंताला रथ घेऊन दवडिलें. सुमंत हा चतुरच, तरी शोकवेग अनावर असें जाणून भरताचा पाय कैकयीचे मंदिरांत पडे-पर्यंत त्यास इकडली गंध वार्ताही कळतां कामा नये असें वशिष्ठानें निक्षून सांगितलें. सारांश तो येईपर्यंत दशरथाचा प्राण गेला तरी त्याला आलेली विपत्ति त्याच्या देहाला देखील भोगावी लागली. यावरून सर्व कांहीं व्यर्थ हें खरें.

---

## कथा २९ वी.

## ( होणारासारखीं चिन्हें. )

मनुष्यावर पुढें बरा किंवा वाईट प्रसंग यावयाचा असला म्हणजे बहुत करून प्रसंगानुरूप आधींच कांहीं बरीं वाईट चिन्हें होत असतात, स्वप्नें पडतात, डोळे, दंड स्फुरण पाव-

तात, इत्यादि चिन्हांवरून इष्टानिष्ट प्रसंगाची कल्पना सुज्ञ-जन करतात. तोच प्रकार येथें घडला. दशरथ राजा ज्या रात्रीं मृत झाला त्याच रात्रीं इकडे भरताला ओंगळ स्वप्न पडलें. तेणें करून कांहीं तरी भयंकर अनिष्ट झालें अशी घरांतील सर्वांचीच कल्पना होऊन अयोध्येस दूत पाठवून शोध आणविण्याचा विचार चालला होता. भरतानेंच जा-ण्याचाच विचार ठरविला. नंतर लागलीच उभयता बंधु त-यारी करून निघून जे गांवाबाहेर येतात तोंच सुमंताचा रथ त्यांचे दृष्टीस पडला. तेणें करून तर आलेली कल्पना दुप्पट होऊन दोघांच्याही पोटांत शोकाग्नि भडकूं लागला. सुमं-ताला त्यांना पाहतांच पोटांतून शोकाचा उमाळा उसळला. पण तो गंभीर पुरुष. त्यानें तो जागचे जागींच थंड करून बुंद वार्ता ही फुटूं न देतां तडत अयोध्येस नेलें. पण तें चिन्ह काय झांकतें ? सुमंत बोलेना तेव्हां भरतानेंही त्याला कांहीं विचारलें नाहीं. पण अयोध्येंत जिकडे तिकडे उदासपणा पाहतांच भरताचे काळजावर टचाटच कांटे टोचूं लागले. जो जो त्याचे कडे पाही, तो तो पटकन मान खालीं घाली. पण त्याचे डोळे पाण्यानें भरलेले पाहतांच भरताचे काळीज तिळ-तिळ तुटे. शेवटीं तो कैकेयीचे महालांत गेला. तों कैकेयीची ती विपरीत अवस्था, तैल कढयींत राजाचें प्रेत, हें पाहतांच

शोक भारानें तो दडपूनच गेला. डोळे कोरडे होईपर्यंत व कंठ बसून चिप होईपर्यंत तो रडला. सारांश ज्या भावना त्याला अधले दिवशीं झाल्या त्यांचा परिणाम दुसरेच दिवशीं त्याचे दृष्टीं पडला.

---

## कथा ३० वी.

## ( कैकयीची भुशारकी. )

भरत अगदीं शोकाक्रांत होऊन गेला. राम न दिसल्यामुळें त्याचे पोटांत विरहाग्नीचे भडके चाललेच होते. अशी त्याची अवस्था पाहून कैकयी उत्साहभरित होतसाता त्याचे पुढें येऊन म्हणाली, भरता, अरे भरता, आतां कितीही शोक केला तरी राजा परत येईल कां ? येईल तर कर शोक. तो म्हणाला आई राम कोठें आहे. ती म्हणाली ऐक सांगतें, आतां रडणें पुरे कर. पुरुषानें शोक करायचा किती? आतां सारा शोक ह्या बापाच्या प्रेतावरोबर जाळून टाक, उठ कसा आधीं, तो म्हणाला आई वडील पुत्र राम असतां हें मींच कां करायचें ? ती म्हणाली भरता तुला अझून कांहींच कळलें नाहीं तर, अरे तुझे बापानें मला दोन वर देऊन ठेवले होते हें तुला मीं सांगितलें होतें ना ? तर एका वरानें मीं तुला राज्य व दुसऱ्यानें रामाला चौदा वर्षें अर-

ण्यांत पाठवावें असें मागून घेतलें. त्याप्रमाणें राम आतां अरण्यांत गेला. त्याचे वियोगानें राजा मृत झाला. राम परत येण्याची आतां आशा राहिली नाहीं. रानांत दुष्ट हिंसक राक्षस हिंडत आहेतच. एखादे वेळीं ते त्या तिघांना खाऊन टाकतील. तर आतां निष्कंटक राज्य भोग. तूं येथें नाहींस असें पाहून लागलाच रामाला युवराज्याचा अभिषेक करायाचा राजानें घाट घातला होता. येव्हढी एक रात्र जर चुकली असती तर तुझे हातीं खापरच आलें होतें. तें उगीच माझेजवळ दोन वर होते म्हणून येव्हढें झालें नाहीं तरः—

असें बोलतांना कैकयीस वाटलें जणू मीं हा अगदीं दिग्विजयच केला. भरत आतांच शोक टाकून माझे कंठांत पुष्पमाळा घालील. असें जाणून ती मोठ्या भुशारकीनें टकटका चोहींकडे पाहत होती. भरताविषयीं विचार केला तर त्याला हें कैकयीचें भाषण वज्राला कालकूट विष चोपडून तें मोठ्या वेगानें काळजांत खुपसल्यासारखेंच लागलें. तो जरी गंभीर, मोठाच विचारी होता तरी त्याला त्यावेळीं अतिशयच त्वेष आला. त्यानें कैकयीस ठार केलेंच असतें. मातृहतेला तो भ्याला नाहीं, केवळ 'हें तूं वाईट केलें' असें श्रीरामचंद्र बोलेल त्याला तो भ्याला. आणि हातांनीं जें त्वेषाचें निरसन करायचें तें तोंडानेंच करण्याला प्रारंभ केला.

त्यावेळीं त्यानें आपले तोंडांतून जे अमंगळ शब्द काढले ते ऐकवत देखील नाहींत. ती केवळ कैकयीच म्हणून त्या शब्दांनीं वांचली, दुसरी कोणी असती तर तेव्हांच तिच्या काळजास चराचर चिरा पडून एका घटकेंतच तिचा प्राण गेला असता. असो भरतानें शेवट तिला स्पष्ट सांगितलें कीं, माझें पूर्वजन्मींचें महत्तम पाप म्हणूनच मी तुझ्या सारख्या चांडाळिणीचे पोटीं आलों. अशी चांडाळीण जगांत कधीं कोणी व्हायचीच नाहीं. तूं आपल्या नवऱ्यास ठार मारलेंस, रामचंद्र भगवान् ह्याला तूं अरण्यांत लावलेंस. तुझें तोंड ही मी पहाणार नाहीं. आग लावून दे त्या तुझ्या राज्यवैभवास ! इतकें बोलून तो तेथून कौसल्येकडे गेला. ती तर 'रामा, रामा' म्हणत वेडीच होऊन गेली होती, जिकडे तिकडे तिला राम दिसत होता. परंतु तो तिचे हातीं लागेना ! भरतास पाहतांच तिनें हबरडा फोडला. डोळे अगदीं कोरडे ठणठणीत होईपर्यंत दोघेंही रडलीं. असो. नंतर चालीप्रमाणें मग राजाचा दहनसंस्कार आटोपतांच भरत रामास परत आणण्याच्या उद्देशानें चालता झाला. वशिष्ठ गुरूजींनेंही त्याचें खरें खरें मन पाहण्यासाठीं त्याला म्हटलें 'रे भरता कसचा रामनी कसचा दशरथ, अनायासें राज्य हातीं आलें आहे, कां दवडतोस. तें ऐकतांच भरत संतापानें म्ह-

णाला. तूं माझा गुरुच नाहींस, मी तुला स्पर्शही करणार नाहीं. खरोखरच तूं ब्राह्मण आहेस किंवा नाहींस ह्याचा मला संशय वाटूं लागला. इतकें जरी तो कठोर बोलला तरी वशिष्ठास राग न येतां उलट समाधानच वाटलें.

---

## कथा ३१ वी.

## ( थोड्यांत चुकलें नाहींतर मोठाच नाश व्हायचा, गुहभरतांची लढाई. )

भरत रामभेटीसाठीं निघाला, तो राजपुत्र, एकटादुकटा कां तो जायचा? सैन्य लवा जमा, रामभेटीस चालला म्हणून कौसल्या सुमित्रा, शत्रुघ्न उर्मिळा वगैरे सर्व थाटच्याथाटच निघाला. तो शृंगवेरी पर्यंत गेला तों अस्तमान झाल्यामुळें तेथेंच त्यानें तळ दिला. इकडे गुहक जो रामाचा भक्त तो हें सैन्य वगैरे पाहून हें कांहीं लचांड आहे असें जाणून अमळ शोध करीत आहे तोंच राम लक्ष्मण जे अयोध्येचे राजकुमार येथून नुकतेच गेले, तिकडे आम्हांस जाणें आहे तर सकाळींच आपली नाव तयार ठेव असा भरताचा त्याला निरोप पोंचला. तें ऐकून रामास ठार करण्यासाठींच कैकयीनें सैन्यासह भरतास रवाना केलें असें जाणून त्यांचा येथेंच चेंदामेंदा करावा, निदान येथून पिटाळूनतरी लावावें

असा विचार करून गुहकानें रात्रींतून हजारों किरात गोळा केले. ज्यांचीं शस्त्रें म्हणजे तीर कामटा. उजाडलें नाहीं तों एकसारखी फेर धरून भरताच्या सैन्या भोंवती ही मंडळी खडी उभी. धिप्पाड पुरुष एकेक, दंड अगदीं फिरून गेलेले. हें पाहतांच हे कोणी लुटारू लोक लुटालूट करण्यास आले असें जाणून भरतानें एकदम सैन्यास हुकूम केला. किरात लोक मोठे लढावू. फारच भयंकर त्यांचा मारा, राजाचे शिकावू शिपायीपण पुढें तोंड करण्याची. कोणाची छाती होईना. शेवटीं जय रघुवीर म्हणून भरत पुढें धांवला. तेव्हां हा रामभक्त असें गुहकाच्या मनांत येऊन त्यानें धनुष्य खालीं करून प्रथम नीट शोध केला. तेव्हां भरत हा श्रीरामाचा निस्सीम भाऊ असें गुहकास पक्कें वाटून सगळाच घोंटाळा मिटला. सारांश भरताचे शब्द गुहकाचे कानीं नसते आले तर रामाच्या दोघा भावांतून कोणीतरी एक खास वाचला असता.

---

## कथा ३२ वी.

## ( भरतलक्ष्मणांची लढाई. )

मग गुहकानें मोठ्या प्रेमानेंच भरताची गांठ घेतली. रामानें जटा वळल्या, तृणशेजेवर शयन केलें इत्यादि मज-

कूर सांगतांना दोघेही स्फुंदस्फुंदून रडत असत. आणि तें गवताचें अंथरूण पाहतांच कौसल्येनें हंबरडाच फोडला. असो मग गुहकानें त्या सर्वांना नदीपार केलें. राम ह्यावेळीं चित्रकूट पर्वतावर राहिले होते. सीतेनें अरण्यांत जाण्याचा जो नाद घेतला व ज्यासाठीं स्त्रियांची मुद्दाम पडदपोशी राखावी लागते त्या बद्दलचा प्रथमचाच प्रसंग सीतेला ह्यापर्वतावरच भोगावा लागला. म्हणजे असें झालें कीं, ती बोलून चालून अद्वितीय सुंदरी, तिला पाहून मोठमोठे तपस्वीही तिचेवर झडप टाकतील, मग इतरांची कथा काय! भरत शत्रुघ्न नदी उतरून चित्रकूटाचे मार्गास लागला. तों इकडे लक्ष्मण त्याचवेळीं फळेंमुळें आणण्यासाठीं रानांत गेला होता. रामचंद्र पर्णकुटिकेमध्यें हवन करीत बसला होता. सीतामाई त्यांना सामग्री देत होत्या, त्यामुळें तिला वेळोवेळ आंत बाहेर जावें यावें लागे. एकदां ती अशीच बाहेर आली तोंच सुदर्शन नांवाचा गंधर्व तिकडेच कोठें हिंडत होता त्याची नजर हिचेवर येऊन तो तत्काळ कामातुर झाला. ही अयोध्येचा राजकुमार रामचंद्र ह्याची बायको इतकेंच तो जाणत होता. त्यामुळें दिव्यारा रत्न समजून पतंग जसा त्यावर झेपावतो ह्याच न्यायानें त्यानेंही सीतेवर झांप घातली. मात्र इतकेंच केलें कीं, गंधर्वरूप

एकीकडे ठेऊन कावळ्याचें रूप धारण केलें. आणि तिच्या कोमल शरीरास स्पर्श करावयास पाहूं लागला. तें त्याचें लक्षण ध्यानांत येतांच सीतेनें किंकाळी फोडली. लक्ष्मण जवळ नाहीं हें रामास ठाऊक होतेंच. तेव्हां सीतेचा हा संकट प्रसंग जाणून रामानें दर्भावरच कांहीं अस्त्रयंत्राची योजना करून तो ह्या कावळ्यावर फेकून दिला. तो काय केवळ प्रळय काळच्या विद्युल्लतेपेक्षांही तीक्ष्ण, तो आपले अंगावर येतोसें पाहतांच तो काकरूपी गंधर्व धांवतच सुटला. तो आपल्या रक्षणासाठीं मोठमोठ्यास शरण गेला, परंतु श्रीसमर्थाचा गुन्हेगार, त्याला कोठून थारा मिळणार? शेवटीं मुकाट्याच श्रीरामाला शरण येऊन म्हणाला प्रभो मी तर अन्यायी खराच, पण मजसारख्या नीच व क्षुद्र प्राण्यावर येव्हढें दुर्धर शस्त्र सोडणें हें आपणांस अत्यंत अयोग्य आहे, इत्यादि बोलून हीनवदन होत्साता तो रामपायीं लागला. तेणेंकरून रामास त्याची दया येऊन त्यानें म्हटलें, बाण तर माझा व्यर्थ होणार नाहींच, तुझा एक डोळा फोडून तो माघारा परतेल. आणि सीतेची विटंबना करण्यास धांवलास तर आतां विष्टा भक्षण करूं लागशील. असो, रामानें इतकें म्हणतांच दर्भबाणानें त्याचा एक डोळा फोडला. तेणें करून तो फारच विव्हळ होऊन रामाची विनवणी करूं लागला. तेव्हां

एक बुबुळ दोन्ही डोळ्यांकडे हिंडतें राहील व काकदृष्टी सर्वांत श्रेष्ठ होऊन प्रेतपिंड तूं खाल्ल्याशिवाय प्रेतांचे उद्धार व्हायचे नाहीं असा एक तुला वर देतों असें सांगून रामानें त्यास वाटेस लावलें. असो भरत ह्या मार्गाकडे येत होता व लक्ष्मण फळेंमुळें आणण्यासाठीं वनांत गेला असें मागें सांगितलें आहे. लक्ष्मण वनामध्यें हिंडून फळें गोळा करीत होता तोंच त्याचे कानीं भरताच्या सैन्याचा कलकलाट येऊन तो घाबरल्या सारखा होऊन जों पाहतो तों सैन्य मोठ्यावेगानें पुढें चालत असून मागें त्याच्या रथाचे ध्वज चमकूं लागले. तेव्हां खास कैकयीनें भरताचे कान फुंकून रामाच्या वधासाठींच प्रचंड सैन्यानिशीं त्यास इकडे रवाना केलें. अशी त्याची ठाम कल्पना होऊन लागलेंच धनुष्य चढवून मारा सुरू केला. तो शेषाचा अवतारच, फारच भयंकर त्याचा मारा. नुसत्या त्याच्या धनुष्याच्या दोरीच्या ठणत्कारानें तें रान नादून जाऊन रानांतील पशूंची अतिशय धांदल उसळून गेली. तेणें करून आश्रमांतील ब्राह्मणांचीही धांदल उडाली. त्यांना वाटलें रामानें ताटिका मारली, व मारीच सुबाहुसही मारलें त्यांचा कैवार घेऊन बहुधाही राक्षससेना राम लक्ष्मणांवर येत आहे. तेव्हां न जाणो गाडीबरोबर नळ्याची यात्रा, याप्रमाणें रामाबरोबर आपली ही

मुंढी मुरगाळली जाईल. ह्या धास्तीनें ते आपापले चंबु गबाळीं घेऊन घेऊन भडाभड धांवत सुटले. भरताकडूनही मारा सुरू झाला. रामामुळें हें आम्हांवर संकट उद्भवलें असा एकच चोहींकडे गलबला झाला. तेव्हां हें काय बंड आहे म्हणून राम धनुष्यावर बाण ठेऊन तत्काळ आश्रमांतून बाहेर पडले. पाहतात तों दोघे बंधु निकरावर येऊन झगडतात, दोघांची आपले ठायीं सारखीच भक्ति असून एकमेकांचा उद्देश एकमेकांस न कळल्यामुळें हे निकरावर आले आहेत असें जाणून रामानें लक्ष्मणास एकदम इशारत देऊन युद्ध थांबवलें. नाहीं तर खचित् कांहींतरी अनर्थ झाला असता. असो. रामानें भरताचा वास्तविक हेतु लक्ष्मणाला उमजवितांच त्याला थोडेसें वाईट वाटलें.

---

## कथा ३३ वी.

## (भरतभेट.)

भरतास श्रीराम म्हणजे आईपेक्षांही प्रिय. जसें एखादें चुकलेलें वासरूं गाय पाहतांच तिचेकडे धांवत जातें, त्याप्रमाणें भरत धांवत सुटला. चालतां चालतां राम चालून जेथें चक्रपद्मांकित पाउलें उठलीं होतीं तेथील माती उचलून भराभर डोक्यावर घालून चाले. आईला जसें लेंकराविषयीं

प्रेम, तसेंच रामालाही भरता विषयीं प्रेम उचंबळलें. दोघांच्या भेटी होतांच एकमेकानें एकमेकाच्या कंठास फारच दृढ मिठी मारिली. ती कोणास सुटेचना. मग जेव्हां उभयतांच्या नेत्रांतून प्रेमाचे लोट वाहले, तेव्हां ती भिजून सैल होऊन सुटली. त्या प्रेमाला कांहीं सीमाच नाहीं. नंतर कौसल्या, सुमित्रा, शत्रुघ्न, वशिष्ठ ह्यांच्या भेटी होऊन तेथें प्रेमाचा शोकरस खूपच वाहला. नंतर वडील ( दशरथ ) खुशाल आहेतना? असें म्हणतांच वियोगजन्य जो शोकरस तेथें वाहला त्याचें वर्णनही करवत नाहीं. नंतर श्रीराम वडील असल्यानें त्यानेंच उत्तर कार्य उरकलें. इतकें झाल्यावर भरतानें रामास म्हटलें, कैकयीनें जें काय केलें तें असो.

आतां आपण गांवीं येऊन बापाप्रमाणें आमचें रक्षण केलें पाहिजे. आणि असें होणार नाहीं तर मी आतां माघारा फिरणार नाहीं. जेथें आपले पाय तेथें हा चाकर राहणार. कैकयीनेंही म्हटलें रामा, मजवर कृपाकर, मी करूं नये तें केलें. पण आतां माघारा चल. राम म्हणाले जें होणें तें ज्याच्या त्याच्या प्रारब्धानेंच होतें. मनुष्य निमित्त मात्र कारण असतो. कैकयी लोक तुला दोष देतील तर देवोत, मी तुला कौसल्ये प्रमाणेंच मानतों. आतां बापाचें वचन मला पाळलेंच पाहिजे. नाहीं तर मींच सूर्य वंशाला दोष लावला

असें होईल. भरता, बापाची आज्ञा तुलाही पाळलीच पाहिजे. चौदा वर्षे तूं राज्य करावें व मीं अरण्यांत रहावें. चौदा वर्षे काय? आतांच जातील. इतकें रामानें सांगितलें तरी भरत ऐकेना. शेवटीं वशिष्ठाकडून अवतारगुह्य भरतास सांगविलें, तेव्हां भरतानें रामास परत नेण्याचा हट्ट सोडला. तरी त्यानें रामास चकचकीत सांगितलें कीं, चौदावर्षें आणि चौदा दिवस पुरे होतांच पंधराव्या दिवसाच्या सूर्य उदयाची खोटी. आपले पाय दृष्टी न पडले कीं, अग्नींत उडी टाकीन. कुंड तयार करून आधींच पेटवून ठेवीन. आणि चौदा वर्षे अयोध्येंत जायचा नाहीं. गांवा बाहेर नंदीग्रामीं आपल्या पादुकांची सेवा करीन. तें रामानें मान्य करून तेव्हांच त्यास आपल्या पादुका दिल्या. त्या मस्तकांवर घेऊन भरत तेथून निघाला. तो नंदिग्रामीं येऊन राहिला. व शत्रुघ्नाकडे त्यानें सर्व राज्यव्यवस्था सोपविली. रामानें वडाचा चीक घालून जटा वळल्या, त्याचप्रमाणें त्यानेंही जटा वळल्या व पर्ण कुटिका बांधून अंगास भस्म फासून श्रीरामध्यानीं निमग्न होऊन गेला.

## कथा ३४ वी.

### ( वेडे ब्राह्मण. )

एकदां चित्रकूटावरील सगळ्याच ब्राह्मणांनीं एकत्र

होऊन रामास तेथून हुसकून देण्याचा विचार केला व ते सारेच रामाकडे येऊन म्हणाले कीं, तूं येथून एक चालता हो नाहींतर आह्मी तरी येथून चालते होतों. कांकीं, तुझी बायको पडली सुंदर, तिच्या योगानें येथें वारंवार विघ्नें येणार, नुकतेंच असें ऐकण्यांत आलें आहे कीं, खरदूषण आदिकरून राक्षस तुझेसाठीं येथें येण्याच्या तयारींत आहेत. राम ह्मणाले, तुह्मी तिलमात्र काळजी करूं नका. काळासही मी ठार करीन, तर इतराची कथा काय? ब्राह्मण म्हणाले छी; तें कांहीं नाहीं. तूं येथें असलास तर आम्हांस गेलेंच पाहिजे. प्रसंग आल्यावर तूं आपले बायकोस सांभाळशील कां आह्मांस? असें बोलून ते वेडे तेथून निघूनच गेले. फक्त एक महाराज वाल्मीकि मुनि मात्र राहिले.

---

## कथा ३५ वी.

## ( प्रवास व ऋषि-दर्शनें. )

रामचंद्र कांहीं दिवस चित्रकूटावर राहून तेथून दक्षण दिशेनें चालता झाला. वाटेंत त्यास अनेक ऋषींचे आश्रम लागले. त्या ठिकाणीं थोडा फार मुक्काम केलाच. कोठें चार घटका, कोठें दिवसभर, कोठें आठवडा, कोठें पंधरवडा, पराकाष्ठा एक महिना आणि कोठें वर्ष ह्या प्रमाणें मुक्काम

करीत चालला. ह्या प्रमाणें त्यानें सुमारें बारा तेरा वर्षे लोटली. इतक्या काळांत त्याच्या ब-याच ऋषींच्या गांठी पडल्या. ह्याच वेळीं सह्याद्रीवर गेला असतां श्रीदत्तात्रय महाराजांची गांठ पडली. उदंड अवतार झाले पण असा दयाळू दुसरा अवतारच नाहीं. इतर अवतारीं दुर्जनांस शिक्षा केली आहे, पण ह्या अवतारीं शिक्षा अशी नाहींच. उत्तम शिक्षण हेंच दिलें गेलें. अत्रिऋषि यांचे पोटीं महाराजांनीं अवतार घेतला. त्यांचा आश्रम येथेंच होता. अनुसूया महा- पतिव्रता, अशा त्या दोघांचें प्रभूनें दर्शन घेतलें. दुष्टांपासून ह्यांना भीति होऊं नये म्हणून अत्रिअनुसूयेनीं ह्यांना आशीर्वाद दिले. जणू ती केवळ अभयकवचेंच ह्यांचे अंगावर घातलीं. अनुसूयेनें सीतेची वेणीफणी करून सुंदर पुष्पांचे हार घातले, कपाळीं कुंकाचा टिळा लावला, व अंगास चंदनाची उटी लावली." ती त्या पतिव्रतेच्या पातिव्रत्याची साक्षच होय. कांकीं, ती वेणी सीतामाई चौदा वर्षांनीं माघारीं येई पर्यंत जशी आतांच घातली अशी दिसे. तसाच कुंकवाचा टिकला सदा ओला झरझरीत सतेज! अंगावरली उटीही अ- शीच, शिवाय उन्हाळ्या मध्यें थंड, हिवाळ्यांत उष्ण व क- साही पाऊस अंगावर पडला तरी एक तिळभरही झडून गेली नाहीं! हें असोच पण गळ्यांत घातलेले पुष्पहार व वेणींत

गुंफलेलीं फुलें सदा टवटवीत, जशीं आतांच झाडावरून तोडून आणलीं आहेत! ह्यापेक्षां त्या पतिव्रतेचें माहात्म कांय सांगावें! फुलांना व उटीला सुगंध तर इतका कीं, सुगंध-लुब्ध जे भ्रमर, त्यांच्या झुंडीच्या झुंडी सीता माते भोंवतीं रुंझी घालीत हिंडत असत. पण कोणी त्यांना त्रास देत नव्हता. असो तेथेंच जवळ रेणुकेचें स्थान होतें. पूर्व अवताराची ती रामाची माता व तीच आतांची कौसल्या. तिचें दर्शन घेऊन रामानें तिचीं बहुत स्तोत्रें गायलीं. सुमारें तीन रात्र सह्याद्रीवर प्रभु होते. मार्ग चालतांना सीतेविषयीं दोघांनींही फार काळजी घ्यावी, अमळ सीता दूर राहीली कीं, त्यांनीं थांबावें. दमल्यासारखी वाटली तरी एखाद्या झाडाखालीं बसावें. बहुधा शिळोप्याचे वेळीं मार्ग चालून उन्हाचे वेळीं खुशाल एखाद्या दाट रायींत विश्रांती घ्यावी. व सीतामाई अगदींच थकल्या कीं एखाद्या आश्रमांत मुक्कामच करावा. फळामुळांवांचून दुसरें कांहीं त्यांनीं खाल्लेंच नाहीं. लक्ष्मण तर सदा उपवाशींच! रामाला वाटावें ह्यानें बाहेर फळें खाल्लीं असावींत, ह्मणून आणलेल्या फळांतून 'घा लक्ष्मणा हीं घे खा' असें रामानें त्यास कधीं ह्मटलें नाहीं. व त्यानेंही रामानें खा ह्मटल्यावांचून कधींच खाल्लें नाहीं. झोंपेचाही त्याचा हाच प्रकार, राम-

सीता निद्रिस्थ झाली कीं, यानें धनुष्यावर बाण ठेऊन खडे उभें असावें. मिळून आहार आणि निद्रा यांवांचून सारखीं चौदा वर्षें लक्ष्मणानें लोटलीं! असो.

---

## कथा ३६ वी.
## ( विराधाचा उद्धार. )

सुमारें तिसरा प्रहरचा वेळ होऊन गेला आहे. सूर्याचा प्रखरपणा मोडून सूर्यास्ताची जी सुंदर शोभा ती चोहींकडे पसरली आहे. प्रवाशांस ही वेळ मोठ्या सुखाची वाटत असल्यानें मोठ्या आनंदानें व गडत अंधार पडण्याचे पूर्वीं कोठें सोईसकर मुक्काम मिळावा म्हणून घाई घाईनें चालले आहेत. आमचें हें बंधुद्वय आनंदयुक्त घाईनें चाललें आहे. सीतामायी आपल्या मंद मंद गतीनें त्यांना खोळंबा करीत आहेत. त्याबद्दल त्रास न मानतां तो खोळंब्याचा वेळ हें बंधुद्वय भोवतालची शोभा पाहण्यांत दवडीत आहे, तोंच एकाएकीं सीतेनें कर्कश किंकाळी फोडली. ती कानीं येतांच आधीं रामानें धनुष्य जोडून वर बाण ठेऊन ओढून नंतर मागें पाहिलें. तों भल्या मोठ्या काळ्या लोंध राक्षसानें सीतेस बगलेंत मारून चालविलें आहे; असें पाहतांच रामानें अर्ध चंद्रकार बाण मारून धडापासून त्याचें डोकें व बगले-

तून सीता हीं दोन्ही एकदमच खालीं उतरविलीं. इतक्यांत त्या राक्षसाच्या शरीरापासून एक दिव्य पुरुष उत्पन्न होऊन तो रामचरणीं लागून म्हणाला, आहो रामचंद्रा मी गंधर्व आहें, माझें नांव विराध, मी तुंबर ऋषीला त्याचें घोड्यासारखें तोंड पाहून हंसलों. म्हणून त्यानें मला राक्षस होशील असा शाप दिला, तें मला मनस्वी वाईट वाटून मी त्याची अतिशय मनोधरणी केल्यावरून 'रामचंद्र प्रभूच्या बाणापासून तुझी मुक्ति होईल' असें त्यानें मला सांगून ठेवलें होतें. आतां मी आपले कृपेनें आपले लोकीं गमन करतों. महाराज मी सांगतों हें नीट लक्षांत ठेवावें. ह्या दिशेनें वेळोवेळ दुष्टराक्षस आपणांस भेटतील तर आपण निरंतर सावधगिरीनें असावें. व येथून जवळच शरभंग नांवाचा एक योगी आहे, तो आपले दर्शनाची आशा करून आहे. त्याला भेटल्यावांचून पुढें जाऊं नका. इतकें बोलून रामास नमस्कार करून आकाश मार्गानें चालता झाला.

---

## कथा ३७ वी.

## ( शरभंग व राम ह्यांची भेट. )

शरभंग हा महान् योगी होता. इतका कीं त्याला स्वर्गी नेण्यासाठीं देवेंद्रानें विमानही पाठविलें होतें, परंतु रामदर्श-

मा नंतर जें काय तें पाहूं, असें सांगून त्यानें स्वर्गीचें विमान माघारें परतविलें. असा तो महा समर्थ योगी. त्याचे अंगास पूर्व पातकें करून गलित कुष्ट भरलें होतें. ह्याहीपेक्षां दुर्धर रोग त्यानें लोकांचे बरे केले असतील, तेव्हां त्याचा त्याला बरा करतां येत नव्हता असें नाहीं, परंतु कर्मभोग तो भोगलाच पाहिजे. त्यावांचून सुटका नाहीं. एवढ त्यानें त्याची काळजी घेतली नव्हती. असो मग रामचंद्र आपले आश्रमा नजीक आले, असें त्यास कळतांच त्यानें आपलें तें जुनें शरीर एकीकडे झोळीखालीं झांकून श्रीचे दर्शनापुरता सुंदर देह धारण केला. रामचंद्राचें आश्रमांत पाऊल पडतांच सर्व ब्राह्मण पटापट धांवले. शरभंगही पुढें येऊन त्यानें मोठ्या सन्मानानें आपल्या आश्रमांत नेऊन त्याची यथासांग पूजा चालविली. त्याचा जो कर्मदेह झांकला होता तो थरथर कांपत होता. म्हणून तें काय तें पाहण्यासाठीं लक्ष्मणानें झांकण कांढलें, तों दुरवरून दुर्गंधीनें त्याचें नांक कोंदून गेलें. ऋषीनें त्यास सर्व हकीगत सांगितली. आणि म्हटलें, कर्मभोग भोगलाच पाहिजे. मला त्या शरीराच्या दुःखापेक्षां स्नानाची वेळ आली कीं, प्राणांताचा समय वाटतो. उन्ह पाणी खिळत नाहीं, गार पाण्यानें स्नान करावें लागतें, पाणी अंगावर घेतलें कीं, ज्या

तितका उत्साह तेणें करून बहुधा घटकाभर तरी आयुष्य उरलें आहे कीं; नाहीं असें वाटतें. रामानें तितकेंच त्याचें बोलणें लक्षांत ठेऊन दुसरे दिवशीं स्नानाचे वेळीं बाण मारून पाताळांतून उष्णोदकाचा झरा वर आणिला. त्यांत ऋषीनें स्नान करतांच त्याचा दिव्य देह झाला. व मग लागलेंच इंद्राचें विमान येऊन तो स्वर्गींच गेला.

नंतर सुतीक्ष्ण ऋषीचें दर्शन घेऊन स्वारी पुढें चालली, तों मार्गांत एके स्थळीं भूगर्भांतून सुस्वर गायनाचा ध्वनि रामाचे कानीं येऊं लागले. तो प्रकार असा होता कीं, मंदकर्ण नांवाचा एक ऋषि असे. त्यानें फारच उग्र तपश्चर्या चालविली. त्याच्या तपाचा भंग व्हावा ह्या उद्देशानें इंद्रानें त्याच्याकडे सुंदर सुंदर अप्सरा पाठविल्या. त्यांनीं गायनादि प्रकारांनीं त्या ऋषीस अगदीं मोहूनच घेतलें. त्यामुळें भूमींत विवर कोरून तो तेथें त्यांचें गायन ऐकत होता. तो ध्वनि रामाचे कानीं येत असे. असें रामास तेथील एका ब्राह्मणांकडून समजलें. असो राम येथें आले हें त्या मंदकर्णाला ज्ञानानें समजून तो वर आला. प्रभु त्याचें दर्शन घेऊन एक रात्र तेथेंच राहिले.

स्वारी पुढें चालती झाली. पुढें सुतीक्ष्ण ऋषीचें दर्शन घेऊन जवळच अगस्ति महामुनीचा आश्रम असल्यामुळें त्या-

त्या भेटीविषयीं रामास परम उत्कंठा झाली. कांकीं, त्याचे सामर्थ्याविषयीं सुतीक्ष्ण ऋषीनें त्यास असें सांगितलें होतें कीं, आतापि वातापि आणि इलवल असे तिघेजण मोठे मायावी दैत्य शंकराच्या वरानें महाउन्मत्त होऊन गेले होते. ते एका मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर उ-त्तमसा आश्रम बांधून कोणा एखाद्या वाटसरास फसवाव-याची वेळ आली कीं, आतापीनें उदार ब्राह्मणाचें सोंग घेऊन वाटसरांस आश्रमांत आणावें. तों इकडे वातापीनें सुंदरसें अन्न, कंद, मुळें, फळें, बनावें व इलवलानें पाणी बनावें. आतापीनें मग त्या वाटसरास तें अन्न, फळें वगैरे यथेच्छ खावयास घालून पाणी पाजावें. आणि 'रे वातापि रे इलवला यारे या' असें ह्मणावें कीं, लागलेंच त्या दोघांनीं त्या बिचाराचें पोट फाडून बाहेर पडावें. अर्थात तो प्राणी मेला कीं तिघांनीं यथेच्छ खाऊन टाकावा. अशीं त्यानें स-हस्त्रावधि मनुष्यें मारून खाल्लीं. कालेंकरून हें त्याचें कपट बाहेर फुटून त्यांचा नाश करण्याबद्दल जो तो अगस्तीची विणवणी करूं लागला. तेणेंकरून एकेवेळीं अगस्ति मु-द्दाम त्या मार्गानें गेले. हे वाटसरांची वाट पहातच होते. आतापीनें झटकन ब्राह्मण वेष धरून त्यांचेकडे जाऊन ह्म-टलें ' भटजी या आमच्या आश्रमांत, थोडासा उपहार क-

रून जा ' असें ह्मणून अगस्तीला आश्रमांत घेतलें. अगस्ति महाथोर, मुखाचे ठायीं सदा वेदघोष चालतच आहे. पाठीवर धनुष्यबाण आहेतच! तो आंत जाऊन बसण्यापूर्वीच वातापि रानफळें बनून बसला. अगस्तीनें तीं फळें तर सपाटलींच, आतां तें इलवलरूपी पाणी पिणार तोंच दैत्यांचें कपट त्याचे ध्यानांत येऊन पोटावर हात फिरवून वातापीची आंतचे आंतच रक्षा करून टाकिली. वातापि जों आतापीला हाक मारतो तों तेथें काय आहे? असें होतांच बाकीचे दोघेही धावरून जाऊन त्यांनीं दैत्यस्वरूपें प्रगट केलीं. अगस्तीनें तीक्ष्णबाण मारून वातापीचा निकाल केला. तें पाहून इलवलानें तत्काळ तेथून धूम ठोकली. अगस्तिही त्याचे मागें लागला. इलवल तत्काल समुद्रांत शिरून जलरूप होऊन गेला. अगस्तीच्या हें लक्षांत येतांच त्यानें सगळा समुद्र गट्टकरून दैत्याची रक्षा केली; आणि नंतर मूत्रमार्गानें समुद्राचें पाणी पोटांतून काढून टाकलें. समुद्राचा क्षारपणा ही ह्याची प्रत्यक्ष साक्ष होय. हें ऐकून अशा महात्म्या पुरुषाचें दर्शन केव्हां होईल असें श्रीसमर्थांना होऊन गेलें. आश्रम म्हणण्या सारखा दूर नव्हताच. मध्यंतरीं अगस्तीचा भाऊ ह्याची गांठ घेऊन हा हा म्हणतां प्रभु तेथें गेले. तेथें त्याच्या तपाच्या मूर्ति.बनून त्या त्या सर्व आश्रमभर जागती जोत फसरल्या

असत जिकडे तिकडे वृक्षांची गर्द राई लागून गेली होती, निरानिराळ्या ऋतूंत होणारीं फळें, पुष्पें आपआपल्या ऋतूंची अपेक्षा न ठेवतां सदासर्वदा वृक्षांवर भरलेलीं असत. गायी इच्छा त्या वेळीं दूध देणाऱ्या, पाणी सुरेख, पशुपक्षी आपसांतील वैर विसरून आनंदानें एकमेकांशीं खेळत, शिष्यमंडळी वेदपठणांत सदा निमग्न. असा तो थाट पाहून रामास परम समाधान झालें लागलींच उभयतांची गांठ होऊन उभयतांस अत्यंत आनंद झाला. अगस्तीची बायको लोपामुद्रा ही महाथोर पतिव्रता, तिनें सीतेचें भारीच आगत स्वागत केलें. असो अगस्तीनें रामास एक महिनाभर आपले घरीं ठेऊन घेतलें. तितक्या वेळांत अगस्तीनें रामास कांहीं अस्त्रविद्येचेंही ज्ञान करून दिलें. नंतर त्यांना विचारून श्रीराम पंचवटी मुक्कामीं गेले.

---

## कथा ३८ वी.

## ( श्रीराम-जटायु-भेट. )

राम पंचवटीकडे येत असतां वाटेंत एके ठिकाणीं जटायु पक्षी त्यांना आढळला. तो गृध्र पक्षांचा राजा होता; दशरथ त्याला आपल्या भावाप्रमाणें मानीत असे. तो जणू एक प्रचंड राक्षस दिसे. व हा खराच राक्षस समजून रामानें

ठार करण्यासाठीं धनुष्यवर बाण ठेविला देखील होता, सोडणार तों इतक्यांत एकमेकांनीं एकमेकाचें वृत्त विचारल्यामुळें रामाकडून ह्या त्याच्या हितकर्त्याचा नाश झाला नाहीं. असो मग रामाला वाटलें आपण आपल्या बापाच्याच घरीं आलों. जटायूचे विचारानें तो, जनस्थान म्हणजे नाशीक क्षेत्रीं पवित्र अशा पंचवटी स्थळीं गोदावरीच्या कांठीं आश्रम बांधून चौदा वर्षें तेथेंच पुरीं करावींत अशा उद्देशानें राहिला. ह्या प्रसंगीं कितीएक भिल्लिणी रामाच्या शिष्यिणी बनून त्या रामास नित्य सुंदर सुंदर फळें आणून देत असत.

## कथा ३९ वी.

## ( शंभरासुरवध. )

पंचवटींत राम राहिल्यापासून त्याचा काळ मोठ्याच सुखानें जात चालला. जटायूनें अनेक प्रकारच्या जुन्या जुन्या मनोरंजक गोष्टी सांगून त्याच्या मनाची सदा सर्वदा करमणूक करीत असावें. रामसंरक्षणाचा लक्ष्मणाचा नित्यक्रम चालू होताच. एकेवेळीं फळें आणण्याच्या उद्देशानें लक्ष्मण रानांत हिंडत असतां एकाएकीं देदीप्यमान तरवार आकाशांतून खालीं येत होती, ती सहज लक्ष्मणाच्या हातीं

आली. वीरास शस्त्राची मोटीच हौस. लक्ष्मणानें मोठ्या प्रीतीनें तें खड्ग उचलून त्याच्या धारेच्या तीक्ष्णपणाच्या चौकशीसाठीं जवळच एक वेलीची जाळी होती तीवर ती तरवार फेंकली. तेणें करून पटकन ती जाळी तुटून आंतून रक्ताचा पाट बाहेर आला. तेव्हां खास कोणी तरी ब्राह्मण येथें तपश्चर्येस बसला होता, त्याचा आपण आपले हातानें नाश झाला; ह्याबद्दल त्यास मनस्वी खेद होऊन तो तसाच रामाकडे परत येऊन झालेला प्रकार सांगता झाला. राम अंतरज्ञानीच, त्यांनीं अमळ विचार करून आनंदानेंच म्हटलें, रे लक्ष्मणा फार चांगलें झालें. तुला खेदाचें कांहींच कारण नाहीं. आज तूं मोठेंच पुण्य जोडलें, कां कीं, तुझ्या हातून जो मेला गेला तो महा खळ होता. तो रावणाचा भाचा, त्याचें नांव शंबरासुर, शूर्पणखा जी रावणाची बहीण, तिचा तो मुलगा. आपल्याला काळखड्ग मिळावें म्हणून तो त्या जाळींत शंकराची आराधना करीत होता. व्हावी इतकी त्याची तपश्चर्या झाल्यानें शंकारानें प्रसन्न होऊन त्याचेकडे तें खड्ग रवाना केलें होतें. तें तुझे हातीं लागून ज्याचें कुडें तें त्यालाच नडलें. तेणेंकरून लक्ष्मणास समाधान झालें. असो असा प्रकार झाल्यानें रामानें लक्ष्मणास सांगितलें कीं, आतां मात्र सावधपणाणें वागावें.

मोठ मोठे अनर्थांचे प्रसंग गुजरण्याचें हें बीजच झालें असें समज.

---

## कथा ४० वी.

## ( शूर्पणखाविटंबना. )

इकडे शंभर ज्या दिवशीं मेला त्याच रात्रीं लंकेंत शूर्पणखेला पुत्र मेल्याचें सूचक असें अमंगळ स्वप्न पडलें. त्यामुळें ती फारच घाबरी होऊन दोघी चौघी मैत्रीणींस घेऊन जनस्थानप्रदेशीं येऊन पाहते तों स्वप्नाचा खरा अनुभव तिला प्राप्त होऊन तिनें मनस्वीच शोक केला. इतक्यांत नित्याप्रमाणें लक्ष्मण जो तेथें आला तोंच त्याची ती क्षत्रियआकृति पाहुन त्यानेंच पुत्रवध केला असें त्या सर्वांस वाटून शूर्पणखा त्यास ठार मारण्यासाठीं देवांगनेसारखें सुंदर रूप धारण करून लक्ष्मणाकडे येऊन ह्मणाली, महाराज आपणांस पाहून मी फार मोह पावलें आहें, तर आपण माझें पाणीग्रहण करावें. लक्ष्मण पूर्ण रामाचा आज्ञा धारक, त्यानें ह्मटलें माझा वडील बंधु श्रीराम पंचवटींत आहे, त्याचें आज्ञेवांचून कांहींच व्हावयाचें नाहीं. तें ऐकून रामाला भेटण्यासाठीं ती रामाकडे गेली. रामानें तिचे पाठीवर लिहिलें कीं, हिचें नाक, कान कापावे. तिला मात्र वाटलें कीं,

आतां काम झालें. आतां ह्या दोघांसही ठार मारून सीतेला नेऊन रावणास नजर करावें, म्हणजे रामलक्ष्मणांबद्दल तो जो नित्य घोर घालीत आहे तो दूर होऊन सीतेसारखी सुंदर बायको त्याला मिळवून दिल्याबदल त्याची आपणावर खूपच प्रसन्न मर्जी होईल. आशा रीतीनें ती हर्षायमाण होत्साता लक्ष्मणाकडे आली. तोंच रामाज्ञा पाहून संकेताप्रमाणें त्यानें तत्काळ तिची बिदागी केली.

---

## कथा ४१ वी.

### ( खरदूषणत्रिशिरवध. )

शूर्पणखेचा हा असा सर्वच भ्रम नाहींसा झाल्यामुळें व विशेषता अशी विलक्षण मानखंडणा झाल्यामुळें जवळच खरदूषणात्रिशिर नांवाचे राक्षस जनस्थानप्रांतीं रावणाचे मांडलीक ह्या नात्यानें राज्य करीत होते, त्यांचेकडे जाऊन तिनें कच्चें वर्तमान त्याचे कानीं दिलें. मूर्खच ते ! त्यांना काय ! लागलेच ते चौदाहजार सैन्य घेऊन तिघेही रामाकडे चाल करून आले. पण काय ? जणूं जसे चौदा हजार सर्पच ते गरुडच्या अंगावर आले. ह्या न्यायाप्रमाणें श्रीरामानें त्या सर्वांचा एका क्षणांत फडशा उडवला.

## कथा ४२ वी.

## ( हीच आग लंकेवर गेली. )

खरदूषणादिकांचें वाटोळें करून ही नकटी तहत लंकेस गेली. नंतर नाकाचें रक्त गळत आहे अशा अवस्थेंत बेधडक भरसभेंत जाऊन तिनें वडील दादा जो रावण त्यास कच्चें वर्तमान सांगून म्हटलें, दादा ती त्याची सुंदर स्त्री सीता ही तुझ्यासाठीं आणण्या करतां प्रयत्न करीत असतां हा प्रसंग झाला, तर आतां तुला ह्याचा अभिमान असूं दे. रावण मदोन्मत्तच, तेथें विचार कशाचा, ? अमुक रीतीनें आपलें कार्य साधावयाचेंच येव्हढें मनांत योजून त्यावेळीं मारीच जो महामायावी तो गोकर्णक्षेत्रीं होता तेथें त्याचेकडे जाऊन ह्मणाला, रे मारीच्या तूं सुवर्णकांतीनें युक्त असें हरिणाचें रूप घेऊन पंचवटी क्षेत्रीं जा. आणि तेथें जो क्षत्रिय कुमार राम राहिला आहे, त्याला एकट्याला आपल्या लोभानें खूप लांब घेऊन चल, म्हणजे मी त्याच्या बायकोला पळवून नेईन. मारीच म्हणाला रे रावणा, नकोरे नको! तो राम महान् पराक्रमी आहे. त्याच्या बाणाच्या पिसाऱ्याच्या वाऱ्यानें मी विश्वामित्राच्या आश्रमांतून जो उडालों तो येथें येऊन पडलों. तर तुला सांगतों कीं, त्याच्या बायकोकडे तुला पाहणेंही अशक्य आहे मग पळविणें

कोटचें ? तें ऐकून रावण संतापून ह्मणाला मूर्खा मनुष्यप्राणी जे आपलें भक्ष्य त्यांचा पराक्रम मजपुढें वर्णितोस ? तुला लाज वाटत नाहीं ? असो. मी सांगतों त्याप्रमाणें कर, नाहींतर आतांच ठार करीन. मारीचानें ह्यावेळीं असा विचार केला कीं, ह्याचें ऐकलें तरी रामहस्तानें मृत्यु होत आहेच, आणि न ऐकलें तर ह्या दुष्टाच्या हस्तानें मृत्यु होत आहे. तेव्हां आतां महामारीनें गांटल्यास खुशाल गंगेंत उडी टाकावी, तेव्हां रामहस्तानें मरणें हेंच बरें. असा विचार ठरवून तो तत्काळ पंचवटींत येऊन सुंदर सोन्याच्या हरणाचें रूप धारण करून रामाच्या आश्रमापुढें वागडूं लागला. तें असें अलौकिक सुंदर हरीण पाहतांच सीतेला वाटलें, ह्याच्या कातड्याची चोळी अंगांत घालून आपल्या बहिणीस दाखवावी, ही जी दुष्ट हौस तिला उत्पन्न झाली, तिनेंच तिला महान् संकटांत टाकलें. असो. तिनें तो हरीण मारण्यासाठीं रामास इतकी कांहीं निकड लावली कीं, रामाचा तेथें कांहींच उपाय चालेना. सीतेनें त्याचे हातीं धनुष्यबाण देऊन लागलेंच आश्रमा-बाहेर घातलें. त्यामुळें सीतेच्या रक्षणां विषयीं लक्ष्मणास वाजवी पेक्षां फाजील काळजी घ्यावयास सांगून राम हरि-णामागें लागला. तो बराच दूर गेल्यावर योग्य संधान पाहून त्यानें हरणाचें मर्मस्थळीं बाण मारला. तो काय रामबा-

णच! तेव्हां त्यानें हरीणरूपी मारीचाचा अंत केलाच. आतां आपला अंतसमय जाणून मारीचानें आपलें राक्षसरूप प्रगट करून रामाच्या आवाजासारखा आवाज काढून 'रे लक्ष्मणा, गे सीते धांव' अशी आरोळी टोकून प्राण सोडला. ती आरोळी सीतेचे कानीं येतांच ती अगदींच घाबरून गेली. तिला वाटलें लक्ष्मण, रामास साह्य करण्यासाठीं जाईल. पण त्याला राक्षसीमाया व रामसामर्थ्य पक्कें ठाऊक. तो कशाचा जातो! तें पाहून सीता म्हणाली रे निर्दया लक्ष्मणा, कांरे अझून तूं येथेंच उभा? तुझे कान फुटले काय? संकटांत पडल्यामुळें स्वामीनें हाक मारलेली तुझे कानीं आली नाहीं काय? सीतेचें अज्ञान जाणून लक्ष्मण तिच्या ह्या बोलण्यानें अमळ हंसूं लागला. तोंच तिचे मनांत भलतीच कल्पना येऊन ती अत्यंत संतापानें ह्मणाली रे लबाडा, समजलें तुझें कपट, कायतरी हे भाऊ! एकानें आमचे हातीं नरवटी देऊन आह्मांला घरा बाहेर घातलें. तो एक बरा तरी, परंतु तोंडावर गोड आणि पोटांत विष असा तूं आहेस! हें मला आतां समजलें. तूं जो आमचे बरोबर बाहेर पडलास त्यांत तुझा मानस हा कीं, रामास कोठें तरी संकटांत घालून ठार करावें, आणि मग मला (सीतेला) आपण बळकावें. समजलें तुझें कपट! पण ध्यानांत ठेव, ही तशांतली

बायको नाहीं; ही तडकन् प्राणच देइल. असो लक्ष्मणाची योग्यता एक लक्ष्मणालाच! इतकीं वर्षे सीते बरोबर होता पण सीतेचे पाय मात्र त्याच्या ओळखीचे होते, बाकी सीता कशी आहे हें त्याला खरोखरच ठाऊक नव्हतें. सुमित्रेपेक्षांही तो सीतेची योग्यता जास्त मानीत होता. त्याला हे शब्द किती कठीण वाटले असतील बरें? असो. तरी तो ह्मणाला सीतामायी रामाचा पराक्रम आपणांस ठाउका नाहीं. अहो राम त्रैलोक्याचा क्षणांत नाश करणारा होय. इत्यादि तो कांहीं बोलणार तोंच ती म्हणाली रे कपट्या जा येथून काळें तरी कर. माझें नख देखील तुला प्राप्त व्हायचें नाहीं. हें ऐकून त्यानें धनुष्याच्या टोकानें आश्रमापुढें एक रेषा ओढून ह्मटलें कीं, कृपाकरून ह्या रेषेच्या बाहेर पाऊल ठेऊं नको. इतकें सांगून ह्या तीव्र भाषणानें कष्टी होत्साता रडतच रामाकडे गेला.

सीता आश्रमांत एकटी केव्हां सांपडेल हीच रावण संधी पाहत होता. लक्ष्मण दूर गेला असें पाहतांच तो यतिवेष धारण करून आश्रमापुढें येऊन म्हणाला. गे आई मी उपाशी आहें, कांहीं तरी भिक्षा घाल. हा खरा कोणी अतिथि आहे असें जाणून कांहीं फळें घेऊन सीता म्हणाली. ये हींघे फळें. तो म्हणाला छीः ह्या रेषेचे बा-

हेर तुम्ही या आणि मला द्या. पण सीतेस तसें करतां येईना. शेवटीं 'खाण्यावांचून मी आतांच मरतों' असा 'ब-हणा करून रावण तेथें गडबडा लोळूं लागला. तें त्याचे कष्ट सीतेला पाहवेनात म्हणून सीता फळें घेऊन मर्यादा ओलांडून पुढें गेली. झालें, जिनें मर्यादा सोडली तिचे पाठीं अनर्थ लागलाच. सीता आपले आटोक्यांत आली असें पाहतांच रावणानें आपलें उग्ररूप प्रगट केलें व लाग-लींच सीतेस खांद्यावर घेऊन धांव मारली.

## कथा ४३ वी.

## ( जटायुभेट. )

दैव फिरलें म्हणजे सर्वच गोष्टी प्रतिकूळ होतात. जटायु हा नेहमीं आश्रमांत असायचा, पण ह्याचवेळीं तोही कोठें गेला होता. आपले वर संकट ओढवलें व तें आपण आ-पले हातानें आपणावर ओढून घेतलें ह्याबद्दल सीतेस भारी पश्चाताप झाला, व मग ती मोठमोठ्यानें रामलक्ष्मणांची नावें घेऊन आक्रोश करूं लागली. ती असें म्हणाली अहो रामचंद्र, भावोजींस जीं मीं दुरुत्तरें केलीं त्याबद्दल आधींच राग धरूं नका. आधीं मला सोडवा व मग मजकडून लक्ष्मणांस हात जोडवा. इत्यादि प्रकारें सीता आक्रोश

करीत होती. ते तीचे शोकशब्द जटायूचे कानीं येऊन तो तत्काळ धांवत येऊन चोंचीचे एकाच घावानें त्यानें रावणाचा रथ मोडून त्यास खालीं पाडून सीतेस मोकळें केलें. हा प्रकार पाहून हा रामभक्त जाणून रावणानें त्यास रामाची शपत घालून त्याचें मरण विचारलें. तो खराच रामभक्त, त्यानें ह्या दुष्टाला सांगितलें कीं, माझे पंख उपटले असतां मी मरेन. रावणानेंही उगेंच सांगितलें कीं, माझ्या डाव्या पायाचा आंगठा फोडला असतां मी मरेन. तें ऐकून जटायूनें झटकन् त्याचा आंगठा फोडला. तोंच रावणानें त्याचे पंख उपटून लोला करून त्याला पाडिलें व सीतेस खांद्यावर घेऊन आकाशमार्गानें धांव मारली. ह्यावेळीं सीतेला अनिवार दुःख उत्पन्न झालें. आपणास कोणीं नेलें व कोठें नेलें हें ही श्रीरामास कळणें कठीण! असें वाटून कांहीं तरी माग मिळावा म्हणून तिनें आपले कांहीं डागीने, आधा तिचे जवळ कांहीं नवतेंच, फक्त सौभाग्यार्थ जीं मंगळभूषणें उरलीं होतीं त्यांतूनच कांहीं काढून अंगावरील वस्त्राची चिंधी फाडून त्यांत ते बांधून खालीं टाकून दिले ते ऋष्यमूकपर्वतावर पडले. त्या वेळीं तेथें नळ, नीळ, जांबुवंत, मारुती, सुग्रीव असे पांच वानर कांहीं गोष्टी बोलत बसले होते त्यांच्या पुढेंच तें गाठोडें पडलें. हें कोठून आलें म्हणून

जे ते पाहतात तों रावण कोणा एका स्त्रीस घेऊन जात आहे असें त्यास भासून सीतेचें रडणें ही त्यांचे कानीं आलें. इतक्यांत एकानें गाठोडेंही सोडून पाहिलें. तेव्हां मारुतीरायास मोठा चेव येऊन तो उडी मारणार इतक्यांत रावण दिसेनासा झाला. असो. मग ह्या स्त्रीचे शोधास जर कोणी आलें तर ही त्यास खूण देऊं, अशा हेतूनें त्यांनीं तें गाठोडें मोठ्या काळजीनें ठेविलें. इकडे रावणानें सीतेला तर लंकेंत नेऊन अशोक वनांत एका वृक्षा खालीं ठेऊन मोठ मोठ्या भयंकर दुष्ट राक्षसी तिच्या भोवतीं ठेऊन जेणेंकरून ती आपणास वश होईल असे धाकाचे, प्रीतीचे वगैरे उपाय करावयास सांगितले. ह्या रीतीनें आपल्या मूर्खपणाचें फळ जगाची स्वामिणी जी सीता तिला ही प्राप्त झालें.

## कथा ४४ वी.

## ( सीतावियोग-दुःख, जटायु-उद्धार. )

इकडे मारीचरूपी हरणास मारून राम अमळ विश्रांतीस्तव एका अश्वत्थ वृक्षाखालीं बसले. वेळ आली म्हणजे शहाण्या सुरत्यास देखील भूल पडते. मारीचानें जी हाक मारली ती रामानें ऐकली. परंतु ह्या पासून कांहीं अनर्थ होईल असें येव्हड्या शहाण्या रामास ही कळलें नाहीं.

तेव्हां होणारी गोष्ट टळत नाहीं असें एक खरें, किंवा केवळ आपल्या भक्ताची वाणी सत्य करावयाची हें जें समर्थांचें ब्रीद तें राखण्यासाठीं, म्हणजे प्रिय भक्त जो वाल्मीक त्याचें भविष्य सत्य करण्यासाठींच सर्व कळत असतां ही रामानें मुद्दाम असें केलें. असेंच म्हणावें हेंच उत्तम. म्हणजे समर्थांची समर्थता कायम राहते. असो राम अश्वत्थ छायेंत बसले आहेत तोंच ज्याचें तोंड अगदीं काळें पडून गेलें आहे, डोळ्यांवाटे घळघळा अश्रुधारा चालल्या आहेत, शोकाचे उमाळ्यांवर उमाळे येत असल्यानें व कंठ दाटून आल्यानें जो स्फुंदत आहे, शोकवेगानें ज्यास पाऊलही उचलवत नाहीं, असा लक्ष्मण आपलेकडे येत आहे असें पाहून राम अगदींच घाबरून पुढें येऊन म्हणाला रे लक्ष्मणा हें काय केलेंस? सीतेला एकटें टाकून आलास कसा? लक्ष्मणानें स्फुंदत स्फुंदत त्याला कच्चें वर्तमान सांगितलें. तें ऐकून राम म्हणाले प्रालब्धांत असेल तें चुकत नाहीं. असो. लक्ष्मणा सीतेची आतां आपली गांठ पडत नाहीं. असें म्हणून मोठ्या त्वरेनें ते परत येऊन पाहतात तों आश्रम शून्य! मग काय मोठ्यांचें सर्वच मोठें. रामानें त्यावेळीं जो शोक केला तो ऐकून जवळचीं झाडें, दगडही कडकडा उकलले! असो, मग आनंदप्रसंगीं ज्या वस्तु प्रिय, त्या शोकप्रसंगीं

अत्यंत कष्ट कारक होतात. असें असल्यामुळें तो आश्रम रामाला कोठला आतां गोड वाटणार? सीतेच्या योगानें जो विलास मंदीर वाटत होता, तोच आतां चौहीं कडून पेट-लेल्या स्मशानाप्रमाणें वाटूं लागला, त्यामुळें राम लाग-लेच तेथून हालले. अमळ पुढें येतात तों रावणाची फारच विस्तीर्ण उठलेलीं पावलें त्यांचे दृष्टी पडून बहुधा कोणीं राक्षसानें सीतेला नेलें असें जाणून ते दोघे वीर शोकानें गत्य होऊन वेड्यासारखे इकडे तिकडे हिंडूं लागले. अमळ दूर जातात तोंच पंख उपटल्यामुळें लोला होऊन पडलेला व ज्याचे अंगांतून रक्ताचे पाट चालले आहेत असा जटायु केवळ रमादर्शन घेऊन त्यास ही वार्ता सांगून मरावें म्हणून कंठीं प्राण धरून मोठ्या कष्टानें रामराम ध्वनि करीत पड-लेला त्याचे दृष्टी पडला. तेव्हां हा कोणी दुष्ट राक्षसच असून ह्यानेंच सीता खाल्ली अशा कपटानें त्याला ठार कर-ण्यासाठीं राम आतां बाण सोडणार तोंच त्याचा 'राम' ध्वनि ह्यांचे कानास येऊन हे पाहतात तों हा जटायु. त्या-ची असी अवस्था पाहून रामाच्या शोकाला फारच भरतें आलें. जटायूनें त्यांस कच्ची हकीगत सांगितली. रावणाचा मोडका रथ व तें वर्तमान ऐकतांच रावणाच्या दुष्टपणा बद्दल द्वेष, जटायूच्या अवस्थे बद्दल शोक, पराक्रमा बद्दल

आनंद व सीतेच्या विरहा बद्दल खेद इतके विकार रामास एकदमच उद्भवले. तों जटायुनेही आपलें विरहदुःख रामाला दिलें. रामाचे मांडीवर त्याचे संनिध मरणाचा लाभ तो नरी कां सोडील? राम त्याला उठविण्यासही तयार होता, पण त्यानें हा लाभ दवडला नाहीं. असो. रामानें पितृवत त्याची क्रिया केली. पांखरूं असून केव्हढें त्याचें भाग्य!!

---

## कथा ४५ वी.

## ( पार्वतीविरस. )

राम, सीताविरहानें उदास होऊन झाड, दगड इत्यादि जें दृष्टी पडेल त्यासच सीता समजून अरण्यांत भडकूं लागले. इतक्या अवकाशांत शंकरपार्वती आकाशांतून चालली असतां रामाची ही स्थिति पाहून पार्वती ह्मणाली शंकरा ज्याला तुह्मी श्रेष्ट मानून ज्याचें वारंवार नाम घेतां तो नर हा असा साधारण लोकांप्रमाणें बायको बायको करीत हिंडत आहे. मी त्याला सहज ठकवीन! शंकर ह्मणाले पार्वती राम असा वेडा नाहीं बरें, तो दगड, झाडरूपी ऋषींचा उद्धार करीत आहे. तूं त्याला 'ठकवीन' म्हणतेस तर ठकीव पाहूं बरें. तें ऐकून पार्वती सीतेचें रूप घेऊन तेथें येऊन म्हणाली, ही मी आलें आतां खेद पुरे करा. राम

समर्थच, तो म्हणाला अंबे तुला माझा नमस्कार असो. तें ऐकून पार्वती विरस पाऊन मुकाट्यांच परत गेली.

---

## कथा ४६ वी.

## ( रामाचें पाणी. )

राम पुढें चालले असतां कृष्णावेणी नदी त्यांना लागली. तींत पाय ठेवतांच जलमय होऊन तींत मिसळला गेला. तेव्हां खास ह्या नदीनें रामाला गिळलें असें जाणून नदी आटवून नाहींशी करण्यासाठीं लक्ष्मणानें प्रळयाग्नीतुल्य बाण धनुष्यावर ठेवला. आतां खास अनर्थ होतो असें जाणून तत्काळ राम त्याचे पुढें प्रगट झाले.

---

## कथा ४७ वी.

## ( कबंध-उद्धार व शबरी-उद्धारें. )

जातां जातां कबंध राक्षस हात पसरून बसला होता, त्याचे कवेंत हे दोघे सांपडले. तें पाहून रामानें तत्काळ त्याचे हात तोडून त्यास मोक्ष दिलें. नंतर एक शबरस्त्री रघुपतीची भक्ति करून असे. तिचे आश्रमा जवळ प्रभु जातांच तिनें फळें देऊन रामाची बहुत शुश्रूषा केली. म्हणून संतोष पाऊन रामानें तिचा उद्धार केला.

## कथा ४८ वी.

### ( हंसत करावें तें रडत भोगावें. )

पुढें श्रीराम हंपी विरूपाक्षावरून पंपा सरोवरीं गेले. तेथें एका स्फटिक शिळेवर ते लक्ष्मणाचे मांडीवर डोकें ठेऊन निजले असतां पशु पक्षादिकांच्या अनन्वित क्रीडा पाहून त्यांचा विरहज्वर भडकत चालला म्हणून संतापानें त्यांनीं भडाभड शाप देण्यास आरंभ केला. कोकिलांचे सुस्वर ऐकतांच त्यांचा स्वर खुंटविला. पुढें त्या रामास शरण आल्यामुळें वसंतकाळीं मात्र तो खुला होईल म्हणून म्हटलें. मृगांस शाप दिला कीं, रात्रीं तुमचा एकांत चालू असतां पारधी तुम्हांस ठार करील. हत्तीस शाप दिला कीं, पाण्यावांचून तुम्हीं एकांत केला तर सात दिवस हत्ती मूर्छित पडेल. मोरास नपूंसक करून डोळ्याच्या आसवांनीं संतती होईल म्हणून सांगितलें. चक्रवाकांचा रात्रीं वियोग होईल असा त्यांना शाप दिला व कावळ्यास जन्मांत एकदांच संग म्हणून शाप दिला. ह्याचा हेतु इतकाच कीं, प्रभु वियोगदुःख भोगीत असतां त्यांचे देखत हे रतिचेष्टा करून त्यांचें दुःख दुणावीत होते.

## कथा ४९ वी.

### ( वानरसख्य, )

पंपा सरोवराजवळ ऋष्यमूक नांवाचा पर्वत आहे. तेथें त्या वेळीं नळ, नीळ, जांबुवंत, मारुती, सुग्रीव असे पांचजण वाली जो वानरांचा राजा त्याचे भयानें राहिले होते. सुग्रीव हा वालीचा भाऊ होता. त्या दोघा भावांत मोठें मत्सर माजलें होतें. त्याचें लक्ष रामलक्ष्मणांवर येतांच त्याला वाटलें कीं, बहुधा मला मारण्यासाठींच वालीनें ह्यांस इकडे पाठविलें. म्हणून तो अगदीं भयभीत होऊन पळालाच. परंतु मारुतीनें त्यास धैर्य देऊन शांत करून हा काय प्रकार आहे तें पाहण्यासाठीं तो पंपासरोवराकडे आला. मारुती हा ह्यांच्याच अंशांतला असल्यामुळें हा भगवान् रामप्रभु अशी त्याची खात्री होऊन त्यानें सुग्रीवाचें रामाशीं सख्य करण्याचा विचार काढून प्रथम रामाची समग्र हकीगत उमजून घेऊन अनायासें एकमेकांच्या सहायानें एकमेकांचें कार्य होईल म्हणून त्यास मोठा आनंद होऊन तो म्हणाला स्वामी संपूर्ण वानरजातीचा राजा वाली वानर आहे. तो ह्या किष्किंधा नगरींत राहतो. सुग्रीव हा त्याचा धाकटा भाऊ आहे. एकदा दुंदुभी नांवाचा एक प्रचंड दैत्य वालीशीं झगडा करण्यासाठीं

आला. वाली महा वीर! लागलींच उभयतांची झुंज लागली. तेव्हां दैत्य घाबरून पटकन पळून एका गुहेंत गेला. वालीनें गुहेचें तोंडीं सुग्रीवास ठेऊन तोही आंत घुसून पुढें कितीएक महिन्यांनीं एकाएकीं आंतून रक्ताचा पूर बाहेर आला. तेव्हां वाली मेला असें जाणून सुग्रीवानें प्रधानाच्या अनुमतानें राज्य चालविलें. तों इतक्यांत वाली परत आला. इकडची अशी व्यवस्था पाहतांच तो फारच खवळला. त्यानें सुग्रीवास तत्काळ मारलेंच असतें, परंतु इतक्यांत तो पळून ह्या पर्वतावर एक ऋषि होता त्याची वालीनें कांहीं खोडाळी केली तेव्हां तूं जर ह्या पर्वतावर येशील तर ठार होशील असा त्यानें वालीस शाप दिला. असो. मग वालीनें सुग्रीवाची बायकोही पटकावली. कधीं मधीं उभयतांचें भयंकर युद्धही होतें. इत्यादि ऐकून 'मी वालीचा वध करून त्याची बायको त्यास द्यावी व त्यानेंही आमचें सहाय्य करावें' असें रामचंद्रानें ह्मणतांच मारुतीनें तें पथकरून उभयतांचें सख्य केलें. मग रामानें बोलल्या प्रमाणें वालीस ठार करून राज्य, वालीची बायको व सुग्रीवाची बायकोही सुग्रीवास देऊन पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें चार महिन्यांनंतर आपलें कार्य करण्या विषयीं सांगितलें.

## कथा ५० वी.
## ( सीताशोध )

मग चारमहिने राम सुग्रीवांची भेटच नाहीं. दोन बायका आणि राज्य ह्यांतच सुग्रीव दंग, आतां त्याला राम कशाचा आठवतो. लक्ष्मण कधीं मधीं किष्किंधेंत जात असे. मारुतीच्या, दिवसांतून दहा फेऱ्या होत असत. येवढ्या वेळांत त्या दोघांची जीवस्य कंठस्य मैत्री झाली पावसाळ्याचे चार महिने संपले, तरी सुग्रीव आपले धुंदींतच, हें पाहून प्रभूनें लक्ष्मणाकडून त्याची मस्ती जिरविली. लागलाच तो आपलें वानरदळ घेऊन तेथें आला. जांबुवंत हा आस्वलांचा राजा. त्यानें ही आपली अस्वलें, गोलांगुलें जमविलीं. द्वीपद्वीपांतरचे वानर व रीसें एकत्र झालीं. सुमारें अटरा पद्में वानरें, बहात्तर कोटी रीस व छप्पन कोटी गोलांगुलें येव्हढी मंडळी एकत्र झाली. नंतर लागलाच सीतेचा शोध करावयाचें ठरवून ' एकमहिन्याचे आंत जो परत येणार नाहीं त्यास ठार करीन अशी ताकीद देऊन सुग्रीवानें दशदिशांला शेकडो रीस, वानरें पिटाळलीं. दक्षिणदिशेकडे राक्षसांची वस्ती असून तिकडे शोध लागण्याचा विशेष संभव दिसल्या वरून नळ, नीळ, अंगद ( वालीचा पुत्र ) जांबुवंत अशी पांच प्रमुख मंडळी गेली. मारुतीनें

जातांना सीतेविषयींची माहिती व खुणेसाठीं रामनामांकीत आंगटी बरोबर घेतली होती. हे पांच वानर आकश मार्गानें वायु सारखेच धांवत चालले. तो मध्येंच एके टिकाणीं त्यास मोठे धक्के बसून ते धाडकन कोसळले. त्यांच्या नाड्याच आकर्षण झाल्या. तो प्रकार असा होता कीं, तेथील प्रदेशांत दंडक नांवाचा एक ऋषि राहत होता. त्यावरूनच त्या वनाला दंडक वन असें नांव पडलें आहे. त्यांचा एक आठ वर्षांचा मुलगा होता. तो एका वनदेवीनें खाऊन टाकला. त्यावरून त्या ऋषींनें त्या वनाला असा शाप दिला कीं, जो कोणी येथें येईल तो ठार होईल. वानर मरणार पण रामनामस्मरणीं ते मग्न असल्यामुळें वांचले. असो. तो दंडकाचा मुलगाही ब्रह्मराक्षस होऊन तेथें हिंडत होता. त्यास अंगदानें ठार केलें. नंतर ते तेथून पुढें चालले. तों एक जळून खाक झालेला मैदानप्रदेश त्यांना लागला. तेथें झाड ना झुडुप, अन्न पाण्यावांचून ते अगदीं कासावीस होऊन गेले. तेथून पुढें जाण्यालाही त्यांना मार्ग मिळेना. इतक्यांत एका पर्वताच्या गुहेतून भराभर पांखरें बाहेर येत आहेत असें पाहून ते त्यांत घुसले. तेथें काय? अंधार काहूर! श्वासोश्वासही त्यांचे कोंडले. मारुतीचे अंगांत मात्र थोडा तवका होता. तो बाकीच्या चौघा-

ना ही शेपटीस बांधून चालला. ते त्या विवरांतून बाहेर पडतांच उत्तम फलांनीं भरलेलें असें त्यांना एक वन आढळलें, पाणी ही तेथें उत्तम होतें. तेणेंकरून त्यास मोठा आनंद झाला. तेथें सुप्रभा नांवाची एक स्त्री त्या वनाला राखण होती. तिनें त्यांना यथेच्छ फळें दिलीं. नंतर वानरांनीं विचारल्या वरून तिनें त्या वनाचा असा इतिहास सांगितला कीं, येथें मय नांवाचा दैत्य रहात असे. त्यानें बहुत तपश्चर्या केल्या वरून ब्रह्मदेवानें त्याला हें स्थळ बनवून दिलें. तो एका विवरांत तपश्चर्या करीत असे. तो जोंपर्यंत तेथें असे तोंपर्यंत त्याचा मृत्यु व्हायचा नाहीं, असा त्याला वर होता. पुढें इंद्रास त्याची मोठी भीति वाटून त्यानें हेमा नांवाच्या एका स्त्रीस, ह्यास भुलवून विवराबाहेर आणण्यास सांगितलें. तिनें त्या प्रमाणें करतांच इंद्रानें त्यास ठार केलें. नंतर ती हेमा कांहीं काळ पावेतों येथें राहून स्वर्गीं गेली. मी तिची दासी, माझें नांव सुप्रभा. 'सीताशोधास कांहीं वानर येथून जातील त्यांची शुश्रूषा कर, नंतर स्वर्गीं ये' असें तिनें मला सांगून येथें ठेवलें. इतकें सांगून वानरांस मार्ग सांपडेना म्हणून त्यांना डोळे झांकावयास सांगून तिनें चटकन त्या सर्वांनाच दक्षण समुद्रतीरीं नेऊन ठेविलें; व मग त्यांची रजा

घेऊन ती किष्किंधेस ही खबर देऊन रामाचे आज्ञेनें बद्रि-काश्रमीं जाऊन राहिली. नंतर इकडे समुद्रतीरापर्यंतही शोध करून सीतेचा शोध लागत नाहीं असें पाहून विन्मु-खतेनें रामास तोंड दाखवावयाचें नाहीं, असा विचार करून वानरांनीं तत्काळ अग्नि प्रदीप्त केला. प्रथम त्यांत मा-रुतीनें उडी टाकली. तोंच तो अग्नि विझून गेला. अशा रीतीनें दोन तीन वेळ अग्नि विझाला. शेवटीं मारुती एकीकडे चिंताक्रांत होऊन रामध्यान करीत बसला. बा-कीचीं वानरें रामध्यान करीत एकेच ठिकाणीं पडलीं होतीं. तों इतक्यांत जटायूचा भाऊ संपाती त्यांना खाण्या-साठीं आला. होड पडून ते दोघे सूर्यमंडळा पर्यंत एकदां उडाले. त्या वेळीं जटायु उष्णतेचे योगानें घाबरला म्हणन संपातीनें त्याला आपले पंखाखालीं झांकून धरलें. तों त्या-चेच पंख जळाले. ते वानरमुखानें रामनाम श्रवण होतांच फुटतील असें त्याला त्याचे गुरूनें सांगितलें होतें. तें त्यावेळीं खरें झालें. तर्णेकरून त्यास मोठा आनंद होऊन एकमेकानें एकमेकाची हकीगत विचारून घेतली. त्यांत जटायूचे मरणानें संपातीस मनस्वी खेद झाला. असो मग या चारशें कोस समुद्राचे पलीकडे लंका नगरी आहे, तेथील राजा रावण, त्यानें सीतेस चोरून नेऊन तेथील अशोक

घनांत ठेवलें आहे. लागेल तर तुम्हांस तेथपर्यंत पोचवितों. अथवा कोणी उडी मारून जात असेल तर जा. असें त्यानें त्यांस सांगितलें. मारुतीनें तेंच पत्करलें. नंतर मारुतीराय श्रीराम स्मरण करून तेथून उडाले. त्या वेळीं त्यानें फारच प्रचंड रूप धारण केलें होतें. त्याच्या वेगानें कैक पर्वत, कैक झाडेंही वर उसळून गेलीं. समुद्राचें पाणी कैक पुरुष पर्यंत वर उसळत होतें. त्याच्या भूभूःकारानें शंकराची समाधीही भंगून गेली. त्यावेळीं वाऱ्याचा वेग त्याचे पुढें तुच्छ होता. त्याचें सामर्थ्य पहावें म्हणून देवानें रंभेला आडवें पाठविलें. ती भला मोठा जबडा पसरून आडवी आली, तींत मारुतीची उडी पडली. हा कांहीं घात जाणून पटकन बारीक होऊन कानवाटे स्वारी निघून गेली. पुढें त्याला विसावा घडावा म्हणून समुद्रानें मैनाक पर्वत वर केला. तो त्यानें पायाचे आगठ्यानें दडपून टाकिला. पुढें राहूकेतूंची आई सिंहिका ही आडवी आली; तिच्याही तोंडांत पडून कानावाटे बाहेर निघून स्वारी पडलंकेंत जाऊन धडाडली. तेथें क्रौंच्या नांवाची राक्षसी होती. मारुतीनें तिला पहातांच सुकुमार रूप धरलें. तिनें त्याला तोंडांत टाकलें. मारुती तत्काळ तिचें पोट फोडून बाहेर पडला. नंतर त्यानें सीते साठीं सारी लंका धुंडाळली, व फारच

अनीतीच्या गोष्टी केल्या. कितीएक स्त्रीपुरुषांस एकांतीं असतां रस्त्यावर फेंकलें, पाणीवाहणाऱ्या कितीएक बायकांच्या कानांत हळूच शेपटी घालून त्यांना डचकवून त्यांच्या घागरी फोडल्या. रावणाची तर खूपच विटंबना केली. नंतर अशोक वनांत सीता आहे असें समजल्यावरून तो तेथें गेला. त्यावेळीं सीता अत्यंत कष्टी होऊन जीव देण्यास सिद्ध झाली होती. मारुती जर एक घटकाभर तेथें गेला नसता तर बहुधा सीतेनें जीव दिला असता. तिचे भोवतीं ज्या राक्षसी होत्या त्या तिला फारच गांजीत असत. व ह्यावेळीं त्या तिचे अंगावर ओरडत होत्या. ह्या तापानें तिनें केव्हांच प्राण दिला असता, परंतु केवळ बिभीषणाची बायको सरमा व तिची कन्या त्रिजटा ह्या तिला पुष्कळ जपत ह्यामुळें ती टिकली. असो मग मारुतीनें तिला खूण देऊन कची हकीगत सांगितली. तेणेंकरून तिला बहुत समाधान झालें हें उघडच आहे. नंतर त्यानें त्या सगळ्या वनाचा उच्छेद केला. त्या निमित्तानें लढायीस आलेले जंबुमाळी, अक्ष, (रावणाचा एक मुलगा) अशाळी राक्षसी ह्यांचा नाश करून रावणाचें सहस्रावधी सैन्य ठार केलें. इंद्रजिताची देखील खूप खोडकी जिरवली, आणि शेवटीं चौथा भाग लंकेचा जाळून माघारा फिरला. त्या

वेळची लंकेच्या लोकांची अवस्था त्यांनाच विचारावी ?

मग लागलाच आपले मंडळीस भेटून किष्किंधेकडे येऊन पोचला. स्वमुखानें आपला पराक्रम सांगणें त्यास आवडत नसल्यामुळें त्यानें कच्या मजकुराचें ब्रह्मदेवाकडून पत्र लिहून घेतलें होतें. तें पत्र त्यानें रामापुढें ठेवलें. नोंदानें येव्हढेंच सांगितलें कीं, सगळ्या लंकेंत खरा असा विभीषण एक आढळला. व रावणास ठार करून त्याला राज्य द्यावें असा माझा हेतु आहे. असो मग सर्व मजकूर कळतांच रामास परम आनंद होऊन त्यानें लागलींच लंकेवर स्वारी करण्याची तयारी केली. ती प्रचंड सेना ह्याच आज्ञेची वाट पाहत होती. आज्ञा होतांच, जय रघुवीर असा एकच गजर करून तेथून जी ती मंडळी निघाली ती तहत समुद्रतीरीं येऊन पोचली. त्यांचा तो आवीर्भावाचा प्रचंड गलबला तहत लंकेंत रावणाचे कानीं जाऊन त्याचे काळजांत जो धसका बसला तो पुन्हा सावरलाच नाहीं.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

## कथा ५१ वी.

## (रामबिभीषणभेट.)

शुक आणि सारण हे मोठे मायावी राक्षस रावणाकडे

होते. ते रावणाचे सांगीवरून किष्किंधेपासून रामाचे मार्गे लागले असत. त्यांनीं रावण कचेरींत इकडलें समग्र वर्तमान दिलें, राम समुद्रा नजीक आल्याचेंही वर्तमान त्याचवेळीं कचेरींत पोचलें. त्यामुळें बिभीषणानें रावणाला बहुत बोध केला. कैकसी रावणाची आई, तिनेंही बहुत बोध केला, तो चटसारा एकीकडे झुगारून बिभीषणास फारच वाईट बोलून त्यानें त्याचे अंगावर लाथ झाडली; त्यामुळें त्यास मनस्वी वाईट वाटून तो आपल्या चौघा प्रधानांनिशीं तेथून निघून रामास शरण आला. रामानें तत्काळ 'रावणा नंतर हाच लंकेचा राजा असें ह्मटलें. नंतर लागलाच समुद्रावर सेतु बांधून ह्या घोर लष्कराचा लंकेच्या रानांत तळ जाऊन पडला. नंतर बिभीषणाच्या विचारें अंगदास वकील करून 'शिष्टाई करण्यासाठीं रावणाकडे रवाणा केलें. अंगदानें अनेक प्रकारें रावणास बोध केला. पण तो महा खळ, त्यानें अंगदासच ठार मारण्याचा हुकुम सोडला. पण तो रामदूत, सामर्थ्यावांचून एकटाच येथें येण्यास कसा धजेल? तो अंगावर आलेल्यांस ठार करून रामचरणीं येऊन पोचला.

## कथा ५२ वी.

### (युद्धप्रकरण. प्रथमदिनयुद्ध.)

आतां युद्धावांचून दुसरा मार्ग नाहीं, असें पाहतांच रामानें सैन्यास आज्ञा दिली, मग ही वानर मंडळीच, एकदम जाऊन लंकेच्या कोटाला झोंबली. तें पाहून रावणाकडील धूम्राक्ष राक्षस प्रचंड सैन्य घेऊन धांवला, तो पुन्हा परत गेला नाहीं. त्याची बातमी ऐकतांच इंद्रजितानें येऊन फारच प्रळय करून रामलक्ष्मणांस मूर्च्छींत पाडिलें. सैन्याचीही खूपच दुर्दशा उडवली. असा इंद्रजिताचा पराक्रम पाहून रावणानें त्याची खूप पाट थापटली. लागलेंच त्रिजटेकडून सीतेला विमानांत बसवून रणमंडळही दाखवलें. रामलक्ष्मणांची ती अवस्था पाहून सीता प्राणच सोडायची, पण त्रिजटेनें तिला धैर्य दिलें. असो समर्थानें जें असें करून घेतलें तें केवळ शत्रूला प्रथमच खट्टू न करावें ह्या साठींच.

---

## कथा ५३ वी.

### (द्वितियदिनयुद्ध.)

रावणास वाटलें होतें कीं, झालें संपलें युद्ध, वानरें मा-

णसें बहुतकरून राक्षसांनीं खाऊनही टाकलीं असतील. पण दुसरे सकाळीं पाहतो तों अधले दिवसाप्रमाणेंच वानरें कोटाला झोंबलीं. तेव्हां प्रहस्त नामा प्रधान सैन्यानिशीं धांवून आला. तो नळानेंच गट्ट केला. चाललेच असे एकेक वीर, तें ऐकून स्वतः रावणच धांवत आला. मंदोदरीनें त्यास पुष्कळ मोडा घातला, पण तो कसूचा ऐकतो. पण शेवटीं झालें काय! त्यानें येऊन पराक्रम खूपच केला. ब्रह्मशक्ति सोडून लक्ष्मणाला तर त्यानें मूर्च्छितच पाडलें. पाडलें इतकेंच नाहीं तर त्या नीचानें लक्ष्मण पडला असतां रथातून उतरुन त्याला लाथ मारली. हें मारुती रायाचे दृष्टीस पडतांच त्यानें रावणास अशी एक लाथ दिली कीं, पांच सात कोलांट्या खाऊन तो आपटला. इतक्यांत प्रभूसही संताप येऊन त्यांनीं रावणास इतकें जर्जर करून सोडलें कीं, त्याचे बाण, भाता, धनुष्यही तो विसरला. अगदीं प्रसंगांतच तो येऊन पोंचला. काळ समोर उभा होताच पण वेळ नव्हता म्हणून 'जा बाबा आतां तुला मरण आलेंच आहे, दोन दिवस खा, पी, मौज मार' असें म्हणून त्याला सोडून दिलें. उपाय नसल्यामुळें दहा मुखींत दहा नाकें धरून तो माघारा गेला.

# कथा ५४ वी.

## ( तृतियदिनयुद्ध, कुंभकर्णवध. )

झाल्या प्रकाराबद्दल रावणाला फारच खेद झाला. तेव्हां प्रधानादिक मंडळीनें त्याला सांगितलें 'अहो खेद कशाला करतां, पारध्याचे हातून सावज पळालें म्हणून झालें काय! हीं वानरें, मानसें आपलीं सावजें होत. तीं अंमळ चपळ आहेत इतकेंच कायतें. तर आतां कुंभकर्णाला जागें करून त्यांच्या कळपांत सोडून द्या म्हणजे दोनचार घटकांत तो ह्यांना पोटांत फेकून मोकळा. ती गोष्ट रावणाला ठीक वाटून त्यानें तत्काळ हुकुम सोडला. त्या लेंकराची झोंप मोडायची म्हणजे जणू जसे पर्वतालाच बोलकें करायचें. झोंपेतून उटतांच केवळ बाळाचें तोंड धुणें म्हणून चार हजार दारूच्या पखाला हत्तींवर घालून चालविल्या, पर्वतप्राय अन्न तेथें नेऊन ठेवलें, सहस्रावधी जनावरें, आणि मोठ मोठाल्या भयंकर नौबदांचा एक सारखा दणदणाट चालविला. लेंकरूंच तसें तें कवळें! समुद्राची खोली सवालक्ष कोसांची आहे, पण मुलगें आंत उतरलें कीं, बेंबीपर्यंत पाणी लागण्याची मारामार! येव्हढ्या जरी नौबदा वाजत होत्या, तरी लेंकराच्या घोरण्यानें नौबदांचा आवाज

वाजविणारांच्याही कानीं येत नव्हता ? अर्थात तो दंग्यानें केव्हांचा जागा होणार? शेवटीं सहस्रावधी राक्षसांनीं 'हे कुंभकर्णा' म्हणून एकच गजर केला. त्या गजरानें विहिरी तळीं ह्यांचें पाणी मात्र बाहेर उसळून गेलें. महातांनीं कैक हत्ती त्याचे अंगावरून धांववले. कोणी गगनचुंबित झाडें घेऊन त्याच्या नाकांत कोंबूं लागले. दहावीसजणे मिळून नाकपुड्याच आवळून धरूं लागले. कोणी झाड, दगड हातीं लागेल तें घेऊन वर्मी वर्मांत मारूं लागले. कोणी कडू, तिखट भुकटे खंडो गणती नाकांत ओतूं लागले! तरी त्या बालकाची झोंप मोडेना. शेवटीं विरूपाक्ष नांवाच्या किन्नरी कानांत गायाला बसविल्या. तेव्हां स्वारी एकदांची जागी होऊन जांभळी देऊन बसली. मग पशु, अन्न, मद्य ह्यांवर बाळभूक संपवून जवळ प्रधान उभा होता, त्याला जागें करण्याचें कारण विचारलें. त्यानें 'सीतेस चोरून आणल्या बद्दल असा प्रसंग माजला. वगैरे कळविलें' इत्यादि प्रकार ऐकतांच स्वारी खाडकन उभी राहिली. त्या वेळीं देव विमानांत बसून युद्धचमत्कार पहात होते. त्यांना वाटलें लेकरूं सहज जिभली चाटील तर आपलेसह आपलें विमान पोटांत घेईल, ह्या भयानें फडाफड त्यांनीं विमानें पळविलीं. लंकेचा एवढा मोठा कोट पण त्याला घो-

ग्या इतका होतहोता. वानर तर त्याचें शरीर पाहतांच मूर्छित होऊन गेले. किती एकांची दांतखिळी बसली, किती एकाच्या अंगांत थंडीची हुडहुडी भरली, राम देखील त्याला पाहून थक्क झाले. बिभीषण म्हणाला प्रभो रामा ह्याचे जन्मकाळीं केव्हढा प्रळय वर्षला! आईचे उदरांतून मुलगा जमीनीवर आदळतांच तीस हजार बायका ह्यानें खाऊन टाकल्या. इतक्यांत इंद्र ऐरावतावर बसून जात होता, तों हत्तीसह त्याला उचलून आपटून दिलें. इंद्रानें त्याचे अंगावर वज्र टाकलें, पण त्याचा एक केसही तुटला नाहीं. उलट ह्यानेंच त्या हत्तीचे दांत उपटून त्या दातांनीं इंद्राला खूप झोडलें. हा झोंपेनें गेला, नाहींतर माणसें पांखरें, जनावरें, कोठचीं दिसलीं असतीं? असो नुसत्या इंद्रजिताच्या दर्शनानें वानर मंडळीची येव्हढी दाणादाण झाली असें पाहून मारुतीनें खूप धैर्य करून लंकेंत शिरून कुंभकर्णास उचलून गरगरा फिरवून झाडामाडांवर झोंकलें, परंतु दारूच्या अमलांत ही गोष्ट कुंभकर्णाच्या गांवींही नव्हती! मग आहे, आपलेकडेही जबाबास जबाब देणारा आहे, असें पाहून वानरें बेटीं हुशार झालीं. मग रावणाची आज्ञा घेऊन कुंभकर्ण युद्धास आला. त्याचें कशाचें तें युद्ध! जसासो वानरांना संघात मृत्युच. सहज जसे हुर्डा, लिंबु-

राचे घास तोंडांत झोंकायचे तसा तो शेंशेपनपन्नास वानरें एकंदर गोळाकरून तशाचे तसेच घशाखालीं लोटी, वानरें तरी काय? विक्षिप्तपच तीं, कोणी नाकपुड्यांतून, कोणी कानांतून भडाभड उड्या टाकून निघून जात. बहुधा दांतांखालीं चिरडलीं जात अशीं फार, बाण अंगावर येतील तेव्हढे आपल्या तोंडांत घेई, पर्वत, झाडें अंगावर आलीं तर तीं फुटून मोडून जात, त्याला वाटे जसे पानफूल अंगावर पडलें. अशी त्याची स्थिति पाहून वानर कोणी पुढें तोंड करीतना. रानोमाळ पळत सुटले. हें पाहून सुग्रीवानें धैर्य करून त्याचे अंगावर उडी घातली. आणि संधान पाहून चटकन त्याचे दोन्ही हातांत दोन कान व तोंडांत नाक धरून चटकन तोडून पळाला. त्या वेळीं, मात्र तो शूर्पणखेला चांगलाच भाऊ शोभला. असो पण तें गड्याच्या खात्रेंतही नाहीं. दोन्ही सैन्यांत हंशा मात्र रगड माजला. रावणाला हें वर्तमान समजतांच त्याला परम खेद झाला. मग एका मोठ्या काठीला भला सपाटा आरसा बांधून एका उंचशा इमारतीवर उभे राहून त्याला तो आरसा दाखवायला एका न्हाव्याला सांगितलें. मग आरशांत तें आपलें विद्रूप झालेलें तोंड पाहतांच तो फारच चौताळला. असें पाहून रामानें त्याचे दोन्ही दात छेदून टाकले, तरी तो पा-

यांनींच वानरें मारीत सुटला. शेवटीं पायही तोडले. तरी लाटेसारखा गडगडा लोळूनच वानरांस जमीनदोस्त करूं लागला. श्वासोश्वासाच्या योगानेंही कैकांस ओढून घेऊं लागला. शेवटीं रामानें एकदाचें त्याचें शीर तोडलें. तरी नुसतें धडच वानरांच्या अंगावरून जाऊं लागलें. पण मग वानरांनीं मोठमोठ्या धोंडी त्याच्या त्या धडावर मारून कांडल्याप्रमाणें त्याचा लगदा करून टाकला. असो ही एक भारीच असामी खपली. रावणास याबद्दल स्वमनीं शोक झाला.

---

## कथा ५५ वी.

### ( चतुर्थदिनयुद्ध, अतिकायवध. )

मूर्खते मूर्खच! त्यांचे डोळे उघडायचेच नाहींत. येव्हढा कुंभकर्ण पुरुष. तरी तो रामानें ठार केलाच. असें असतांही रावणाचे डोळे उघडले नाहींत. भावासाठीं रडला-मात्र पोटभर. असो. नंतर दोन चार वीर लढायीला गेले, त्यांचा नाश होताच अतिकाय हा एक रावणाचा पुत्र होता. शरीरानें तें एक कुंभकर्णाचें पिलूं व पराक्रमानें इंद्रजिताच्या बरोबरचाच होता, तो युद्धाला आला तेव्हां काय? समारंगणांत यावयाची खोटी, तों त्याची चटणी झा-

लीच. आपला मुलगा अतिकाय, त्याचाही निकाल उडला हें ऐकून तर रावण फारच रडला. कां कीं, कुंभकर्ण हा झोंपेनें आणि मद्यानें धुंद झाला होता, सबब त्याचा अंत झाला. ह्या कारणावर ती गोष्ट संपली. पण अतिकायाची स्थिति तशी नव्हती. तेव्हां अति शोक होणें हें इष्ट होय. असो मग इंद्रजिताला भारी क्रोध येऊन त्यानें रक्तानें अंघोळ केली. तांबडीं वस्त्रें नेसला. नंतर बिब्याच्या समिधा व मोहऱ्या ह्यांनीं रणभूमीवर हवन केलें. त्या योगानें त्यास अग्निकुंडांतून रथ, घोडे, सारथी, शस्त्रें, बाण इत्यादि प्राप्त होऊन तो त्या रथावर बसून तत्काळ मेघमंडळा आड जाऊन एकसारखा बाणाचा पाऊस पाडूं लागला. तेणेंकरून सगळें रामसैन्य जर्जर होऊन गेलें. रामपक्षा कडील कोणाचाच उपाय चालेना. जशी राम सैन्यांत ही पटकीच शिरली. अस्तमान पावेतों युद्ध करून एक बिभीषण व हनुमंत खेरीज करून रामलक्ष्मणां सुद्धा झाडून सगळें सैन्य निचेष्ट करून टाकिलें. हाल चाल देखील बंद झाली. रामलक्ष्मणांची हीच अवस्था, असा रामसैन्यावर त्या दिवशीं मोठा अनर्थ गुदरला. इंद्रजिताचा असा पराक्रम ऐकून रावणास परम समाधान झालें.

## कथा ५६ वी.

## ( पंचमदिनयुद्ध. )

मग रात्रीचे वेळीं बिभीषण व मारुती ह्यांनीं चुड्या पेटवून आपलें सर्व सैन्य पाहिलें. ते जांबुवंता जवळ येतांच जरी तो हैराण होऊन पडला होता तरी त्यानें राम लक्ष्मणांचीच विचार पुस केली. ती कळतांच त्याला टचाचून रडें कोसळलें. नंतर द्रोण नांवाच्या पर्वतावर अमृतवल्ली आहे तीवरील नुसता वारा जरी लागला तरी सैन्य उठेल असें त्यानें म्हणतांच जरी तो पर्वत चार कोटी योजनें दूर होता तरी मारुतीनें कमर बांधली. लागलाच जो उडाला तो त्या पर्वतावरच उतरला. प्रथम त्यानें इकडली थोडक्यांत हकीगत सांगून पर्वता जवळ तो अमृतवल्ली मागूं लागला, पर्वत पाषाणहृदयच, तो म्हणाला चलरे माकडा, वानराला, माकडाला कोठें अमृतवल्ली मिळते काय? कसूचा राम आणि लक्ष्मण. चल. हें एकतांच मारुती रायाला खूप संताप येऊन त्यानें शेपटानें तो सारा पर्वतच उचलून समरांगणीं आणून ठेवला. त्यावरील वारा लागतांच एकंदर सारें सैन्य पटकन उठलें, अंगावर कोणाच्या घाय देखील राहिला नाहीं. नंतर मारुती तो पर्वत जेथल्या तेथें ठेऊन येतो तों उजाडलें.

आणि मग लागलेंच सारें सैन्य लंकेवर धांवलें. तेव्हां सैन्य मारलें असतां पुन्हा उठलें ह्या बद्दल रावणास आश्चर्य वाटून पुन्हा घोर युद्ध जुंपलें. रावणाचे दहा वीस वीर मरतांच यज्ञ कुंडांतून एक कृत्या उत्पन्न करवून तिचेसह आकाशांत उडून इंद्रजितानें त्याही वेळीं कहर युद्ध केलें. त्याचें कपट मारुतीनें रामास कळवितांच त्यानें अंगिरा शक्ति टाकून ती कृत्या जेथच्या तेथेंच जाळून टाकली. तरी इंद्रजितानें रात्र होईपर्यंत खूपच निकरानें युद्ध केलें.

---

## कथा ५७ वी.

## ( षष्टदिनयुद्ध, इंद्रजित वध: )

इंद्रजित दोन तीन वेळ युद्धास येऊन यश घेऊनच गेला. परंतु व्हावें तसें रावणाचें समाधान होईना. कां कीं, रामलक्ष्मण असून वानरांपैकींही एखादा मोठा वीर मारला गेला नाहीं. व रावण इंद्राजिताशीं असें बोललाही. तेव्हा इंद्रजितानें पणच केला कीं, आज एक मारीन कीं मरेन, येरव्ही तोंड दाखवायला यायचा नाहीं, हीच भेट. असें म्हणून मोठ्या तळतळीनेंच युद्धास निघाला. त्यानें ह्या प्रसंगीं हुबेहुब सीते सारखी मायावी सीता बन-वून रथांत घालून आणि मग हनुमंत वगैरे वानरांस हाक

मारून म्हणाला. रे ही पहा तुमची सीता, हिचे योगानें आमचा नाश झाला, तर आतां हे युद्धाचें कारणच नाहींसें करतों ' तुला नको न मला नको ' असें बोलून त्यानें तट्र-कन् तिची मान मुरगाळून दोन्ही तुकडे वानरांच्या अंगावर झोंकून दिले. आणि मग निकुंबळ नांवाच्या वनांत जाऊन हवन करीत बसला. मनांत हेतु हा कीं, अक्षय्य रथ अग्निकुंडांतून प्राप्त व्हावा.

इकडे, त्यानें केलें हें खरें असें वानरांस वाटून जिचे साठीं येवढा खटाटोप केला ती गेली, ह्या बद्दल फारच त्यांना वाईट वाटलें. ज्या मारुतीनें सीतेचा शोध सांगून सीताशोकहरण हें नांव मिळविलें, त्यालाच आतां हें वर्तमान रामास सांगणें भाग झालें. तें ऐकतांच रामानें शोक करून फारच अ-नर्थ मांडला. झाला हा प्रकार बिभीषणास मात्र खरा वाटेना. त्यानें तत्काळ गुप्त हेर लंकेंत पाठविले. तेव्हां सीता जिवंत असून इंद्रजित निकुंबळेंत भयंकर हवन करीत बसला आहे, रथही कुंडाबाहेर येत आहे असें वर्तमान हेरांनीं त्यांस कळविलें. तेणेंकरून सीतेबद्दलचा शोक दूर झालाच पण इंद्रजिताच्या कर्मा बद्दलचा सपाटून धाक उत्पन्न झाला. बिभीणही म्हणाला कीं, बारावर्षे जो आहार, निद्रा, मैथुन ह्या विरहित राहिला असेल त्याचे हातानेंच इंद्रजित मृत्यु

पावणारा आहे. येव्हढें ऐकून रामास थोडा आनंद झाला. का कीं, लक्ष्मणानें हें व्रत पाळलें होतें. विभीषणाचे शब्द ऐकतांच लक्ष्मणानें तत्काळ दंड थोपटले. लक्ष्मणाचे हातूनच इंद्रजित मरेल असें जरी खरें तरी लक्ष्मण म्हणजे केवळ पोर व इंद्राजित म्हणजे ज्यानें कैक-वेळ इंद्रास जिंकलेलें, तेव्हां लोखंडाच्या तापलेल्या कांत्यांवर हें केळीचें कोवळें पानच टाकायाचें असें रामाच्या मनांत येऊन त्याला ह्या प्रसंगीं कांहींच बोलवेना. शेवटीं मारुती व बिभीषण ह्यांचे स्वाधीन त्यानें लक्ष्मणास केलें. मग लागलेंच अगदीं निवडक निवडक वानर बरोबर घेऊन आकाशमार्गानें बिभीषण त्यांना निकुंबळेंत घेऊन गेला. तेथें केव्हढा अटोकाट बंदोबस्त! एकामागें एक असें कोटा सारखे सैन्याचे सात पहारे, त्यांचे आंत भली भयंकर गुहा असून तिचे तोंडाशीं भूतें राखण बसलीं होतीं; वानरांनीं मोठ मोठे धोंडे आणून सगळ्यांना जागचे जागींच ठार करून तहत त्या विवरांत मंडळी घुसली, तेथें पाहतात तों सारेंच भयंकर! त्यांतून इंद्रजित तर फारच भेसुर दिसे. रक्तानें स्नान केलें असल्यानें अंगावरून रक्त ओघळतच आहे, वस्त्रेंही लाल भडकच, माथ्यावर पिंगट जटा असून त्यांतूनही रक्त वाहत होतें. आसना-

ऐश्वर्जी सात मेतें पसरून त्यांवरच तो बसला होता. जवळ ब्राह्मणांचीं शिरें, दांतांच्या लाद्या, ताजें मांस ह्यांचे ढीग पडले होते. स्वारी डोळे झांकून एकेक पदार्थ उचलून कुंडांत टाकीत होती. असा तो विचित्र प्रकार पाहून ह्या पवित्र मंडळींचें मन फारच कंटाळलें. परंतु अग्नींतून रथ बाहेर आलेला पाहतांच त्यांनीं दगड, धोंडे कुंडांत फेकून इंद्रजिताचे अंगावर विष्टा, मूत्र करून फार विध्वंस करून सोडला. अग्नि विझाला, रथ तेथेंच गडप होऊन गेला. असा प्रकार पाहून इंद्रजित रागावलेल्या सिंहासारखा होऊन युद्धास उभा राहिला. त्या वेळीं दोघे शस्त्रअस्त्र विद्येंत पटाईत असल्यानें त्यांचें फारच भयंकर युद्ध झालें. अखेर लक्ष्मणानें मोठ्या कौशल्यानें त्याचें शीर आणि एक हात छेदून त्यास यम लोकीं पोचाविलें. आणि तत्काल श्रीरामाचें दर्शन घेऊन त्याचे मनास आनंदविलें.

---

## कथा ५८ वी.

## (सुलोचनासहगमन.)

सुलोचना ही इंद्रजिताची बायको, पुराणप्रसिद्ध महा पतिव्रतांतच तिची गणणा आहे. उभयता स्त्री पुरुषांचें प्रेम ही पराकाष्ठेचें असे. युद्धास जातेवेळीं अनिष्ट प्रसंगाचा

सुमार दिसल्यास ‘ मी तुला तावडतोब कानगी करीन ’ असें इंद्रजितानें तिला सांगून ठेवलें होतें. तसें तर त्याला करतां आलें नाहींच. कां कीं, काळाला अवकाशच नाहीं. तरी केवळ त्या पतिव्रतेच्या महा पुण्यानें ह्या वेळीं एक चमत्कार घडून आला. तो असा, ती सुंदरी सुलोचना शेषाची कन्या, लावण्याची केवळ खाणच! पति प्रतिज्ञा करून युद्धास गेले, हें जाणून ती पतीस यश यावें ह्या हेतूनें उदासीन अंतःकरणानें ईश्वराकडे चित्त लावून महालांत हिंडत होती, भोवतालीं दासी उभ्या आहेत, मैत्रिणी आहेतच, तों इतक्यांत अंगणांत कांहीं दणकन आदळल्याचा गंभीर आवाज त्यांचे कानीं आला. म्हणून धावऱ्या धावऱ्या येऊन पाहतात तों कोणा वीर पुरुषाचा खांद्या पासून तुटलेला हात त्यांच्या दृष्टी पडला. सुलोचनेचें काळीज तेव्हांच चरकलें, आणि जवळ येऊन पाहते तों वेळोवेळ आपल्या कंठांत पडलेला आपल्या स्वामीचा तो दंड पाहतांच तिला एकदम शोकाचा उमाळा आला. पण मग इंद्रास जिंकणाराची राणी अनाथ होऊन दीनासारखी शोक करते येणेंकरून पतीच्या पराक्रमास उणीव येते असें जाणून तिनें एकदम कालकूटापेक्षांही दुर्धर असा तो प्रियविरह शोक गट्कन् गिळून तो भुज मांडीवर घेऊन

म्हणाली. स्वामी मी कशी आहें हें आपण जाणत असू-लच तर आपणांस ही अशी विपत्ति कशा रीतीनें प्राप्त झाली तें मला लिहून कळवा असें बोलून तिनें त्या हाता-पुढें दऊत, लेखणी, कागद, पुष्टिपत्र वगैरे सामान ठेवलें. त्यावेळीं केवळ तिचें पातिव्रत्यच त्या हातांत संचारून प्रथम निकुंबळीं हवन करीत असतां त्याचा विध्वंस झाला, हें लिहून केवळ बारा वर्षे ज्या लक्ष्मणानें माझा प्राण प्राप्त होण्यासाठीं उपाशीं तापाशीं राहून झोंपेवांचून, सुखविलासांवांचून लोटलीं. ही केवळ ज्यानें एव्हढी तपश्चर्याच केली अशा याचकास मला आपला प्राण द्यावाच लागला. असो वीरास योग्य जी विपत्ति तीच मला प्राप्त झाली तें ठीकच झालें. पण तुझा विरह मला मात्र सहन होत नाहीं, म्हणून मी तुझे साठीं मात्र खोळंबून राहिलों आहें. त्यास तूं करवेल तेव्हढी त्वरा करून ये. येतांना शरभ नांवाच्या वानरानें माझें शीर रामदर्शनास नेलें आहे तेंही घेऊन ये. असा त्या निर्जीव हातानें लिहिलेला मजकूर वाचतांच तिला परम समाधान वाटून तिनें त्याच वेळीं आपला महाल लुटविला व सासऱ्याची आज्ञा घेण्यासाठीं राजदरबारीं चालती झाली.

तिकडे तर ही गंध वार्ता नव्हती, इंद्रजित पण करून

गेला, आतां झालेंच आपलें कार्य, सीता आतां प्राप्त होणार, तेव्हां तिचेसह विलास भोगण्यासाठीं महाल सजविण्याचा उद्योग चालू झाला होता. तोंच सुलोचना तेथें पोचली. तिचें तें विचित्र रूप पाहतांच रावण सिंहासना वरून कोसळला. सुलोचनेनें लागलेंच सारें वर्तमान सांगून साक्षी साठीं पतीच्या स्वदस्तुरचा कागद पुढें ठेवला. ह्या वेळीं रावणानें आपल्या डोळ्यांतून इतकें पाणी गाळलें कीं, त्याची एक नदी बनून ती समुद्रास जाऊन मिळाली. मग येव्हढा पुत्र गेला तर त्याला सुलोचनाची परवा कशाची! त्यानें तिला परवानगी तर दिलीच, पण शीर मागण्यास रामसैन्यांत जाण्यास परवानगी देववेना. कां कीं, त्यानें सीते ऐवजीं अडकून ठेवलें तर काय करावें! परंतु सुलोचना म्हणाली छीः मामुंजी, रामाविषयीं ही शंका घेऊं नका. तो एकपत्निव्रत पुरुष आहे. परस्त्रीचा अभिलाष केला असतां कुलक्षय होतो हें तो पक्कें जाणून आहे. हें एकतांच रावणाचे अंगीं ती गोष्ट अनुभवासिद्ध वसत असल्यानें तो अगदींच फिका पडून त्याला मुकाट्याच रुकार द्यावा लागला. मग ती बेताचा लवा जमा घेऊन रामाला भेटण्यास गेली. प्रथम तर ही सीताच भयानें रावणानें लावून दिली, असें वानरांस वाटलें. नंतर रामानें त्यास सुचविल्यामुळें 'चला, बरें

झालें ठेवा हिला कोंडून ' असें वानर बोलूं लागले. परंतु रामास असलें गैरशिस्त कोठचें आवडणार ? त्यानें असलें भाषण बोलण्याचीही मनाई केली. मग साक्षात करण्याची गोष्ट कशाला ! असो. समर्थानें सन्मानपूर्वक तिला जवळ बसवून येण्याचें कारण विचारलें. तिनें अत्यंत नम्रतापूर्वक हेतु सांगितला. तेव्हां 'तुझ्या नवऱ्याचें शीर आम्हीं आणलें हें तुला कोणीं सांगितलें म्हणून वानरांनीं तिला विचारलें. तिनें पत्र पुढें ठेऊन मजकुर कळविला. वानर काय चेष्टा खोरच. एकजण म्हणाला अगे बाहवागे असें कधीं तरी होईल कां ? दिसायला दिसतेस गोरी गोमटी पण पक्की आहेस खोटी ! चल, हें खरें असेल तर तें शीर एकदां हांसव. मग त्या पतिव्रतेस तें मान्य करावें लागलें. रामाज्ञेनें तें शीर लागलेंच तिचेपुढें शरभानें भिरकावून दिलें. तें त्या बिचारीनें पटकन उचलून घेतलें, व त्याचें रक्त वगैरे पुसून तें आपल्या शालीच्या फदावर मांडलें. इंद्रजिताचा एका डोळ्यांतून प्राण गेल्यामुळें एक उघडा होता. असो मग त्या पतिव्रतेनें अनेक प्रकारें आळवून आपलें संकट उच्चारलें. तरी शीर हंसेना. शेवटीं म्हणाली, अरे देवा! कायतरी ही विपत्ति! असें जिवाभारी संकट आधींच मला कळविलें असतें, तर मी माझे बापाला तरी सहाय्याला

बोलावलें असतें. इतकें ती म्हणत आहे तोंच तें शीर खद- खदां हंसलें. तेव्हां सर्वांची वृत्ति चकीत होऊन गेली. तोंडांत बोटेंच घालून सर्वजण बसले. नंतर एका सुलो- चनेनें शेकडो गोष्टी म्हटल्या पण शीर हंसलें नाहीं, आणि शेवटच्या वाक्यानें हंसलें ह्याचा अभिप्राय काय? तेव्हां राम सहज बोलून गेले कीं, 'बापाला सहाय्यास बोलाविलें असतें' असें जें सुलोचना बोलली, तेव्हां शीर हंसण्याचा अभिप्राय हा कीं, लक्ष्मण हाच शेषाचा अवतार. त्यानेंच मूळ मारलें, तेव्हां त्याला सहाय्यास तें काय बोलवावयाचें? हें बोलून दिव्य दृष्टीचे योगानें लक्ष्मणास त्याची सत्यताही दाखविली. तेव्हां ही आपली कन्या व हा आपण मारला, हाच जांवई असें लक्ष्मणास प्रत्यक्ष दिसून तो शोकाक्रांत होऊन गेला. हें पाहून रामानें झट्कन त्याची ती दिव्य दृष्टी काढून त्याचा मोह दूर केला. असो मग 'माझ्या सहगमनांत वानरांनीं दंगा धोपा करूं नये' असें रामा- कडून कबूल करवून, ती समुद्रतीरीं गेली. लागलींच सर्व तयारी होऊन ती पतीचे ठायीं परमेश्वराची कल्पना करून शांत मनानें सती गेली !!!

## कथा ५९ वी.

### ( सप्तमदिनयुद्ध, अहिमहि वध. )

इतकें झालें तरी रावणानें आपला हेका सोडला नाहीं. त्याला भविष्य तर कळून चुकलेंच पण इतक्यांत पाताळांत अहिमहि असे दोघे भाऊ होते. त्यांनाही रावण हीच संज्ञा होती. ते मोठेच मायावी आहेत, तेव्हां त्यांना बोलवावें असें कोणीं सुचविल्यावरून रावणानें तत्काळ त्यांना बोलावून घेऊन कच्चा मजकूर सांगितला. इतकें होत आहे तोंच अस्तमान झाला. तेव्हां 'रात्रीतून रामलक्ष्मण नाहींसे करतों' अशी त्यानें प्रतिज्ञा केली. ही गोष्ट बिभीषणाच्या गुप्त हेरांकडून कळतांच सर्वांना मोठी दहशत बसून गेली. जों जों रात्र पडत चालली तों तों त्यांची भीति वाढत चालली. मग कांहींच उपाय नाहीं असें जाणून रामलक्ष्मणांसह एकंदर सर्व सैन्यास जौळून एकेस्थळीं बसवून मारुतीनें त्या सर्वां भोवतीं चंद्रमंडळास पोहचे पर्यंत शेपटाचा कोट बांधून स्वारी त्या कोटावर बसली. इकडे दोन प्रहर रात्रीचा समय होतांच ते दोघेही भाऊ रामलक्ष्मणांस उचलून नेण्याच्या इराद्यानें रणभूमीवर येऊन 'एकदम उडी मारून दोघांस चटकन उचलून घेऊं' असें बोलून उडाले. तों त्या शेपटाच्या कोटावर आदळून धबालकन

आपटले. तेव्हां ही भिंत समजून ती मोडण्या विषयीं त्यांनीं पहारी, तरवारी मारल्या, पण उलट्या त्याच मोडल्या. मग त्यांनीं तो नाद सोडून जमीनीस चांगलें भलें मोठें विवर कोरून तें आंत घुसले. आणि मग रामलक्ष्मणांवर मोहन अस्त्र टाकून तेथूनच विवर कोरून पाताळांत घुसून गेले. खालीं विवराचे तोंडाशीं मकरध्वज नांवाचा एक पुरुष रक्षण ठेऊन तेथून तेरा हजार योजनांवर महिकावती ह्मणून त्यांची राजधानी होती, तेथें एक विशाल देवीचें स्थान होतें. त्या देवीला हे बळी द्यावेत असें त्यांच्या मनांत वागून त्यांनीं त्या दोघांला मोठ्या बंदोबस्तानें ठेऊन दिलें.

इकडे उजाडल्यावर वानर पाहतात तो रामलक्ष्मण नाहींत. तेणेंकरून सर्वांस बहुत खेद झाला. पुढें तपासाअंतीं ह्या विवरमार्गांतूनच त्यांना नेलें असावें, अशी कल्पना करून मारुतीनें कमर बांधली. लागलींच नळ, नीळ, जांबुवंत, अंगद हे ही त्याचे पाटोपाट निघाले. पण त्यांचा दम अगदीं कोंडून जाऊन ते तेथेंच पडले. शेवटीं, मारुतीनें शेपटानें बांधून त्यांना एकदाचे बाहेर काढले. बाहेरचा मोकळा वारा लागल्यानें त्यांना अमळ हुशारी आली. पुढें राक्षसी प्रदेश समजून ते यात्रेकऱ्याच्या रूपानें तेथून चालले. तों मकरध्वजानें त्यांस अटकावल्या

वरून मारुतीची त्यांची झुंज लागली. शिवाय वीस कोटी राक्षस मकरध्वजाचे मदतीला होते. ते तर त्या रामभक्तांनीं केव्हांच ठार केले. असो, मारुती मग मकरध्वजास पाहून त्याचे छातीवर बसला, व ह्मणाला हाक मार तुझा कोणी रक्षणकर्त्ता असेल त्याला. तो म्हणाला माझा बाप मारुती येथें असतां तर——म्हणजे हा प्रकार असा होताकीं, हनुमंतानें लंका जाळली. व शेपूट विझविण्यासाठीं समुद्रावर आला तेव्हां, त्यानें अंगावरील घाम काढून समुद्रांत फेकला. तो एका मगरीनें गिळला. त्यापासून तिला हा पुत्र झाला. असो, त्याचे शब्द ऐकतांच हे बालब्रम्हचारी काळे पडून गेले. मग ही सारी हकीगत समजून मगरीची जेव्हां गांट पडली, तेव्हां समाधान होऊन प्रेमही झालें. मग राम कोठें असून त्याची व्यवस्था कशीकाय लागायची हेंही मारुतीस कळून चुकलें. तें ऐकतांच वाऱ्यासही मागें सारीत स्वारी जी गेली ती तहत त्या प्रसिद्ध देवीचे देवळांत घुसली, आणि कपाटें भक्कम बंद करून देवीला मोरींत काढून तीवर पाय ठेऊन स्वारी उभी राहिली.

दुसरे दिवशींच बळीचा विचार ठरून महा पूजेच्या तयारीनें सरंजाम घेऊन पुजारी देवळा नजीक येतो तों दार उघडतां उघडेना. त्यामुळें सारे मोठ्या विचारांत

पडले. इतक्यांत आंतून ह्या नव्या देवीनें म्हटलें ' प्रिय भक्तांनो आज माझी पूजा कळसास ढोरें पाहून तेथूनच करा. मग त्यांनींही त्या प्रमाणें करून पंचामृतांच्या घागरीच्या घागरी रिचविण्यास आरंभ केला. मारुतीरायानें ढोऱ्यास तोंड लावून येईल तें पोटांत घेण्यास आरंभ केला. लोकांस वाटलें, आज प्रसाद खूप मिळेल, म्हणून न्हाणी जवळ भांडीं घेऊन चडाओढीनें पुढें होत, आंतून कांहीं येईना म्हणून कांठ्या घालीत, त्या त्या विच्याऱ्या देवीला मात्र टोचत. असो मग महानैवेद्यार्थ अन्नाचे डोंगर आंत गट्ट होऊन बळी देण्यापर्यंत पाळी आली. तेव्हां मारुतीरायानें हळूच म्हटलें, 'तुमचे पूजनें मी फार समाधान पावलें आहें, आतां हळूच एक फळी उघडून बळीस आंत लोटा.' त्याप्रमाणें मही दोघांस घेऊन आंत घुसला. त्याबरोबर एक पुजारीही कांहीं हातीं लागेल म्हणून आंत घुसला. तों मारुतीनें पुजारी व महि ह्या दोघांस तेथेंच चेंगरून टाकलें. इतक्यांत ते दोघे म्हणाले, 'मारुतीराया तूं दूर राहिलास, आतां आम्हांस कोण रक्षील' ? धन्य त्या हनुमतांची कीं, देव ज्याची संकटकाळीं विनवणी करतात! असो मग मारुतीनें कच्चें वर्तमान त्यांना कळविलें. तेव्हढ्यांत त्यांचें कार्य झालें. रामा जवळ धनुष्य नवतें. तें लंकेंत होतें. तेव्हा मारु-

तीनें वायुरूप होऊन तेव्हड्याचे तेव्हड्यांत तें आणलें. मग काय! लागलाच देऊळाचा सत्यानाश करून बहुत्येक सैन्याचा खवाला उडाविला. सर्वांत अहि रावण हा मोठा बलाढ्य, शिवाय त्याचे अंगांतून जे रक्तबिंदु पडत त्यांपासून तसेच आणखी पुरुष निर्माण होऊन तेही रामाशीं झगडत. हा प्रकार असा होता कीं, अहीनें शंकर प्रसन्न करवून घेऊन हा वर मागून घेतला होता, त्यामुळें शंकर-कंठांतिल भुंगे पाताळांतलि अमृतकुंडांत शिरून तेथील अमृत महीच्या रक्तांत मिसळीत. तेणेंकरून असा प्रकार होत होता. हें एक चंद्रसेना अहीची बायको जाणत होती. मगरी मकरध्वजाची आई, हीस मारुती जाऊन विचारूं लागला असतां ती म्हणाली, चंद्रसेना पतिव्रता आहे, तिची आपण भाक घेऊन विचाल्यास ती सांगेल. तें ऐकून मारुती चंद्रसेने कडे गेला. तेव्हां रामास पाहिल्या पासून त्याशीं एक वेळ तरी ऐक्य घडावें असें तिचे मनांत वागून ती अगदीं बेचैन होऊन गेली होती. मग तिचा उद्देश उमजतांच तो पूर्ण करण्याचें वचन देऊन मारुतीनें वरील प्रमाणें समजून घेतलें. नंतर तसाच अमृतकुंडा जवळ गेला. तों भले मोठ मोठे भुंगे अमृत घेऊन जातांना पाहून त्यानें तडातड फाडून सगळे नाहींसे केले. एक त्यांत प्रमुख

होता त्यानें शरण येऊन ' माझ्यानें होण्यासारखें पाहिजे तें तुमचें काम मी करीन, स्मरण मात्र करावें ' असें बोलून प्राण वांचवून घेतला. असो. या योगानें सर्व अहिरावण नष्ट होऊन मुख्य तोही खपला. मग तत्काळ मकरध्व-जाला तें राज्य देऊन राम परत निघाले.

---

## कथा ६० वी.

## (पुरीफसवणूक, चंद्रसेनेची )

राम जाऊं लागले तेव्हां मारुतीनें चद्रसेनेची अडचण पुढें केली. तेव्हां त्या एकपत्निव्रत रामास मोठेंच संकट पडून ते म्हणाले आतां ह्यांतून कसेंही करून मला काढ. मग मारुतीनें आज रात्रीं येतील म्हणून चंद्राननेस सांगून म्हटलें कीं, पहा हा पलंग बिलंग मोडला तर राम उठून जातील मग मजकडे कांहीं नाहीं. तें ऐकून तिनें सुरेख शय्या बनवली. मारुतीनें लागलेंच त्या आपल्या भ्रमरास बो-लावून पलंगाची गातें कोरून ठेवण्यास सांगितलें. व जें केलें तें रामास सांगून त्याला चंद्रसेनेकडे नेलें. मग ती कोठें आनंदांत आहे तोंच राम पलंग मोडून दरवाजाबा-हेर पडले. नंतर कृष्ण अवतारीं इच्छा पूर्ण करूं असें सांगून सर्व निघून लंकेंत आपले छावणींत येऊन पोंचले.

## कथा ६१ वी.

## ( अष्टमदिनयुद्ध, रामरावणांची लढायी. )

अहिमर्हीनीं प्रतिज्ञा केल्यामुळें रावणास कोठें समाधान झालें न झालें तोंच सैन्यासह रामलक्ष्मण रणभूमीवर जयत उभे उभे असल्याचें वर्तमान त्याचे कानीं आलें, व अहिमहींचा परिणामही कळला. मग मात्र रावणाची खात्री झाली कीं, आतां आपली गति धड दिसत नाहीं. तर आतां रामास शरण जाऊन मुलाबाळांबद्दल रडत वांचण्या पेक्षां धारातीर्थी, रामासमक्ष रामहस्तें, परिणाम घडावा हेच योग्य. तेव्हां अवसान धरून युद्ध करायचेंच, मग लागो भागो दिवाळी, असा विचार करून तो आपलें सारें सैन्य गोळा करून फारच त्वेषानें युद्धास आला. त्या दिवशीं उभयतांचें फारच भयंकर युद्ध झालें. रामानें तर रावणास मूर्छित पाडलें, पण बिभीषणानेंही त्याला खूप जर्जर केलें. त्यामुळें रावणास बिभीषणाबद्दलच भारी संताप येऊन ब्रम्हदत्त जी बिनमोल सांग ( शक्ति ) ती त्यानें त्याचे अंगावर सोडली. तें अनिवार शस्त्र पाहून ती तत्काळ लक्ष्मणानें बिभीषणास पाठीशीं घालून तीव्र बाण सोडून अर्ध मार्गांतच मोडून तोडून टाकली. हा एक त्वेष व इंद्राजित, अतिकाय ह्यांना मारल्याचा त्वेष सारा

एकत्र होऊन मयानें दिलेली जी फारच भयंकर शक्ति तिची त्यानें गवसणी काढली. अरे बाप! सहस्र सूर्यासारखें तेजस्वी तें शस्त्र. तिचें एकेक टोक तक्षक सर्पाचें तोंडच भासे. ती धनुष्यावर टेऊन ह्मणाली रे मनुष्यप्राण्या, इंद्रजितासारखा वीर तूंच मारलास काय? तर भोग आतां प्रायश्चित. असें बोलून ती त्यानें लक्ष्मणाचे अंगावर सोडली. त्याकाळीं ती कृतांताच्या विजे सारखी झगझगीत होऊन चालली. जिकडे तिकडे आतां कठीणरे कठीण! असा एकच ध्वनि झाला. देवांच्या डोळ्यांतून टपाटप अश्रु गळण्यास लागले. आकाश पाताळांतून कडाकड शब्द होऊं लागले. वानर राक्षसही भयाभीत होऊन गिरिकंदरीं दडाले. असा प्रसंग पाहतांच मारुतीनें उडी मारून चटकन ती शक्ति धरली. तोंच ती स्त्रीरूप बनून मारुतीस म्हणाली तूं बालब्रम्हचारी म्हणवितोस आणि मला परस्त्रीला कां झगडतोस? हें झोंबट पाहून मारुतीनें तिला सोडलें, तोंच ती पूर्ववत होऊन लक्ष्मणाचे अंगावर धांवली, ती अर्ध मार्गांत तोडून टाकण्याची लक्ष्मण तयारी करीत होता, पण इतक्यांत ती अनिवार सांग लक्ष्मणाच्या पोटांत घुसून पाठीतून निघून पृथ्वीस फोडून पाताळगंगेंत जाऊन विझाली. असें भयंकर तापलेलें शस्त्र पोटांतून जातांच लक्ष्मण निश्चेष्ट होऊन पडला. त्याची

ती अवस्था पाहतांच रामानें धाडकन अंग टाकलें. त्या वेळच्या त्याच्या शोकाला सुमारच नव्हता. असो. मारुतीनें तत्काळ द्रोणाचल आणण्यासाठीं कमर खचलीच.

---

## कथा ६२ वी.

## ( कालनेमीवध. )

बहुधा अतां मारुती द्रोणाचल आणील हें रावणास आधींच वाटून मारुतीस वाटेंत विघ्नकरण्यासाठीं कालनेमि नांवाच्या राक्षसास पूर्वींच रावणानें पुढें पाटवून दिलें होतें. कोणी कडून रात्र टळली कीं पुरे, उजाडतां उजाडतां लक्ष्मणाचा प्राण जायचा 'मग द्रोणाचलाचा कांहींच उपयोग नाहीं. असो. मारुती जों जातो तों मार्गांत कालनेमीचा त्याला आश्रम लागला. मारुतीला त्यावेळीं तहान फार लागली होती, म्हणून तो मुद्दाम तेथें उतरला. तोंच कालनेमीही ऋषि बनून पुढें येऊन म्हणाला. यावें, यावें, आपले सारखे अतिथि ह्या आश्रमांत आल्यानें आम्ही पुनीत झालों. या वाटेल तें खा, प्या. मारुतीचे मनांत थोडासा संशय आलाच. तो ह्मणाला तें कांहीं नको, मी कोणाच्या हातचें खात पीत नसतों, तर पाणी कोठें तें सांगा? तेव्हां एकानें त्यास तेथें वाहत असलेली नदी

टाकविली. तेथें एक विवशी होती. कोणी नदींत पाय टाकला कीं, ती त्याला ओढून खाऊन टाकी. तिनें चाली· प्रमाणें मारुतीलाही पकडलें. पण तोकाय! त्यानेंच पटकन तिला ओढून फाडून टाकिलें? ती कोणी शापग्रस्त देव स्त्री होती. तिच्या उद्धाराचा हाच संकेत होता. म्हणून ती दिव्य देह धारण करून स्वर्गी गेली. जातांना कालनेमीचें कौटाळ तिनें मारुतीस सांगितलें होतें. तें ऐकतांच मुद्दाम मारुतीनें वांकडी वाट केली. तोंच कालनेमि पुढें येऊन म्हणाला, बरें बरें तुम्हांला नसेल,खायाप्यायचें तर आमचा आग्रह नाहीं. परंतु ही आमची संस्था नीट चालण्यासाठीं आह्मा भल्या ब्राह्मणांस कांहीं धर्म करावा. मग 'ठीक आहे असें ह्मणून मारुतीनें त्याचें उराडांत असा एक ठोसा मारला कीं, त्याचा निकालच. तेथें दुसरे सहस्रावधि राक्षस होते, परंतु मारुतीनें रावणास ही बातमी सांगण्या पुरताही कोणी ठेवला नाहीं. नंतर लागलाच पूर्ववत तो पर्वत शेपटास गुंडाळून चालला.

इकडे त्याच रात्रीं भरतास कांहीं ओंगळ स्वप्न पडून तो वशिष्ठानुमतें रातोरात त्याचे शांत्यर्थ कांहीं होम, हवन करीत होता. मारुतीचा रस्ता तेथूनच होता. वनस्पतींचें योगानें तो पर्वत प्रकाशीत असल्यानें त्याचा प्रकाश भरताचे

अंगावर येतांच हा कोणी दुष्ट राक्षस समजून त्यानें एकच बाण मारून मारुतीस खालीं पाडिलें. पुढें जेव्हां मारुतीकडून त्याला वर्तमान कळलें तेव्हां लक्ष्मणाच्या नाशाला आपणच कारण झालों असें जाणून त्याला फार वाईट वाटलें. असो मग त्याचें समाधान करून मारुती लंकेंत गेला, आणि आपलें कार्य केलें. लक्ष्मण पूर्ववत हुषार, असें पाहून मारुतीनें पर्वत जागचे जागीं ठेऊन दिला. आणि मग पुन्हां सर्व रामसैन्य लंकेवर लोटलें.

---

## कथा ६३ वी.

## ( युद्धसमाप्ति. )

लक्ष्मणाचा निकाल उडाला, आतां उरला राम, तो अमळसा मोटा योद्धा आहे असें जाणून इंद्रजित ज्याप्रमाणें अग्नीपासून रथ मिळविण्यासाठीं हवन करीत होता तसेंच भयंकर हवन रावणानेंही चालविलें होतें. ती बातमी हेरांकडून कळतांच वानरांनीं त्याचा विध्वंस करून त्याला चवताळून रणभूमीवर आणलें. आतां फारच निकराचें युद्ध होणार असें जाणून इंद्रानें मातली कडून आपला रथ रामाकडे पाठविला. ते दोघेही युद्ध प्रवीण व एकमेकांचें पुरे शत्रु. त्यांच्या युद्धाचा प्रसंग, पापदृष्टीनें पाहवेना! असे राक्षस

रामानें त्याकाळीं पाडिले. आणि शेवटीं ज्याचें साठीं येवढा अनिर्वाच्च नाश झाला त्या रावणाचाही प्राण घेतला.

---

## कथा ६४ वी.

## ( सीताराम भेट. व रामराज्याभिषेक )

बिभीषणास लंकेचा राजा करावयाचें असें जें रामाचें भाषण तें आतां सत्य करण्याची वेळ आली. असें जाणून लागलीच, प्रभूनें लक्ष्मणास आज्ञा दिली. त्याप्रमाणें सर्व व्यवस्था लावून लक्ष्मणानें बिभीषणास राज्याभिषेक केला. नंतर जिचे साठीं येव्हढा प्रयत्न त्या सीतेस आणावयास परवानगी दिली. त्या समारंभाचे वेळीं इंद्र, चंद्र इत्यादिसर्व देव, ब्रह्मदेव, शंकर आणि राजा दशरथ हेही तेथें आले होते. मग सहा महिने सीता, रावणाचे घरीं राहिल्यामुळें तिच्या पातिव्रत्याची कोणास शंका न यावी म्हणून अग्नीकडून तिची शुद्धता करवून नंतर रामानें तिचा अंगीकार केला.

इंद्राचा शत्रु इंद्रजित हा मारल्यामुळें इंद्रास मोठें समाधान होऊन प्रभूचे आज्ञेनें त्यानें अमृतवृष्टी करून सर्व वानरांस जिवंत केलें. व त्यांचे साठीं सर्व रानभर वृक्ष निरंतर फळांनीं डवरलेले असावेत म्हणून चोहींकडेच अमृत

सिंचन केलें. इतकें झाल्यावर पुष्पक नांवाच्या विमानांत सर्व वानरसैन्यास घालून रामचंद्रानें आयोध्येचा रस्ता धरला. बिभीषण, सुग्रीव हे ही त्याचे बरोबर निघाले. अयोध्येस येतांच सर्वांच्या भेटी होऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन गेला. नंतर एक दोन दिवसांतच वशिष्टानें रामास राज्याभिषेक करविला. नंतर युद्ध प्रसंगीं असणाऱ्या सर्वांस देणग्या वाटून ज्याला त्याला आपापले घरीं जाण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणें सर्व निघून गेले.

---

## कथा ६५ वी.

## ( मारुतीची देणगी. )

रामानें ज्याचे त्याचेपरी सर्वांना कांहीं ना कांहीं अलंकार, भूषणें दिलींच. पण मारुतीरायास कांहींच दिलें नाहीं. तेव्हां सीता म्हणाली. "हें काय! माझी आपली भेट कायती मारुती मुळें झाली. आणि त्याला कांहींच कसें दिलें नाहीं! राम म्हणाले. तें तर खरें पण त्याच्या श्रमा सारखं मजजवळ कांहीं नाहीं. तुझे जवळ कांहीं असलें त द्दे. सीतेस तिचे बापानें दिलेली एक रत्नमाळा तिचे गळ्यांत होती. तींतील एकेक रत्न पृथ्वीच्या

मोलाचें होतें. तीच तिनें मारुतीचे गळ्यांत घातली: मारुती काय वानरच, चट्कन् एका झाडावर उडून एकेक रत्न दातांनीं फोडून पाहून फेकून देऊं लागला. तीं पृथ्वी-मोलाचीं रत्नें, त्यांची ही अवस्था. हें पाहून जांबुवंता-दिकांनीं त्यास चटकन धरून म्हटलें रे वेड्या हें काय करतोस. तो म्हणाला त्यांचे पोटांत राम आहे किंवा नाहीं हें पाहतों. वानर ह्मणाले वेड्या रत्नांत राम असतो कां? तुझ्या पोटांत राम नाहीं ह्मणून तें फोडायचें कायरे? मारुती ह्मणाला माझ्या पोटांत राम नाहीं? काय ह्मणतां? तसें असेल तर तें पोट कशाला ठेवावयाचें? असें बोलून नखें रोवून त्यानें चट्कन पोट फाडलें. तों सीतेसहित श्रीराम सिंहासनावर बसले असून जवळ मारुतीही सेवा करीत उभा आहे. असें सर्वांस स्पष्ट दिसलें! याचें नांव देव व याचें नांव भक्त.

---

## कथा ६६ वी.

## ( सीतात्याग. )

देव असो, सार्वभौम राजा असो, स्वर्गाचा अधिकार पावण्या सारखा तपस्वी असो अथवा त्रैलोक्यविजयी

वीर असो, परंतु प्रारब्धापुढें त्याचें कांहीं चालत नाहीं. एखाद्याचें दैवीं सुख नसलेंकीं, तें मग त्याला प्राप्त होणेंच नाहीं. येथेंच पहा, झाला एकदाचा वनवास झाला, शत्रु मारला. घरीं परत आले, आतां तर सुख असावेना? पण दैवापुढें उपाय नाहीं. सीतेला पुन्हां अरण्यांत जावें लागलें, जावें लागलें कशाचें? मुद्दाम नेऊन टाकावें लागलें. तशांतून ती त्यावेळीं गरोदर असून तिचे दिवस अगदीं भरत आलेले होते. म्हणजे असें झालेंकीं, अयोध्येतील कोणी एक धोबी आपली न्हाती धुती बायको रुसून बापाचे घरीं गेली, व पुन्हां बाप तिला परत घेऊन आला असतां घरांत घेईना. व म्हणाला, लोकांप्रमाणें चारचार सहासहा महिने बाहेर राहिलेली बायको घरांत घेणारा तो रामचंद्र मी नाहीं लागलों. तें हेराकडून रामाचे कानीं येतांच त्यानें मुकाट्याच लक्ष्मणास सांगून सीतेला रानांत टाकून देवविलें. बिचारी एकटी, घोर जंगलांत, प्रसूतीची वेळा येऊन पोचली बिचारी काय करते? तुसती हंबरडा फोडून रडूं लागली. इतक्यांत थोडीशी दैवाला कांहीं करुणा येऊन असें झालें कीं, वाल्मीकि ऋषि कोठें त्याच वनांत चालला होता, त्याला तिचें रडणें ऐकूं येऊन तो तिचे कडे गेला. व ही रामची सीता, असें पाहतांच त्याला करुणा येऊन त्यानें

जवळ असलेल्या आपल्या आश्रमांत तिला नेऊन ठेवलें. इतकी तिची व्यवस्था लागली.

---

## कथा ६७ वी.

### ( लहुंकुशजन्म व पराक्रम. )

सीता वाल्मीकाचे आश्रमांत राहिली. पुढें एक अर्धे दिवसांतच ती प्रसूत होऊन तिला आवळे जावळे पुत्र झाले. वाल्मीकानें लहुकुश अशीं त्यांचीं नांवें ठेऊन पुढें तीं मुलें जसजशीं मोठीं होत चाललीं, तसतशीं त्यांना ऋषीनें शिक्षणही दिलें. तेणेंकरून बाल वयांतच त्यांचे ठायीं क्षात्र तेज चमकूं लागून तीं मुलें बहुत पराक्रमी झालीं. ऋषीनें त्यांना सारें रामचरित्र शिकवून तें त्यांचे कडून पाटही करून घेतलें. सुमारें वयाच्या आठवे वर्षीं ते त्रैलोक्य जिंकितील असें त्यांचे ठायीं तेज प्रगट झालें. मुलांची स्थिति पाहून सीतेस मोठें कौतुक वाटे, व अशीं मुलें रानां वनांत पडलीं, आणि आपली स्थिति काय झाली हें तिचे मनांत येतांच चार घटका ती एकांत बसून रडे. हें तिच्या पोरांच्या लक्षांत येऊन त्यांनीं मात्र दुःखाचें कारण विचारल्यावरून तिनें थोडें फार त्यांना कांहीं सांगितलें. तेणेंकरून त्या पोरांच्या मनांत रामाविषयीं बराच क्रोध उत्पन्न झाला. असो.

तीं क्षत्रियांचीं मुलें, त्यांतून ऋषीनें त्यांना शुद्ध कलेंत तरबेत करून शिकारीचा नाद लावून दिला होता. त्यामुळें तीं बेटीं रोज रानांत जाऊन सावजें मारून आणूं लागलीं. ऋषींच्या आश्रमाला हें फारच अयोग्य असें होऊं लागलें. एक वेळीं तर त्यांनीं वाल्मीकाचा भाऊ हरिणाचे वेषानें संचार करीत असतां ह्यांनीं हरीण समजूनच त्याला ठार करून आश्रमांत आणून ठेवलें. तें पाहून ऋषीला बंधु मरणाचें व ह्या पोरांना ब्रह्महत्या घडल्याचें अशीं दोन दुःखें झालीं. एकास कांहींच उपाय नव्हता. ब्रह्महत्या निरसनाला मात्र असा उपाय होता कीं, सुवर्णाच्या एक हजार कमलांनीं शंकराची पूजा करायला पाहिजे होती. तें ऋषीनें त्यास सांगून ह्मटलें कीं, आयोध्येंत ब्रह्म सरोवर आहे. तेथें लागेल तेव्हढीं हीं कमलें मिळतील. पण तेथें बंदोबस्त इतका आहे कीं, वाऱ्याचाही तेथें प्रवेश व्हायचा नाहीं. तें बोलणें पोरांच्या खात्रींत ही नाहीं. ते गदगदां हंसून ह्मणाले. काळ रावण असला तरी ठोकून टाकूं. असें बोलून हरणामारखे उडाले. पोरेंच तीं, तेथें मागेंपुढें कांहींच नाहीं. कुशानें बागेंत घुसून कमलें तोडलीं, आणि अंगावर आलेल्यांस लहूनें चोपून मोकळें केलें. ह्या मूर्ति लहान पण कीर्ति मोठी, असें रामचंद्र देखील ह्मणूं लागला.

हें तर असोच पण ह्याही पेक्षां अचाट पराक्रम त्यापोरांनीं एकदां केला.

ह्मणजे त्याच प्रसंगीं अयोध्या प्रदेशांत एक भयंकर दुष्काळ पडला होता. सुमारें बारा वर्षांत पाउसाचा ठाक देखील पडला नाहीं. तेव्हां बहुधा सीतात्यागा पासूनच हें अरिष्ट उद्भवलें असें सर्वानुमतें ठरून अश्वमेधयज्ञ करण्याचें ठरलें. त्यावेळीं रामानें बिभीषण, सुग्रीव ही सर्व मंडळी सैन्यासह बोलावून यज्ञास आरंभ करून पृथ्वीप्रदेभणेसाठीं अश्व रवाना केला. शत्रुघ्न त्याचें रक्षण करीत होता. बरोबर सैन्यही निवडकच होतें. घोडा सर्व पृथ्वीप्रदक्षणा करून परत येतां येतां वाल्मीकीच्या आश्रमा वरून येऊं लागला. तेथें कोटें हीं पोरें खेळत होतीं. भरत, गुरूसाठीं समिधा, फुलें वगैरे आणण्या साठीं गेला. कुश हा वडील व लहु धाकटा असें मानलें होतें. असो. लहूनें चटकन तो घोडा धरून जवळच एक केळीचें बन होतें त्यांत नेऊन बांधला. तो कांहीं केल्या सोडीचना. शेवटीं लढायीवर प्रसंग येऊन खूपच चकाचकी उडाली. लहूनें बहुतेक सैन्याचा तर खबला केलाच, पण एकटाच तो, त्यामुळें शत्रुघ्नानें त्यास पकडून नेलें. तों इतक्यांत कुशानें येऊन भरताची पुरी खोड मोडून लहूस सोडून घेतलें.

ही वार्ता अयोध्येस गेल्यावर सर्वांस मोठा आचंबा वाटून लक्ष्मण युद्धास आला. ह्या पोरांनीं त्यावेळीं पराक्रम करून लक्ष्मणास मूर्छित करून पाडलें. मागून भरत आला, त्याचाही तोच परिणाम. बिभीषण, सुग्रीव, जांबुवंत शेवटीं मारुती, आणि अखेरीस रामचंद्र ही, आले त्या सर्वांनाच त्यानें जेरीस आणलें. रामाला तर टाकून इतकें कांहीं बोलले कीं, रावणही असें बोलला नाहीं. इतकें देखील ह्मणाले रे तूं विनापराधी अशा आपल्या बायकोस अरण्यांत टाकणाऱ्या निर्दया, तुझें तोंडही कोणी पाहूं नये. असो. इतका परक्रम करून जांबुवंत, मारुती इत्यादि वानरांस मूर्छित पाडून व त्याच प्रमाणें राम लक्ष्मणांची ही दशा करून त्या दोघांचे मुकुट आपले मस्तकीं घालून त्या वानरांच्या शेपट्या धरून फरफरा ओढीत आश्रमा कडे घेऊन गेले.

असो मग वाल्मीकीनें त्या सर्वांस उठवून एकमेकांची एकमेकांस माहिती करवून देऊन त्याकाळीं प्रेमशोकाचा अगदीं पूरच वाहविला. सर्वांच्या भेटी झाल्या, प्रभूनें पुत्रासह सीतेचा अंगिकार केला. नंतर सर्व मंडळी परत अयोध्येस येऊन प्रभूनें तो यज्ञसमारंभ परिसमाप्त केला. याप्रमाणें आरंभित कार्य शेवटास गेल्यानंतर सर्व पाहुणेरावळे आपापले घरीं गेले.

## कथा ६८ वी.

## ( शुष्कशी लढायी, लवणासुरवध. )

ह्या वेळीं जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन गेला. प्रभूनें आकरा हजार वर्षेपर्यंत आनंदानें राज्य चालविलें. दंगा धोपा कांहीं एक कोठें झाला नाहीं. पुढें अगदीं शेवटीं एकाएकीं अयोध्येंत चौहीं कडून एकच फिर्याद आली कीं, मथुरे नजीक यमुनेच्या कांठीं कोणी लवण नांवाचा दैत्य माजला आहे. तें ऐकतांच रामानें शत्रुघ्नाची त्याचेकडे रवानगी केली.

हा समुद्रांतील जलचरें खाणाऱ्या मरु नामक दैत्याचा पुत्र, ह्यानें शंकरास प्रसन्न करवून घेऊन त्याचे पासून एक शूळ घेतला होता. तो एकदा हातीं घेतला कीं, त्याचे पुढ टिकणारा त्रैलोक्यांत कोणी वीर मिळावयाचा नाहीं. तो यमुनेचे तीरीं एके गुहेसारख्या जागेंत असे. तो शूळ त्यानें तेथें ठेवूनच बहुधा बाहेर जावें, त्यानें इतकीं कांहीं माणसें मारिलीं होतींकीं, त्याचे आसपास हडकांचे पर्वत बनून प-डले होते. असो मग शत्रुघ्नास ही सर्व गोष्ट कळल्यामुळें तो असुर घरांत नाहीं असें पाहून बेधडक घरांत शिरून शत्रु-घ्नानें त्याचा तेव्हडा शूळ घेतला. आणि मग प्रसंग येतांच

त्यानें त्या राक्षसास ठार करून तेथील लोकांचा एकदांचा कांटा उपटून टाकला. रामास ही बातमी कळतांच शत्रुघ्नास मथुरेचें सर्व राज्य देऊन तेथेंच बंदोबस्तास ठेवलें.

## गोष्ट ६९ वी.

## ( तपश्चर्येचें फल. )

रामानें इतकीं वर्षे राज्य केलें, परंतु तंटा म्हणून कसा तो कोणाच्या गांवीं नाहीं. अकालीं मृत्यु नाहीं ! एकदां मात्र असें झालें कीं, कोणा ब्राह्मणाचा आठ वर्षांचा मुलगा मृत झाला; तो त्यानें तत्काळ तसाच रामदरबारीं आणून म्हटलें, राजा, कांहीं तरी तुझ्याकडून अत्यंत वाईट काम झालें म्हणूनच माझा मुलगा मेला, तर तो माझा मला परत आणून दे. तें ऐकून रामास मोठी चिंता उत्पन्न झाली. इतक्यांत नारदाची रामाची गांठ पडून नारदानें म्हटलें कीं, गोदावरी प्रदेशांत कोणी शूद्र तपश्चर्या करीत आहे. हें जातिधर्माविरुद्ध कर्म असल्या मुळें येथें अनाचाराचें पातक उद्भवलें. तें एकतांच रामानें तेथें जाऊन त्याचा शोध करून त्यास ठार मारलें. तेणेंकरून तो मुक्तीला गेला. तो तपश्चर्या तरी ह्या साठींच करीत होता. असो नंतर इंद्रास सांगून रामानें त्या भटजीचा मुलगा परत आणून दिला. नंतर

नसाच मागें फिरून अगस्तीचे आश्रमावरून परत येत असतां एक गिधाड व घुबड एक मेकाशीं झगडत असून ते आपला तंटा निवडण्यासाठीं रामा कडेच येत होते. मग प्रभूची गांठ होतांच, घुबड ह्मणालें महाराज ह्या झाडावर माझें वंशपरंपरा कोटें आहे, तें ह्या गिधाडानें हिरून घेतलें आहे, देत नाहीं. तर तें माझें मला मिळावें. गिधाड ह्मणालें. हें लबाड बोलतें, तें माझेंच घर आहे, मी आज कैक वर्षें तेथें रहात आहे. हा उगाच वाद सांगतो. तें एकून प्रधान रामा बरोबर होताच, प्रभूनें तें काम प्रधानावर सोंपविलें. प्रधानानें त्यांना विचारतांच गिधाड ह्मणालें. वाहवा महाराज फार दिवस माझी ह्या झाडावर वस्ती आहे. ही पृथ्वी येथें नव्हती, तेव्हां मी ह्या झाडावर घरटें बांधलें आहे. घुबड ह्मणालें महाराज देवानें पृथ्वी केली मग तीवर झाड उगवलें, नंतर मीं त्याचेवर घर बांधलें आहे. तें एकतांच घुबड खरें ठरून त्याला तें घरटें मिळालें आणि गिधाड लबाड बोललें ह्मणून आतां राम त्यास ठार मारणार तो आकाश वाणी झाली कीं, हा गिधाड पूर्वींचा ब्रम्हदत्त नांवाचा राजा होता. एकदां गौतम मुनि ह्याचे घरीं गेले असतां ह्यानें त्याला मांस वाढलें, तें पाहतांच 'गृध्र हो' ह्मणून ऋषीनें त्याला शाप दिला. नंतर ह्यानें

विनवणी केल्या वरून रामदर्शन होतांच उद्धार होईल, असं सांगून ठेवलें आहे. इतकें होत आहे तोंच तो गिध्रही दिव्य रूप बनून श्रीराम कृपेनें उद्धार पावला.

---

## कथा ७० वी.

## ( अन्नदान न केल्याचा परिणाम. )

मग राम तेथून निघून अगस्तीचे आश्रमीं गेले. त्या-वेळीं रामाची बोळवण करतांना ऋषीनें एक बहु मोलांचें सिंहकंकण रामास दिलें. तेव्हां 'हें आपलेकडे कोठून आलें' असें रामानें त्यास विचारल्यावरून अगस्ति म्हणाले तें पहा पलीकडे प्रेत पडलें आहे, तो विदर्भ देशाचा राजा होता. त्यानें तपश्चर्यादि अनेक प्रकारचीं अनेक पुण्यें केलीं. परंतु तिळमात्र अन्नदान त्याला घडलें नाहीं. पुढें तो मरणानंतर स्वर्गी गेला, पण तेथें त्याला खाण्याला कांहीं नाहीं, येथें जें द्यावें तेंच तेथें भोगावें. असें असल्यामुळें तो क्षुधेनें पीडित झालेला पाहून ब्रह्मदेवानें त्यास सांगितलें, तुझा देह भूमीवर अद्यापि पडला आहे. तो तूं नित्य खात जा. तुझ्या खाण्या पासून त्याचें मांस कमी न होतां वाढेल हें मी तूला सांगून ठेवतों. आणि ज्या दिवशीं तुझी अगस्तीची भेट होईल तेव्हां या तापापासून तूं मुक्त

होशील. रामा त्याप्रमाणें कैकवर्षें तो राजा आपल्या देहाचें मांस कुरतुडून खात होता, पुढें अकस्मात माझी त्याची गांठ पडून तो मुक्त झाला. त्यानें दक्षणा म्हणून मला हें कडें दिलें होतें. तें मीं तुला दिलें. इत्यादि आःणखी बरेच उभयतांचें भाषण होऊन प्रभु परत अयोध्येस येऊन पोचले.

ह्या नंतर मात्र प्रभूच्या राज्यांत कोणच्याही प्रकारची कांहींच विशेष गोष्ट झाली नाहीं. दुःख, दरिद्र, अनाचार इत्यादि गोष्टी कोणाच्या स्वप्नीं पण नव्हत्या. असें हें श्री राम प्रभूचें चरित्र जो कोणी वांचील, लिहील, संग्रहीं ठेवील त्यावर प्रभु पूर्ण कृपा करतील.

समाप्त.

॥ श्री ॥

# निवडक रामाचीं पदें.

॥ पद. ॥

दाखवीं तव दिव्य पाय दयानिधे रामा ॥ धृ० ॥
हीन दीन आस तुझी, कास पूर्ण आह्मा ॥ धरा-
वया पहातसे अगा घनश्यामा ॥ दाख० ॥ १ ॥
माय बाप बंधु गोत्र, मीत्र तूंचि आह्मा ॥ तुजवीण
कोण असे सांग सख्या रामा ॥ दाख० ॥ २ ॥
सखा आनंद तनय, ह्मणे गुणग्रामा ॥ शीण भाग
हरीं त्वरें पुसोनिया धामा ॥ दाखवीं० ॥ ३ ॥

॥ पद. ॥

रामचंद्र नाहीं घरीं काय मी करूं ॥ अशामध्यें
कितीतरी धीर मी धरूं ॥ धृ० ॥ कपट वेष धरुनी
मला नेली रावणें ॥ तया वेळीं नाहीं कोणीं केलें
धांवणें ॥ सुवेळेसीं पाहुनी मसीं पाहिलें उणें ॥
लोभ कांहो कठिण केला आज मजवरी ॥ राम-

चंद्र० ॥ १ ॥ येऊनी मसीं दोन मास लोटले जगीं ॥ राम माझा प्राण सखा काय गे करीं ॥ मज वीण प्रिया नसे त्यासी दूसरी ॥ पंचप्राण क्षीण झाले किती आवरूं० ॥ २ ॥ माझें वर्तमान जाऊनी सांगा गे कोणी ॥ येउनी भुवनीं जावुनी त्यांसी आणा गे कोणी ॥ समर्थ मोठा नष्ट आला नाहीं पांखरूं ॥ रामचंद्र० ॥३॥ निशिदिनीं नीज नये आज नयनाला ॥ हर्षयुक्त झाली सिता राम भेटला ॥ आनंदाचा दिवस सखे आजि लोटला ॥ हरीदास ह्मणे आह्मीं लाभ जोडिला ॥ अखंडित ध्यास मनीं पाय मी धरूं ॥ रामचंद्र ॥४॥

॥ पद. ॥

सखया रामा विश्रांती तुझिये नामीं ॥ ह्मणउनि मजला नेत्वरें निज सुखधामीं ॥ ध्रु० ॥ अवचट सुकृतें नरदेहा झाली भेटी ॥ पशुसुतजायाधनधामीं प्रीती मोठी ॥ माझीं माझीं ह्मणुनि भ्यां धरिलीं पोटीं ॥ याच्यासंगें भोगिल्या दुःख–कोटी ॥ सखया० ॥ १ ॥ सोडुनि स्वहिता धावलों

दिशा दाही ॥ शवबत झालों मागुता कौतुक पाहीं ॥ परिखळ जन हे नेदिती कवडी तेंही ॥ परि हे आशा पापिणी लाजत नाहीं ॥ सखया० ॥ २ ॥ जंववरी द्दढता तंववरी या तनुची प्रीती ॥ जर्जर झाल्या निंदक हे अवघे होती ॥ यांचीं दुःखें तुजला मी सांगूं किती ॥ ह्मणउनि येतो श्रीधर काकूळती ॥ सखया० ॥ ३ ॥

॥ पद. ॥

धांव रे रामराया ॥ किती अंत पहासी ॥ प्राणांत मांडियेला ॥ नये करुणा कैसी ॥ ध्रु० ॥ पाहिन क्षणभरी ॥ चरण झाडीन केशीं ॥ नयन शीणले बा ॥ आतां केधवां येसी ॥ धांव रे० ॥ १ ॥ मी-पण अभिमानीं ॥ अंगीं भरियेला ताठा ॥ विषय-कर्दमानें ॥ लाज नाहीं लोळतां ॥ चिळस उप-जेना ॥ ऐसें झालें बा आतां ॥ धांव रे० ॥ २ ॥ मारुती स्कंध भागीं ॥ शीघ्र बैसोनिया यावें ॥ राघवें वैद्यराजें ॥ कृपा औषध द्यावें ॥ दयेच्या पद्म-हस्तें ॥ माझें शिरीं ठेवावें ॥ धांव रे० ॥ ३ ॥

या भवीं रामदास ॥ थोर पावतो व्यथा ॥ कौ-
तुक पहातोसी ॥ काय जानकीनाथा ॥ दयाळा
दीन बंधो ॥ भक्तवत्सला आतां ॥ धांव रे० ॥४॥

॥ पद. ॥

तूं माझा यजमान ॥ रामा तूं माझा यजमान ॥
ध्रु० ॥ जननीजठरीं रक्षियलें मज ॥ पोसुनि पं-
चहि प्राण ॥ रामा तूं० ॥ १ ॥ बाहेर निघतां मा-
तेचे स्तनीं ॥ पय केलें निर्माण ॥ रामा तूं० ॥२॥
ऐसें असतां या पोटाची ॥ कां करूं चिंता जाण
॥ रामा तूं० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर स्वामी रमा-
पति ॥ धरिं माझा अभिमान ॥ रामा तूं० ॥ ४ ॥

॥ पद. ॥

माझ्या रामाला आणा कोणी जागे ॥ ध्रु० ॥ रूप
सुंदर सकुमार बाई ॥ खडे कंटक रूतलील पायीं
कैसी कैकायिला दया येत नाहीं नाहीं ॥ माझ्या
रा० ॥ १ ॥ कधीं न्हाणिलें नाहीं रघुनाथा ॥ स्नेहें
माखिला नाहिं त्याचा माथा ॥ हें दुःख आठवलें
रनाप्रती जातां जातां ॥ माझ्या० ॥ २ ॥ पूर्व पं-

क्तीसी केला असेल भेद ॥ साधुसंतांसीं केला असेल वाद ॥ असें कैकयिनें केला मज बोध बोध ॥ माझ्या रा० ॥ ३ ॥ किंवा आंधळ्याची हिरुन नेलि काठी ॥ किं कृपणाची सुटुन पडली गांठी ॥ असें कैकयिनें मला केलें कष्टी कष्टी ॥ माझ्या रा० ॥ ४ ॥ राम चालिला जीव झाला वावरा ॥ रामा वांचूनि नाहीं मजला थारा ॥ युग्मनेत्रीं वाहती अश्रु धारा धारा ॥ माझ्या रा० ॥ ५ ॥ ह्मणे माधव शरण जावें कोणा ॥ सद्गुरु बांचूनि नाहिं कोण शाहणा ॥ त्यानें भेटविला रघूनाथ राणा राणा ॥ माझ्या रामा ॥ ६ ॥

॥ पद. ॥

रामनाम तूं भजले प्यारे, कायकूं मगरुरी करता है ॥ कचे मटिका बंगला तेरा पांव पलखमें ढलता है ॥ ध्रु० ॥ ब्रह्मण होकर पोथी बाचे, स्नान तरपन करता है ॥ सर्वकाल सुचील रहे तो यौंक्या साहेब मिलता है ॥ राम० ॥ जोगी होकर जटा बडावे हालमस्तमें रहता है ॥ उपर धर कर हात

सुकावे, यौंक्या साहेब मिलता है राम० ॥ मान भाव पेहने काले पडदे दाढी मुछी मुंडता है ॥ उलटी लकरी हात पकडकर यौंक्या साहेब मिलता है ॥ राम० ॥ मुल्ला होकर बांग पुकारे ओक्या साहेब बहिरा है ॥ मुंगीके पावमें आवाज बाजे ओबी अल्ला सुनता है ॥ राम० ॥ जंगम होकर लिंग बंधावे घरघर लेकर फिरता है ॥ शंख बजाकर भिच्छा मांगे यौंक्या साहेब मिलता है ॥राम० कहत कबीरा सुन भइ साधू मनकी माला जपता है ॥ भाव भगतीसें ध्यान धरत है, उसकूं साहेब मिलता है ॥ राम० ॥

॥ पद. ॥

राम-कथा रस पी पी पी, प्राण्या ॥ ध्रु० ॥ राम-कथारस पीशिल जरि तूं ॥ काळ करिल मग जी जी जी ॥ प्राण्या रा०॥ संतति संपति जाय जिणें मग ॥ मीपण धरिसी छी छी छी ॥ प्राण्या रा०॥ मध्व मुनिश्वर सांगतसे गुज ॥ दुष्टजनांप्रती भी भी भी ॥ प्राण्या रा० ॥ १ ॥

॥ पद. ॥

आठवितों रामा। घडि घडि घडि चरण तुझे ॥ आसनिं शयनिं भोजनिं गमनीं। छंद तुझा आह्मा ॥ ध्रु० ॥ दृश्यातीत पूर्ण ब्रह्म। नित्य निर्वीकारा अंबुजदलनयन मुनी। मानसीं विहारा ॥घडि०॥ सर्व साक्षी सर्वोत्तम। सर्वगुरुरूपा ॥ प्रेमियातें सौख्य सिंधु। दशरथकुळ दीपा ॥ घडि० ॥ तात मात भ्रात नाथ। तूंचि एक पाहीं ॥ केशव ह्मणे करीं दया। शरण तुझ्या पायीं ॥ घडि० ॥

॥ पद. ॥

रामनामाची गति कोण जाणे रे। जाणतसे कैलासपति राणारे ॥ ध्रु० ॥ कीटपक्ष्यादिक मोक्षपदा जातीरे ॥ तेथें इतरांची कथा कोण गातीरे॥ रामना० ॥ व्याधें वधितां मुखासि ह्मणे राम रे॥ तेणें मिषें चढे तो मोक्षधामा रे ॥ रामना० ॥ घेतां रामाचें नाम मोक्ष—ग्राम द्वारीं। धन्य झाली ते महीमान्य नारी ॥ रामना० ॥ अजामेळादि पूर्ण पापराशी ॥ नाम संकेतें पुण्य लोकवासी ॥ राम-

ना० ॥ मंत्र हा माझ्या शिकविला मायबापें ॥ ह्मणे आनंदतनय गेलीं माझीं पापें ॥ रामना० ॥

॥ पद. ॥

रामा कौतुक पहासी काय ॥ उद्धरीं मुनिदारा ॥ ध्रु० ॥ अज्ञानानें घडलें पाप ॥ कोपुनि मुनिनें दिधला शाप ॥ सदया दूर करीं संताप ॥ तूं मायबाप दीनाचा ॥ रामा० ॥ १ ॥ ऐकुनि उठला तो रघुराया ॥ धरिला गौतमवधुवरी पाय ॥ केला सर्वहि दूर अपाय ॥ हर्ष न माय मुनिला हा ॥ रामा० ॥ द्यावें मुनि तिजला वरदान ॥ राखी मुनि वनितेचा मान ॥ धरीं मद्वचनाचा मान ॥ बापा अनमान न करीं हो ॥ रामा० ॥ करिति सुरवर जयजयकार ॥ मुनि आलिंगिती वारंवार ॥ झाले मजवरि बहु उपकार ॥ तूंचि आधार या दासा ॥ रामा० ।

॥ पद. ॥

विश्वामित्र सभे आला ॥ मागतो माझ्या रामाला ॥ ध्रु० ॥ विनवा त्या ऋषि रायाला ॥ नको नेऊं माझ्या बाळाला ॥ जरि हा मागेल दुग्धाला ॥ तरी

वनीं कोण देइल याला ॥ द्यावें पुत्रदान मजला॥ मागतो माझ्या० ॥ विश्वा० ॥ त्याविण आज्ञा नाहीं कोणी ॥ जैसें मत्स्यालागीं पाणी॥ विनवा जाउनिया कोणी ॥ भेटवा रघुकुळ राजमणी ॥ अभय दे वसिष्ठ मग तिजला ॥ मागतो० ॥ कैकई फोडी हंबरडे ॥ कौसल्याही धाय रडे ॥ झाले नेत्रही कोरडे ॥ बोलती वेडे वांकुडे ॥ दुष्ट हा कां नाहीं खपला ॥ मागतो० ॥ कां रुसलासी जगदीशा ॥ मांडिली आमुची दुर्दशा ॥ मजला होती फार आशा ॥ वाटती उदास दाहि दिशा॥ आतां काय भेटेल आपुल्याला ॥ मागतो० ॥

॥ पद. ॥

राम माझा धरिल कसा अभिमान ॥ पहातो काय निदान ॥ धृ० ॥ जप तप साधन कांहीं न नेणें ॥ पातकी दुष्ट महान् ॥ राम० ॥ परघातक मी गुरु वंचक मी ॥ दोष हे काय लहान ॥राम०॥ करुणाघन हा निष्ठुर झाला ॥ त्र्यंबक प्राण निधान ॥ राम० ॥

॥ पद. ॥

सांगड बांधारे भक्तीची । रघुनाथ नामाची ॥ धृ० ॥ संसार सागर सागर । भरला जातो पूर ॥ सांगड० ॥ लाटा उसळती विषयाच्या । बहुतां प्रपंचाच्या ॥ सांगड० ॥ माणकोजी बोधला बोलला ॥ हरी नामीं रंगला ॥ सांगड० ॥

॥ पद. ॥

जय जय रघुवीरा रणधीरा ॥ रविकुल मंडण हीरा ॥ धृ० ॥ राक्षस जलद समीरा ॥ निज जन करुणा पूर्ण गंभीरा ॥ जय० ॥ कनक रुचिर शुभचीरा ॥ मुनि जन मानस पंजरकीरा ॥ जय० ॥ आनंद तनय वजीरा ॥ पदयुगीं झळझळीत मंजीरा ॥ जय० ॥

॥ पद. ॥

जप तूं राम नाम किती मधुर मधुर मधुर मधुर ॥ जप० ॥ धृ० ॥ रामनाम ध्वनि उमटे ॥ तेथें लक्ष लावी नेटें ॥ ब्रह्मनंद सहज भेटे ॥ प्रचुर प्रचुर प्रचुर प्रचुर ॥ जप० ॥ दृश्य देखतांचि दिठीं ॥

देयीं दृष्ट्यासी मिठी ॥ आपुलें आपण सौख्य घोटीं ॥ न दुर न दुर न दुर न दुर ॥ जप० ॥ राम विष्णु कृष्ण ध्यान त्यासि दे मुकुंद ज्ञान ॥ जेणें होय समाधान ॥ चतुर चतुर चतुर चतुर ॥ जप॥

॥ पद. ॥

पूर्ण ब्रह्म राम गे ॥ वर्णूं त्यासी काय गे ॥ दशरथ तात ज्याच्या ॥ कौसल्या ती माय गे ॥ धृ० ॥ ब्रह्मांडाच्या कोटी गे ॥ सांठवितो पोटीं गे ॥ भर्ग चाप भंगुनिया ॥ पर्णी सीते लागीं गे ॥ पूर्ण० ॥ ब्रह्म निर्विकार गे ॥ नाहीं त्या आकार गे ॥ साकार होउनि रक्षी ॥ पदीं नत दास गे ॥ पूर्ण० ॥ आहे अंतर ज्ञानी गे ॥ जाणें सकळ ध्यानीं गे ॥ अनुदिनिं ध्यान धरुनी ॥ प्रार्थितों मी त्यासी गे ॥ पूर्ण० ॥

॥ पद. ॥

माझ्या बाळा रघुवीरा ॥ वनासि जाऊं नको ॥ धृ० ॥ कोमल नाजुक तुझा काय ॥ व्यर्थचि भरीं भरलासी काय ॥ रडते मोकलोनि मी धाय

॥ पंक्तीं गाय रोवूं नको ॥ माझा० ॥ १ ॥ तुझ्या पायां येतिल फोड ॥ वनविचराची इच्छा सोड ॥ देईं मजला एवढी जोड ॥ सुकृतमोड मोडूं नको ॥ माझ्या० ॥ सूक्ष्म केवळ तूं तर बाळ ॥ कैसा फिरसिल रानो माळ ॥ होईल अनर्थ कीं तात्काळ ॥ विपरित काळ दावूं नको ॥ माझ्या० ॥ विनवित रामासी ती माय ॥ स्वस्थचि मज पाशीं तूं राय ॥ जीवन तनये वंदितो पाय ॥ कांहीं उदास होऊं नको ॥ माझ्या० ॥

॥ पद. ॥

माझ्या बाळावरता रोष ॥ कैकेयी धरिशी कां ॥ धृ० ॥ चिमणें बाळक कीं रघुराय ॥ केला नसतां तव अन्याय ॥ वनासि दवडुनि सुख तरि काय ॥ ऐसा अनर्थ करसि कां ॥ माझ्या० ॥ राम केवळ नेणत बाळ ॥ फिरेल विपिनीं कीं अळुमाळ ॥ यास्तव वाटतसे हळहळ ॥ ठेविन भाळ चरणीं कां ॥ माझ्या० ॥ अंतरल्यावर श्रीरघुराज ॥ माझे प्राणचि जातिल आज ॥ त्रिभुवनीं अपकीर्तीची

लाज ॥ व्यर्थचि आज करिसी कां ॥ माझ्या० ॥ देईं भरतासी संसार ॥ परि मजवरता करिं उपकार ॥ जीवन तनयाचा दातार ॥ चित्तीं दूर धरिसी कां ॥ माझ्या० ॥

॥ पद. ॥

कमला पति भगवान॥मारु साई कमला०॥ राम लछुमन भरत शत्रुघन ॥ चवरि डुलावि हनुमान। मारु साई क० ॥ मोर मुगुट पितांबर शोभे ॥ कुंडल झलकत कान ॥ मारु साई क० ॥ सूरदास प्रभु तुह्मारे मिलनकूं॥दासके खाकू ध्यान ॥ मारु साई क० ॥

॥ पद ॥.

तारीं तारीं रामराया ॥ गेला गेला जन्म वायां ॥ ध्रु० ॥ टाकुनिया स्वकुळज धर्म ॥ केलें सर्वहि विपरित कर्म॥मजला मारिल तो यम धर्म॥काढिल कर्म नाशिल काया॥तारीं० ॥ १ ॥ जन्मापासुनि केलें पाप ॥ भोगिन त्याचें कर्म अपाप ॥ त्याचा वाटतसे संताप॥तूं आई बाप येऊं दे माया

॥ तारीं० ॥ २ ॥ नाहीं केलें गंगास्नान ॥ नाहीं केलें जप तप दान ॥ केला साधूचा अपमान ॥ धरिला मान नरकीं जाया ॥ तारीं० ॥ ३ ॥ निशिदिन सुजन–पथासिं धरीन ॥ आतां तें मी कधिं न करीन ॥ झालों सर्व गुणानें हीन ॥ पडतों दीन तुझ्या पायां ॥ तारीं० ॥ ४ ॥

॥ पद. ॥

कमलनयन घनश्याम ॥ तनु हो ॥ धृ० ॥ चंद्रानन रघुराज विराजे ॥ हस्तकीं कांचन बाण धनु हो ॥ कमल० ॥ सुंदर नासिकबिंब सुधाधर ॥ कुंदरदन अति रम्य हनु हो ॥ कमल० ॥ सज्जनरंजन रविकुल मंडण ॥ जन्मुनि भूपची भूप मनुहो ॥ कमल० ॥

॥ पद. ॥

दिन रजनीं पाहुं राघवा ॥ राम मंदहसित मुख कमल लोचन ॥ धृ० ॥ वामजानुवरी विराजे विमला सीता नारी रे ॥ कोटिविद्युत्प्रकाश आंगिं दशदिशा फांके आघवा ॥ दोघे चंवरे ढाळिति

ज्यासी भरत शत्रुघ्न॥ दिन० ॥ १ ॥ नित्य ध्यानीं मग्न जयासी जपतो मदनारी रे ॥ विष-ताप निरसन झाला अनुभव हा गिरिजाधवा ॥ सव्य भागीं लक्ष्मण करिं चाप बाण ॥ दिन० ॥ २ ॥ राम विष्णु पादांबुजीं लंपट ॥ कृष्ण मधुहारी रे ॥ तैसे वानरगण विभीषण रामीं रमुनीं घेति वाहवा पदिं ठेवुनि शिर न हाले अंजनि-नंदन ॥ दिन० ॥ ३ ॥

॥ पद. ॥

दशरथ नंदन बाळ सीते ॥ त्यासी घालीं माळ सीते ॥ ध्रु० ॥ मदन मनोहर रूप जयाचें ॥ करिल तुझा प्रतिपाळ ॥ सीते० ॥ रामसखा हा मन्मथ पुतळा ॥ दिसतो सुंदर बाळ ॥ सीते० ॥ २ ॥ काळा डोंगर अंतरीं ओंगळ ॥ रावण हा फट काळ ॥ सीते० ॥ ३ ॥ देखुनि रूप वेडावले भूप ॥ अंतरीं घोटिती लाळ ॥ सीते० ॥ ४ ॥ मध्वमुनीश्वर स्वामी रमापति ॥ दानव कुळिंचा काळ ॥ सीते० ॥ ५ ॥

॥ पद. ॥

जानकि सांगे सहचारिला ॥ कळवि जनकाशीं ॥ ध्रु० ॥ हें धनु ठेवावें सदनांत ॥ विश्वसावें मद्वचनांत ॥ नाहितरी जाइन मी विपिनांत ॥ देह दहनांत अर्पिन मी ॥ जान० ॥ १ ॥ काय करूं मी नाहीं धीर ॥ सत्वर दावीं तो रघुवीर ॥ पाहिन कधीं शरयूतीर ॥ नयनीं नीर वहातें गे ॥ जान० ॥ २ ॥ देइन कंठांतिल मणिहार ॥ प्रार्थीं जोडुनि कर बहुवार ॥ सखे करीं इतुका उपकार ॥ होय उदार मजवरती ॥ जान० ॥ ३ ॥ मी वरिला तो गे श्रीराम ॥ जो कां अखिल सुखाचें धाम ॥ जो सुखशत अभिराम ॥ पूर्ण काम जो दासा ॥ जानकि० ॥ ४ ॥

समाप्त.

---

हें पुस्तक पुरंदरे आणि कंपनी यांनीं मुंबईंत "देव्हारे प्रिंटिंग प्रेस" मध्यें छापिलें. शके १८१५, सन १८९३.